म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

८०

इति

# हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.

हें पुस्तक

**लहान मुलांकरितां,**


**विनायक कोंडदेव ओक**

ह्यांनीं केलें


तें

मेहरबान डैरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन

ह्यांच्या हुकुमानें छापिलें.

**आवृत्ति दुसरी.**


सन १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें या पुस्तकाची मालकी नोंदिली आहे सबब सरकारच्या हुकुमाशिवाय हें पुस्तक कोणीं छापूं नये.



मुंबई.

**गवरमेन्त सेंत्रल बुक डिपो.**

इ. सन १८७०.

---

किंमत ०=॥.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | देशवर्णन | १ |
| २. | हिंदुस्थानाविषयीं प्राचीन माहिती | ४ |
| ३. | मोंगल बादशाहांविषयीं | १३ |
| ४. | मराठ्यांविषयीं | २० |
| ५. | इंग्लिशांचा उत्कर्ष व पेशवे | २८ |
| ६. | बंगाल्यांतील वर्तमानें | ३४ |
| ७. | बंगाल्यांतील वर्तमानें—हैदराशीं युद्ध—इ० | ४१ |
| ८. | पेशव्यांशीं पुनः तह—सालब्याचा तह—टिपूचा शेवट | ४८ |
| ९. | मराठ्यांशीं लढाया—तह—इ० | ५६ |
| १०. | लार्ड मिंतो ह्याची कारकीर्द | ६४ |
| ११. | नेपाळची लढाई—पेंढारी—इ० | ६८ |
| १२. | पेशवे व भोंसले ह्यांचीं वर्तमानें | ७२ |
| १३. | होळकराशीं तह—ब्रह्मदेशाशीं युद्ध—भरतपूरचा वेढा—इ० | ७९ |
| १४. | लार्ड विलियम बेंतिक ह्याची कारकीर्द—अफगानिस्थानाशीं लढाई—सिंधचे आमिरांशीं लढाई—इ० | ८६ |

| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १५. | पंजाबची लढाई–लार्द दालहौसीची कारकीर्द. निजाम व अयोध्येचा नबाब ह्यांचें वर्तमान–इ० | ९४ |
| १६. | बंगाल्यांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें व आरंभ | १०० |
| १७. | बंडाचा पसार, शेवट, आणि परिणाम | १०७ |
| १८. | हिंदुस्थानांत इंग्लिशांचा उत्कर्ष होण्याचीं कारणें; व त्यांच्या राज्याची सांप्रतची स्थिति | ११५ |

# हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.

## भाग पहिला.

### देशाचें वर्णन.

फारशी भाषेंत हिंदु ह्मणजे काळा; आणि इराणांतील लोकांपेक्षां ह्या देशांतील लोक काळे आहेतच. ह्यावरून, हिंदुस्थान म्हणजे काळे लोकांचा देश, असें ह्या देशाचें नांव पडलें असावें.

उत्तरेस हिमालय पर्वत; पूर्वेस ब्रह्मपुत्र नद, व आराकानचे डोंगर; आग्नेयीस व कांहीं पूर्वेस बंगालचा उपसागर; दक्षिणेस हिंदी महासार; आणि पश्चिमेस सिंधुनद; अशा हिंदुस्थानाच्या सीमा आहेत.

दक्षिणेस कन्याकुमारी केपापासून तों उत्तरेस हिमालयाचे शिखरापर्यंत ह्या देशाची लांबी १८८० मैल; पूर्व पश्चिम रुंदी १६२० मैल; आणि क्षेत्रफळ सुमारें १२८०००० चौरस मैल आहे.

हिंदुस्थानांत हिमालय, सह्याद्रि, विंध्याद्रि, अरवली, चितूर, हारावती, सातपुडा, राजमहाल, इत्यादि अनेक पर्वतांच्या ओळी आहेत. त्यांपैकीं हिमालय ही ओळ पृथ्वीमध्यें सर्वांत उंच आहे.

गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्र, नर्मदा, तापी, महानदी, मही-नदी, साबरमती, गोदावरी, कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा, भीमा, कावेरी, प्रवरा, अशा पुष्कळ नद्या व नद हिंदु-स्थानांत आहेत.

चिलका, कोलेर, पलीकत, होनावर, साबर, ताल, मानस, मानसबल, उलूर, इत्यादि सरोवरें आहेत.

सिंहलद्वीपाचें उत्तर टोंक व हिंदुस्थान ह्यांच्या मध्यें पाल्क नांवाची सामुद्रधुनी आहे. आणि रामेश्वर-बेट व हिंदुस्थान ह्यांच्या मध्येंही एक लहानशी सामु-द्रधुनी आहे.

कच्छचें, खंबायतचें, व मनारचें, हीं तीन अखातें हिंदुस्थानांत आहेत. व बंगालचा उपसागर हा एक उपसागर आहे.

ह्या देशांतील सर्व जागच्या हवेची उष्णता सारखी असते असें नाहीं. मुंबईच्या हवेचें उष्णतेचें मान सरास-री ८२ अंश, आणि निळगिरीच्या हवेच्या उष्णतेचें मान सरासरी ५६ अंश असतें.

गहूं, सातू, बरग, तांदूळ, नाचणी, हरभरा, तूर, जोरी, बाजरी, मका, राई, ऊंस, कापूस, नीळ, तीळ, वेलदोडे, आलें, मिरीं, हळद, जेष्ठमध, तमाखू, ताग, लाख, खसखस, आंबा, फणस, नारळ, सुपारी, द्राक्षें, अननस, अंजीर, नारिंग, इत्यादि पदार्थ हिंदुस्थानांत

उत्पन्न होतात. शिवाय, वेळू, बाभूळ, शिसवा, साग, चिंच, अशीं अनेक प्रकारचीं इमारतीचीं लांकडें होतात.

ह्या देशामध्यें हत्ती, वाघ, चित्ता, रानडुकर, लांडगा, खोंकड, तरस, सिंह, गवा, आस्वल, कोल्हा, ससा, वानर, नीलगौ, इत्यादि वन्य जनावरें आहेत. घोडा, गाढव, हत्ती, उंट, बैल, गाय, डुकर, म्हैस, रेडा, शेळी, बकरें, मांजर, कुत्रें, इत्यादि ग्राम्य पशु आहेत. ह्यांखेरीज कांसव, मासा, खेंकडा, इत्यादि पाण्यांत राहणारे जीव; चिमणी, कावळा, राघू, पारवा, इत्यादि पक्षी; व साप, विंचू, अधेला इत्यादि दंश करणारे प्राणी अनेक आहेत.

हिरे, माणकें, रत्नें, व सोन्यारुप्याचे कण, हे कोठें कोठें सांपडतात. आलीकडे दगडी कोळशांच्या खाणी लागल्या आहेत. समुद्राच्या पाण्यापासून मीठ पुष्कळ ठिकाणीं होतें. पंजाबांत शेंधेलोणाच्या खाणी आहेत. आणखी बहुत जागीं सोरा, मीठ, लोखंड, ह्यांच्या खाणी लागल्या आहेत.

हिंदुस्थानामध्यें हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, तैलंगी, तामिळ, कानडी, अशा अनेक भाषा चालतात. ह्या सगळ्या संस्कृत भाषेपासून उत्पन्न झाल्या असाव्या असें विद्वानांचें मत आहे.

ह्या देशांत लोक सुमारें १८४००००००० आहेत.

# भाग दुसरा.

## हिंदुस्थानाविषयीं प्राचीन माहिती.

फार प्राचीन काळीं हिंदुस्थानामध्यें काळे रानटी लोक राहत असत. त्यांस बहुत वर्षांपूर्वीं **आर्य** नांवाच्या लोकांनीं वायव्येकडून येऊन जिंकिलें. ते संस्कृत भाषा बोलत. ह्यांनीं आपलीं राज्यें जागोजाग स्थापिलीं; आणि देशाची बरीच सुधारणा केली. इसवी सनापूर्वीं सुमारें १५०० वर्षांवर, ईजिप्त देशाचा **सेसोस्त्रिस** राजा, ह्यानें जलमार्गें येऊन हिंदुस्थानावर स्वारी केली. नंतर **आसिरिया** देशाची **सेमिरामिस** राणी ही मोठी फौज घेऊन हिंदुस्थानावर आली. ह्या गोष्टी पश्चिमेकडील लोकांच्या जुन्या ग्रंथांवरून समजतात. परंतु, त्यांचे बरोबर सन शक कोठें आढळत नाहींत.

**मासिदोन** देशाचा **शिकंदर** बादशाह ह्यानें इसवी सनापूर्वीं ३२७ वे वर्षीं हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां **पोरस** नामक कुळांतला कोणी राजा त्याशीं लढण्यास उभा राहिला. परंतु तो पराभव पावला, आणि बादशाह विजयी झाला. ह्या वेळेपुढें हिंदुस्थानाविषयींची माहिती थोडथोडी आधारपूर्वक मिळते. ह्मणून हाच त्याच्या इतिहासाचा खरा आरंभ समजला पाहिजे.

**शिकंदराचे** वेळीं **पाटणा** येथें **चंद्रगुप्त**राजा राज्य करित होता. **बंगाल्यांत** प्रथम **पाल** ह्या आडनांवाचे व नंतर **सेन** ह्या नांवाचे राजे राज्य करीत होते. माळव्यांत **परमार** नांवाच्या वंशाचे राजे होऊन गेले. त्यांत **विक्रमादित्य** हा इसवी सनापूर्वी सुमारें २६ वे वर्षीं गादीवर होता. तो विद्वानांचा मोठा पक्षपाती असे. उज्जनी ही त्याची राजधानी होती. त्याच्याच वंशांत पुढें **भोज**राजा झाला. त्याचीही विद्यावृद्धी विषयीं फार आख्या लिहिली आहे. ह्यांखेरीज, **गुजराथ**, **कनोज**, इत्यादि जागीं उत्तरेकडे राज्यें होतीं.

दक्षिणेकडे **त्रावणकोर**, **मलबार**, **कोइमत्तूर**, ह्या प्रांतांवर **चेर** नामक राजे राज्य करीत. **कर्नाटकावर पांड्य**, **चेर**, **केरल** ह्यांचा अंमल असे. **आंध्र** देशाची राजधानी **वारंगुळ**. त्याच्या इतिहासांत आधीं **विक्रम**, **शालिवाहन** ह्यांचीं नांवें आढळतात. महाराष्ट्र देशाची राजधानी **तगर** ही गोदावरीच्या कांठीं पैठणाच्या पूर्वेस होती. कुंभाराचा एक मुलगा पैठण येथें स्वपराक्रमानें वाढून, **शालिवाहन** ह्या नामें शककर्ता होऊन गेला. त्यानें उज्जनीच्या **विक्रम** राजास जिंकिलें अशी दंतकथा आहे. परंतु, ह्या दोघांमध्यें अंतर १३५ वर्षांचें आहे; इसवी सनानंतर ७८½ वर्षांनीं शालिवाहन शक चालू झाला.

सिंधुनदाच्या पलीकडे अफगाणिस्थानांत गिझनी येथें प्रथमतः अलप्तगीन नामक तुर्की गुलाम पुरुषानें राज्य स्थापिलें. तो इ० स० ९७६ त मेल्यावर त्याची गादी सबक्तगीन ह्यास मिळाली. त्यावर लाहोरचा राजा जयपाळ हा सिंधुनद उतरून सैन्यासहवर्तमान स्वारीस गेला. परंतु तोच पराभव पावून, व सबक्तगीन ह्यास खंडणी देण्याचें कबूल करून माघारां आला. ती खंडणी मागावयास लोक आले, त्यांस ती न देतां त्यानें उलटें कैद करून ठेविलें. हें सबक्तगीन ह्यास सहन न होऊन तो सैन्यांसहवर्तमान जयपाळाचा सूड उगविण्यास सिंधु उतरून आलीकडे प्राप्त झाला. त्याशीं लढण्याकरितां १००००० सैन्यासुद्धां जयपाळ उभा राहिला. परंतु त्यास पूर्वीप्रमाणेंच अपेश आलें. त्याचें पुष्कळ सैन्य शत्रूंनीं मारिलें. आणि नीलाब ह्मणजे सिंधु नदाच्या वरचा प्रदेश सबक्तगीनानें आपले राज्यास जोडून, तेथें अंमल बसविण्याकरितां १०००० स्वारांनिशीं एक सुभेदार पाठविला.

वीस वर्षें राज्याचा उपभोग घेऊन सबक्तगीन इ० स० ९९७ त मरण पावला. नंतर त्याचा पुत्र सुलतान महमूद हा त्याचे गादीवर बसला. तो दिसण्यांत कुरूप होता, तरी मोठें राज्य मिळविण्याचीं इच्छा त्याला फार असे. त्यानें हिंदुस्थानावर एकंदर बारा स्वाऱ्या केल्या.

त्यांपैकीं पहिली स्वारी इ० स० १००१ ह्या वर्षी झाली. आणि शेवटची, इ० स० १०२४ त **सोरटी-सोमनाथावर** झाली. ह्या देवस्थानाचें रक्षण करण्याविषयीं पुष्कळ हिंदु राजांनीं यत्न केले; परंतु, ते सगळे व्यर्थ गेले. **महमुदानें** देवालयांत घुसून मूर्त्ति फोडिल्या, देवाचें सर्व द्रव्य घेतलें, आणि सर्व प्रजेस लुटिलें. ह्या खेपेस **गिझनीकडे** परत जातांना मार्गांत त्याच्या सैन्यास फार हाल भोगावे लागून, त्यांतले पुष्कळ लोक प्राणासही मुकले. हा राजा ३५ वर्षे राज्य करून, ६३ वर्षांचा होऊन, इ० स० १०३० च्या एप्रिल महिन्याच्या २९ व्या तारखेस मरण पावला. ह्याचे वंशास **गजनवी** वंश ह्मणतात.

**गजनवी** कुळांतला शेवटचा राजा **खुषरू मलिक्** ह्यास, इ० स० ११८६ ह्या वर्षी **महमद गोरी** नांवाच्या पुरुषानें पदच्युत करून त्याचें राज्य बळकाविलें. त्या **महमद गोरीनें हिंदुस्थानावर** अनेक स्वाऱ्या करून कांहीं प्रांत जिंकून घेतले, ते त्यानें आपला सरदार **कुतबुद्दीन** जो पूर्वी गुलाम होता त्याच्या स्वाधीन केले. **महमद गोरी** आपल्या देशास परत गेला; परंतु **कुतबुद्दीनानें हिंदुस्थानांत** राहून **दिल्ली** येथें आपली गादी स्थापिली.

**महमद गोरी** वारल्यावर **महमुद** नांवाचा बादशाह

गिजनीचे गादीवर बसला; त्यानें कुतुबुद्दीनास बादशाह हा किताब दिला. कुतुबुद्दीन व त्याचे वंशज जे राजपद पावले त्यांस गुलामराजे असें नांव पडलें.

दिल्लीच्या कैकोबाद नांवाच्या गुलाम राजास दुर्व्यसनाचा फार नाद लागला. तेणेंकरून त्याच्या दरबारांत बखेडे उत्पन्न झाले. तेव्हां त्याच्या गिल्ची ह्मणजे खिलजी फौजेनें त्यास ठार मारून, आपला सरदार जलालुद्दीन ह्यास इ० स० १२८८ ह्या वर्षी गादीवर बसविलें. तेव्हां तो ७० वर्षांचा होता. ह्यास व ह्याचे वंशजांस खिलजी राजे असें नांव पडलें. ह्या कुळांतले तीन पुरुष दिल्लीच्या गादीवर बसले; १ जलालुद्दीन, २ अल्लाउद्दीन, आणि ३ मुबारिक. जलालुद्दीन गादीवर असतां, त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन ह्यानें इ० स० १२९३ त, ८००० लोकांसहवर्तमान दक्षिणेंत स्वारी करून, दवलताबादच्या रामदेवराव राजाशीं लढून, त्यापासून खंडणीबद्दल पुष्कळ पैसा घेतला. नंतर तो आपला चुलता जलालुद्दीन ह्यास सहज भेटण्याचे मिषानें त्याजकडे गेला. त्याचें बोलणें चाललें आहे इतक्यांत, अल्लाउद्दीनाच्या लोकांनीं जलालुद्दीनास ठार केलें. ही गोष्ट तारीख १२ जुलै, स० १२९५ रोजीं घडली. नंतर अल्लाउद्दीन राजपद पावला. दुसरे वर्षी १००००० मोंगलसैन्य हिंदुस्था-

नावर आलें त्याचा त्यानें पराभव केला. व पुढें गुजराथ प्रांत त्यानें घेतला. तो इ० स० १३१६ त मरण पावला. नंतर त्याचा पुत्र मुबारिक हा गादीवर बसला. तो प्रथम बरा होता; परंतु, पुढें तो दारूच्या, व स्त्रीवेष धारण करून वेश्यांबरोबर नाचण्याच्या छंदास लागून अगदीं बिघडला. तेव्हां त्याचा वजीर खुशरू ह्यानें कुटुंबासुद्धां त्यास ठार मारिलें, आणि गादी बळकाविली. त्याला, इ० स० १३२१ त ग्यासुद्दीन तघलख नामक दुसऱ्या एका सरदारानें मारून त्याचें राज्य घेतलें. त्यास व त्याचे वंशजांस तघलख राजे म्हणतात.

तघलख वंशांत महमद तघलख म्हणून एक मूर्ख राजा होऊन गेला त्यानें दिल्ली राजधानी मोडून दौलताबाद ही राजधानी करण्याचा दोन वेळां सक्त प्रयत्न केला. परंतु तो व्यर्थ गेला. ह्यानें चीनदेशावरही एकदां सैन्य पाठविलें होतें, (तें अपजय पावून माघारें आलें.) इ० स० १३४७ ह्या वर्षी, महमदाचे गुजराथेंतील सरदार बंडावून दक्षिणेंत आले. त्यांचा मुख्य पुढारी प्रथमतः इस्मायलखान हा होता. परंतु, तो अधिकार त्यानें आपले खुषीनें हुसेनकांगो ब्राह्मणी नांवाच्या दुसऱ्या एका मुसलमानास दिला. त्यानें दक्षिणप्रांत जिंकून घेऊन राज्य स्थापिलें. ह्यास व ह्याच्या वंशजांस

ब्राह्मणीराजे असें नांव पडलें, महमद तघलख इ० स० १३५१ त मरण पावला. तो मौजेसाठीं माणसें देखील मारीत असे.!

फिरूज तघलख ह्याचा नातू महमूद तघलख दिल्लीच्या गादीवर असतां, तार्तरीदेशचा बलिष्ठ सरदार तैमूरलंग हा बरोबर प्रचंड सेना घेऊन दिल्लीवर आला, आणि ता० १७ दिसेंबर स० १३९८ इ० रोजीं त्यानें तें शहर घेतलें; आंतील लोकांची कत्तल उडविली; व आपण हिंदुस्थानचे बादशाह आहों, अशी चोहींकडे द्वाही फिरविली. महमूद गुजराथेंत पळून गेला. तैमूरलंग १५ दिवस दिल्ली शहरांत राहून नंतर स्वदेशाकडे चालता झाला. त्यानें इकडून द्रव्य किती नेलें ह्याची गणती नाहीं. परंतु लुटीमध्यें १२० हत्ती, १२ गेंडे, व दुसरे कितीएक एतद्देशीय प्राणी तो बरोबर घेऊन गेला, असें एके जागीं लिहिलें आहे.

तैमूरलंग गेल्यावर महमुदानें गुजराथेंतून येऊन पुनः आपली गादी मिळविली. तो इ० स० १४१२ त मृत्यु पावला. नंतर १५ महिने पावेतों दौलतखान लोदी नांवाच्या सरदारानें राज्य केलें. त्यास, इ० स० १४१४ ह्या वर्षीं पंजाबचा सुभेदार खिजरखान ह्यानें काढून दिलें. खिजरखानाचे मागून त्याचे गादीवर मुबारिक, महमद आणि अल्लाउद्दीन हे बसले. त्यांस सय्यद राजे म्हणत.

अल्लाउद्दिनाला त्याचें राज्य चालवितां येईना, म्हणून त्यानें तें बहिलोलखान लोदी नांवाच्या सरदाराच्या स्वाधीन केलें. तेव्हां तो बादशाह झाला. हा लोदी पादशाहांचा मूळ पुरुष होय.

बहिलोलखानानें पंजाब प्रांत जिंकिला. हा बादशाह सुमारें ३१ वर्षे राज्य करून इ० स० १४८८ त वारला. नंतर शिकंदर लोदी गादीवर बसला. तो जात्या कवि असून विद्वानांचा पक्षपाती असे. तो २८ वर्षे राज्याचा उपभोग घेऊन, इ० स १५१६ त आग्रा येथें मरण पावला. नंतर इब्राहिम राज्य करीत असतां तैमुरलंगाचा वंशज बाबर हा काबुलांत राज्य करीत होता, तो, अल्लाउद्दीन नामक आपल्या सरदारासह वर्तमान, ९२००० सैन्य बरोबर घेऊन इ० स० १५२४ त हिंदुस्थानावर आला. त्याची आणि इब्राहिमाची लढाई तारीख २१ एप्रिल सन १५२६ रोजीं पाणिपता जवळ झाली. तींत इब्राहिम पराभव पावून पडला. ह्या प्रसंगीं उभयपक्षांकडचे मिळून ४०००० लोक मेले आणि बाबर दिल्लीपति झाला. ह्यास व ह्याचे मागें जे बादशाह त्याचे गादीवर होऊन गेले, त्यांस मोंगल बादशाह असें नांव पडलें.

मागें ब्राह्मणी राज्य दक्षिणेंत स्थापन झालें म्हणून सांगितलें, तें ह्याच सुमारास मोडून त्याचे पांच तुकडे

झाले. १ विजापूरचें अदिलशाई; २ गोवळकोंड्याचें कुतुबशाई; ३ वऱ्हाडांतलें अमादशाई; ४ अहमदनगरचें निजामशाई; आणि ५ बेदरचें बरीदशाई. ह्यांपैकीं वऱ्हाड व बेदर येथील राज्यें लवकरच लयास गेलीं. बाकीचीं तीन पुढें बरींच वर्षें चाललीं होतीं.

बाबरानें स्वपराक्रमेंकरून धोलपूर, ग्वाल्हेर, बहार, इत्यादि प्रांत घेतले, व त्याचा पुत्र हुमायून ह्यानें जवानपूर काबीज केलें. शिवाय त्यानें काबूलचें राज्य मिळविलें. मेवाडचा संगराणा हा बाबरास शत्रु उत्पन्न झाला होता. हा बादशाह इ० स० १५३० ह्या वर्षी आग्रा येथें मरण पावला.

त्याचे मागें त्याचा पुत्र हुमायून हा गादीवर बसला, ह्यानें गुजराथेवर स्वारी करून तेथील राजाचा पराभव केला. त्याला शीरशाहा नांवाचा शूर सरदार शत्रु उत्पन्न होऊन, त्यानें त्यास इ० स० १५३९ ह्या वर्षी राज्यपद सोडून पळायास लाविलें. शीरशाहानें गादी बळकाविली. हुमायून इराणांत पळून गेला. शीरशाहानें कालिंजरास वेढा घातला होता. तेथें तो तोफेच्या गोळ्यानें भाजून, इ० स० १५४५ च्या मे महिन्यांत मरण पावला. ह्यास व ह्याचे वंशजांस सूर बादशाह असें ह्मणतात.

शीरशाहाचे मागें सलीम व महम्मदशाहा हे त्याचे

वंशज गादीवर बसले. पुढें इ० स० १५५६ ह्या वर्षी, हुमायून, आपल्या **अकबर** नामक तेरा वर्षांच्या पुत्रासहवर्तमान मोठें सैन्य मिळवून आला, आणि शत्रूचा पराभव करून, **आग्रा** व **दिल्ली** हीं शहरें घेता झाला. नंतर थोडक्याच दिवसांनीं तो जिन्यावरून पडून मरण पावला. तेव्हां तो ५१ वर्षांचा होता. **हुमायुनाचे** मागें त्याचा पुत्र **अकबर** गादीवर बसला.

---

# भाग तिसरा.

## मोंगल बादशाहा.

इ० स० १५५६ पासून १७४४ पर्यंत.

**अकबर,** हा गादीवर बसला तेव्हां केवळ १३ वर्षांचा होता. म्हणून, राज्याचा कारभार, हुमायुनाचा विश्वासू सरदार **बहिराम** हा पाहूं लागला. तो बादशाहास विचारिल्यावांचून पाहिजे तें करी, व त्यास जुमानीत नसे. हा अपमान **अकबरास** न साहून, त्यानें त्याला कारभारांतून काढून टाकिलें. तेव्हां **बहिरामानें** रागावून बंड केलें. परंतु तें **अकबरानें** तेव्हांच मोडिलें. शेवटीं इ० स० १५६० ह्या वर्षी तो सरदार निराश होऊन **मक्केस** जात असतां त्यानें पूर्वी लढाईत मारलेल्या एका अफगाणाच्या मुलानें त्याचा प्राण घेतला.

अकबरानें अजमीर, ग्वाल्हेर, काश्मीर, लखनौ, रतनबोर, कलंजर, गुजराथचें राज्य, जयपूरचें राज्य, हीं घेतलीं. जयपूरचा राजा बहारमल ह्याचे कन्येशीं त्यानें लग्न केलें. ह्या बादशाहाचे वेळीं ह्याचा भाऊ हकीम व अफगाण लोक, ह्यांनीं बंडें केलीं होतीं, तीं ह्यानें मोडिलीं. जुलूम नाहींसा केला; व जातिमत्सर मनांत न आणितां हिंदु लोकांस मोठमोठीं कामें सांगितलीं. त्यानें दक्षिणेंतही स्वारी केली होती. त्यानें आग्रा व अलाहाबाद येथील किल्ले बांधिले, व फत्तेपूर हें शहर वसविलें. नंतर इ० स० १६०५ च्या अक्तोबर महिन्यांत तो मरण पावला. त्याची उत्कृष्ट कबर शिकंदरा येथें आहे. ह्याच्या राज्याचे एकंदर सुभे अठरा केले होते. व ह्याचे मुलखांत ४४००००० शिबंदी व २००००० स्वार असत. अकबराचे मागें त्याचा पुत्र सलीम हा गादीवर बसला.

सलीम हा, जाहांगीर म्हणजे जग जिंकणारा, असा किताब धारण करून राज्य हांकूं लागला. त्यानें नूरजाहान नामक एका सुंदर स्त्रीशीं लग्न केलें. पुढें मोहबतखान म्हणून जो त्याचाच सरदार होता, त्यानें बंड करून, इ० स० १६२६ ह्या वर्षी झेलम नदीवर बादशाहास धरून कैदेंत घातलें. त्यास नूरजाहान हिनें स्वतः लढाई मारून सोडविलें. जाहांगिरानें अनेक लढाया

जिंकिल्या, व पुष्कळ मुलुख स्वसत्तेखालीं आणिला. ह्याचे दरबारीं कपतान हाकिन्स नामक इंग्लिश राजाचा वकील होता. हा बादशाह, काश्मिराहून लाहोरास येत असतां, वाटेंत, दम्याच्या उपद्रवानें, इ० स० १६२७ च्या आक्टोबर महिन्यांत मरण पावला. तेव्हां तो ६० वर्षांचा होता. ह्याचे कारकीर्दींत आशिया खंडा मध्यें तंबाखूचा प्रचार प्रथमतः झाला.

त्याच (१६२७) वर्षी, दक्षिणेंत मराठी राज्याची स्थापना करणारा शिवाजी राजा जन्मला, त्याची, त्याच्या राज्याची, व त्याच्या वंशजांची हकीकत आह्मी ह्याच्या पुढच्या भागांत तपशीलवार लिहिणार आहों; ह्मणून येथें ह्याविषयीं आणखी लिहीत नाहीं.

जाहांगीर मरण पावल्यावर त्याचा पुत्र शहाजहान हा बादशाहा झाला. ह्यानें बाप जीवंत असतांच बंड केलें होतें. त्यानें दक्षिणेंत स्वारी करून, आपलें वर्चस्व गोंवळकोंडें, विजापूर, आणि अहमदनगर येथील राजांकडून कबूल करविलें. त्या स्वारीमुळें देशांत धुमाळी होऊन, इ० स० १६२९ व १६३० ह्या दोन वर्षांत भयंकर दुष्काळ पडला. त्याच्या योगानें किती एक प्रदेश बेचिराख झाले. शहाजहानानें, आपले पुत्र, दारा, सुजा, औरंगजेब आणि मुराद ह्यांजवर फार विश्वास ठेविल्यामुळें त्यांस बंडें करण्यास सहज फावलें_

त्यांपासून बादशाहास फारच त्रास झाला. औरंगजेब हा अत्यंत कपटी होता. त्यानें आपले इतर बंधूंस हतवीर्य करून, बापास कैदेंत टाकून, इ० स० १६५८ ह्या वर्षीं राज्यसिंहासन बळकाविलें.

शहाजहानास इमारतींचा फार शोक असे. मूमताझमहल ह्मणून एक त्याची राणी होती, तिची त्यानें कबर बांधिली. तिलाच सांप्रत ताजमहाल ह्मणतात. ही अनुपम इमारत आग्रा शहरांत यमुनेच्या कांठीं आहे. ही तयार करण्यास २०००० मनुष्यें २२ वर्षें खपत होतीं, व हीस ३१७४८०२६ रुपये खर्च लागला, असें एके ग्रंथांत लिहिलें आहे. शहाजहानानें आपणास बसण्याकरितां रत्नखचित मयुरासन केलें त्यास साडेसाहा कोट रुपये लागले. शिवाय त्याजपाशीं बहुमोल दागिने अनेक होते; व २४००००००० रुपये रोख शिलक होते. तो आपल्या वयाच्या ७४ व्या वर्षीं, इ० स० १६६५ त मरण पावला.

औरंगजेबानें गादीवर बसतांच प्रथमतः आपले भावांस नाहींतसें केलें. नंतर त्यानें, शिवाजीराजा दक्षिणंत पुंडावा करीत होता, त्याजवर सरदार शाहिस्तेखान व पुत्र मोअजीम ह्यांस मोठ्या सैन्यासहवर्तमान पाठविलें. परंतु त्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. इ० स० १६७६ त सतनरामी ह्या जातीच्या बैराग्यांनीं बंड

केलें. तें औरंगजेबानें मोडिलें. इ० स० १६८० त शिवाजी मरण पावून त्याचा पुत्र संभाजी त्याचे गादीवर बसला.

औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी करून, गोंवळकोंडें आणि विजापूर हीं राज्यें घेतलीं. तेणेंकरून त्याला पुष्कळ मुलूख मिळाला. त्याचें राज्य फार वाढलें. त्यामुळें त्यांत व्यवस्था कमी झाली. आणि मराठे बळावत चालले.

औरंगजेब इ० स० १७०७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या एकविसाव्या तारखेस मरण पावला. तेव्हां तो ८९ वर्षांचा होता. त्याचे हातून पुष्कळ क्रूर कर्मे घडलीं होतीं. त्यांची त्यास मरतेवेळीं आठवण झाली. व त्यांबद्दल त्यानें फार पश्चात्ताप केला. तो मोठा स्वधर्माभिमानी असे. रजपूत लोकांनीं धर्म स्वीकारावा ह्मणून त्यानें त्यांजवर कर बसवून व जुलूम करूनही पाहिलें. परंतु तें सगळें फुकट गेलें. त्या लोकांनीं बंड केलें, त्यापासून त्याला त्रास मात्र फार भोगावा लागला.

हा बादशाहा मृत्यु पावला, तेव्हांच मोंगलांच्या राज्यास उतार लागला असें समजलें पाहिजे. कांकीं, कांहीं बादशाह ह्याचे मागें ह्याचे गादीवर बसले, ते अगदीं अप्रयोजक असल्यामुळें त्यांचें राज्य दिवसें दिवस

कमीकमी होत जाऊन, शेवटीं लय पावलें. त्याची थोडीशी हकीकत सांगतों.

औरंगजेबाचे मागें त्याचा पुत्र अजीम हा दिल्लींत राज्य करूं लागला. त्यास त्याचा बंधु मोअजीम उर्फ बहादुरशाह ह्यानें पदच्युत करून राज्य घेतलें. कामबक्ष, औरंगजेबाचा तिसरा मुलगा, हा दक्षिणेंत अंमल करीत होता, तो बहादुरशाहाचें ऐकेना, ह्मणून त्यानें त्यावर स्वारी केली. त्यांचें युद्ध चाललें असतां कामबक्ष मरण पावला. इ० स० १६७५ पासून शीक लोकांचें बंड राज्यांत माजलें होतें, तें बाहादूरशाहानें मोडिलें. तो इ० स० १७१२ त, लाहोर येथें ७१ वर्षांचा होऊन मरण पावला.

बाहादूरशाहा निवर्तल्यावर, पुष्कळ बखेडे होऊन शेवटीं, त्याचा मुलगा जाहांदर हा गादीवर बसला. त्याचा पुतण्या फिरूकशीर, बंगाल्यांत होता, त्यानें बंड-करून, आग्र्याजवळ बादशाहाचा पराभव केला, व त्यास दिल्ली येथें ठार मारिलें. ह्याप्रमाणें फिरुकशीर तक्तावर बसला. त्याचे साह्यकर्ते दोन सरदार होते. एक हुसेनअली व दुसरा अबदुल्लाखान. ह्यांचें व बादशाहाचें कांहीं गोष्टीवरून वैमनस्य पडलें. तेंव्हां हुसेनअलीनें दक्षिणेंतून बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांजकडून १०००० मराठे लोक आणून, त्यांचे साह्यानें फिरुकशीर

ह्यास पदच्युत करून ठार मारिलें. हे दोघे सरदार भाऊ भाऊ होते. ते **सय्यदबंधु** ह्या नांवानें प्रसिद्ध असत.

**सय्यदबंधूंनीं, फिरुकशिराचे** गादीवर प्रथमतः रफिउद्दर्जात व नंतर रफिउद्दवला, हे अज्ञान बादशाह बसाविले, व सर्व राज्यकारभार आपण चालविला. पुढें इ० स० १७२० त एक **सय्यद** मेला व दुसरा पदच्युत झाला. तेव्हां **महमदशाह** नामक बादशाह गादीवर होता. त्यानें **असोफजा** हा सरदार दक्षिणच्या सुभ्यावर पाठविला. इ० स० १७३७ ह्या वर्षीं बाजीराव बल्लाळ पेशवे ह्यांनीं **दिल्लीवर** स्वारी केली. त्यांचें व **असोफजाचें भोपाळ** शहराजवळ मोठें युद्ध होऊन, **असोफजा** पराभव पावला. आणि त्यानें, **नर्मदा** व **चंबळा** ह्या नद्यांमधला मुलूख व ५०००००० रुपये, बादशाहाकडून देवविण्याविषयीं पेशव्यांशीं कबूल केलें.

इतक्यांत, इ० स० १७३९ मध्यें, इराण देशाचा बादशाह **नादीरशाह** ह्यानें **दिल्लीवर** स्वारी करून बादशाहाचा पराभव करून तें शहर घेतलें. **महमदशाहाही** त्याचे स्वाधीन झाला. **नादीरशाहा** मेला, अशी खोटी बातमी मोंगलांच्या सैन्यानें उठविल्यावरून, त्यास फार क्रोध आला. आणि त्यामुळें ३०००० हिंदी लोक प्राणास मुकले. इराणच्या बादशाहानें, बहुमोल मयुरासन, व ८।९ कोटि रुपयांची लूट मिळविली;

महमदशाहास पुनः गादीवर बसविलें; आणि दिल्लीच्या एका राजकन्येशीं आपल्या मुलाचें लग्न लावून दिलें. नंतर, पुष्कळ हत्ती, उंटें, व शेंकडों कारागीर बरोबर घेऊन तो स्वदेशीं गेला. पुढें त्याचा सरदार अहंमदशाह दुराणी ह्यानें इ० स० १७४५ त हिंदुस्थानाकडे चाल केली होती. परंतु, त्याचा पराभव महमदाच्या फौजेनें केला, तेव्हां तो मागें हटला.

पुढें अहमदशाहा, अलमगीर, इत्यादि बादशाह दिल्लीच्या गादीवर बसले. परंतु, ते अगदीं दुर्बल असल्यामुळें, त्यांचें राज्य नाहींसें झालें.

---

## भाग चवथा.

### मराठ्यांविषयीं.

इ. स. १६२७ पासून इ० स० १७०८ पर्यंत.

मराठे लोक प्रथमतः विजापूरच्या राज्यांत उदयास आले. त्यांत चंद्रराव मोरे, राव नाईक निंबाळकर म्हणजे फलटणराव, झुंजारराव घाटगे, रावमोरे घोरपडे, डफळे, सावंत बहादूर, हे प्रख्यात झाले. तसेच अहमदनगरच्या राज्यांत जाधवराव व भोंसले, हे नामांकित होते. जाधवरावाला निजामशाई सरकारांतून १०००० स्वारांची मनसब होती.

मराठी राज्याची स्थापना करणारा शिवाजीराजा भोंसला, ह्याचा पणजा बाबाजी भोंसला, हा उदेपूरच्या राण्याचा पुत्र होता. तो खानदेशांतील एका राजाच्या नौकरीस राहून वाढत वाढत, पुण्याजवळ जमीनदारी मिळविता झाला. त्याचा मुलगा मालोजी. त्याचे पोटीं शाहाजी भोंसला जन्मला. त्यास जाधवरावाची कन्या जिजाबाई ही दिली. ही शिवाजीची आई. शिवाजी, इ० स० १६२७ त शिवनेरी किल्ल्यामध्यें जन्मला. त्याचा बाप विजापूरकरांचे चाकरीस होता ह्मणून त्याला कर्नाटकांत राहावें लागे. शिवाजी, दादोजी कोंडदेव नामक ब्राह्मणाच्या शिक्षेत, आपलें जमीनदारीचें गांव पुणें येथें राहात असे. त्याला लिहिणें पुसणें कांहीं येत नव्हतें. दांडपट्टा वगैरे शिपाईगिरीचीं कामें मात्र त्यास शिकविलीं होतीं.

त्यानें आपले वयाचे १७ व्या वर्षी विजापूर सरकारचा तोरणा किल्ला लढून घेतला. व दादोजी कोंडदेव मेल्यावर, शिवाजी, आपल्या बापाची जमीनदारी स्वतः वहिवाटूं लागला. त्यानें फारच पुंडाई माजविली, तेव्हां त्यास ताब्यावर आणण्याकरितां विजापूरकरांनीं शाहाजीस कैदेंत घातलें. शिवाजीनें दिल्लीच्या शहाजहान बादशाहास शरण जाऊन, त्याच्या तंत्रानें आपले बापास मुक्त करविलें. नंतर शिवाजीच्या पारिपत्यास

विजापूरकरांनीं अफझुलखान नामक सरदार पाठविला. त्याशीं अति नम्रपणानें एकांत करण्याचा घाट आणून शिवाजीनें त्याचे पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतला. तेव्हां अर्थात त्याच्या फौजेचा मोड करण्यास त्यास अगदीं सोपें पडलें. इतक्यांत विजापुरचे दरबारांत दुफळी झाली. तेणेंकरून शिवाजीला स्वार्थ साधण्यास चांगलें फावलें. शेवटीं त्यास ५०००० पायदळ व सात हजार स्वार इतकें सैन्य ठेवण्याविषयीं त्या सरकारांतून परवानगी मिळाली.

पुढें शिवाजी दिल्लीचा बादशाहा औरंगजेब ह्याचे मुलखांत लूट करूं लागला. तेव्हां षाहिस्तेखान नामक सरदार मोठ्या सैन्यासहवर्तमान त्यानें शिवाजीवर दक्षिणेंत पाठविला. तो पुण्यास जाऊन दादोजी कोंडदेवाच्या वाड्यांत राहिला. शिवाजीनें, त्याच्या सैन्यांतील मराठे लोकांस लांचानें वश करून घेऊन, भर दिवसा, षाहिस्तेखान निजला होता तेथें प्रवेश केला. तेव्हां गलबल होतांच, तो सरदार खिडकीवाटे उडी टाकून पळून बचावला, परंतु त्याचा मुलगा प्राणास मुकला. इतक्यांत शिवाजीही निसटून पार झाला. एवढें त्याचें साहस पाहूनच षाहिस्तेखान चकित होत्साता परत दिल्लीस निघून गेला. नंतर लवकरच, इ० स० १६६४ च्या आरंभीं शिवाजीनें सुरत शहर

लुटून तेथून एक कोटि रुपये नेले. ह्या संधीस त्यानें ८७ गलबतें व त्यांवर ४००० लोक, इतकें आरमारही ठेविलें.

पुढें इ० स० १६६६ त, **औरंगजेबानें जैशिंगनामा** सरदार **शिवाजीवर** पाठविला. त्याबरोबर फार मोठी फौज होती. ह्यानें **शिवाजीस** जेरीस आणिलें. तो नम्र होऊन बादशाहास भेटण्याकरितां **दिल्लीस** गेला. तेथें त्यास **औरंगजेबानें** नजरकैदेंत ठेविलें. तेव्हां, तो मोठ्या युक्तीनें तेथून पळून गेला. त्या समयीं त्याचा मुलगा **संभाजी** हाही बरोबर होता.

तिकडून आल्यावर, आपली सर्व जमाजम पुनः करून, तो आपणास राजा ह्मणवूं लागला. त्यानें आपले नांवाचें नाणें पाडिलें, व इ० स० १६७४ च्या जूनच्या पहिल्या तारखेस **रायगड** किल्ल्यावर राज्याभिषेक करविला. त्याचे प्रधान आठ असत. त्यांत पेशवा मुख्य. त्यानेंच पुढें त्याच्या वंशाचे हातून राज्य काढून आपलेकडे घेतलें.

गादीवर बसल्यानंतर देखील **शिवाजीनें हुबळी**, **जालना**, **बारसीलोर**, इत्यादि व्यापाराच्या मोठ्या पेंठा लुटिल्या. **गोंवळकोंड्याच्या** राजापासून खंडणी घेतली. आणि शेवटची मोहीम, **शिवाजीनें**, **कर्नाटकांत** करून, **श्रीरंगपट्टणापर्यंत** मुलूख लटून आपला भाऊ

व्यंकोजी ह्याजपासून बापाच्या वेळच्या जहागिरीची वांटणी मिळविली. शेवटीं तो, इ० स० १६८० च्या एप्रिलच्या पांचवे तारखेस, गुडघीच्या रोगानें रायगडीं मरण पावला. तो महाकपटी, लुटारू, आणि परक्या प्रजेविषयीं अत्यंत क्रूर असा होता. त्यानें रामदास स्वामी गुरु केला होता.

शिवाजीला दोन पुत्र होते. एकाचें नांव संभाजी, आणि दुसऱ्याचें नांव राजाराम. वडील संभाजी ह्मणून तो शिवाजीचे मागें त्याचे गादीवर बसला. त्यानें आधीं राजारामाला कैदेंत घालून, त्याचे आईस व तिच्या पक्षाचे लोकांस ठार मारिलें. नंतर त्यानें जिंजिऱ्याच्या शिद्दीशीं व पोर्तुगाल देशचे लोकांशीं कांहीं युद्धें केलीं; पण त्यांपासून त्याला फारसा लाभ झाला नाहीं. संभाजी फार मूर्ख आणि व्यसनी निघाला. त्यानें आपल्या बापाच्या वेळच्या अनुभव घेतलेल्या सुज्ञ प्रधानांस घालवून देऊन, कलुशा ह्या नांवाच्या एका कनोज ब्राह्मणास सर्व राज्याचा कारभार सांगितला. तोही आपले यजमानासारखाच दुर्व्यसनी होता, त्यामुळें राज्यांत अव्यवस्था झाली.

हें औरंगजेबाला समजतांच, तो, मराठ्यांचें राज्य बुडविण्याची ही चांगली वेळ साधण्यासाठीं दक्षिणेंत मोठी फौज घेऊन आला. एके दिवशीं संभाजी संगमे-

श्वर येथें दारू पिऊन धुंद झाला असता, मोंगलांचा सरदार तकरीबखान ह्यानें त्यास धरिलें; आणि बादशाहा तुळापुरास होता, तेथें पाठविलें. त्याबरोबर कलुशाही होता. औरंगजेबानें संभाजीस मुसलमानी धर्म स्वीकारावयास सांगितलें. तेंव्हां त्यानें त्याची समक्ष फार निंदा केली, तेणेंकरून बादशाहास राग येऊन, त्यानें संभाजीचे व त्याच्या प्रधानाचे फार हाल करून त्यांचे जीव घेतले. ही गोष्ट इ० स० १६८९ त घडली.

संभाजीची बायको येसूबाई, तिचा पुत्र शिवाजी, हा आपले बापाचे मरणकाळीं केवळ ६ वर्षांचा होता. ह्मणून त्या उभयतां मायलेंकरांस रायगड किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें ठेवून राजारामास गादीवर बसविलें. पुढें इ० स० १६९० त तो किल्ला मोंगलांनीं घेतला, तेंव्हां तीं दोघेंही त्यांचे हातीं सांपडलीं. त्यांस त्यांनीं दिल्लीस पाठविलें. ह्यास्तव राजाराम गादीवर बसला.

राजाराम जिंजी किल्ल्यांत राहात असे. त्यास जिंकण्याकरितां औरंगजेबानें झुलपिकारखान नामक सरदार पाठविला. मराठे सरदारांनीं त्याचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. उलटें, मोंगलाच्या मुलखांतून चौथाई, सरदेशमुखी, व घांसदाणा हे कर घेतले. ह्यां पैकीं तिसरा ह्मणजे घांसदाणा हा कर मात्र नवा. बाकीचे दोन चौथाई आणि सरदेशमुखी शिवाजी

राजानें दिल्लीच्या बादशाहाच्या आज्ञेवरून विजापूरक- रांच्या राज्यांत पूर्वींच चालू केलेले होते. चौथाई म्हणजे उत्पन्नाचा चौथा हिस्सा; आणि सर देशमुखी म्हणजे दाहावा हिस्सा, असे अर्थ आहेत. राजारामाच्या वेळीं रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, प्रल्हाद निराजी, हे पुरुष प्रख्यात कारभारी होते. ह्या राजानें सातारा ही आपली राजधानी केली. तो इ० स० १७०० ह्या वर्षीं सिंहगडीं मरण पावला. नंतर एका महिन्यानें सातारा औरंगजेबानें घेतला, आणि तेथील किल्ल्यास अजीमतारा असें नांव दिलें. पुढें लागलेंच मोंगलसैन्य दक्षिणेंतून निघून गेलें.

राजाराम मरण पावल्यानंतर, त्याची बायको ताराबा- ई, हिनें आपला पुत्र शिवाजी, ह्यास गादीवर बसवून संपूर्ण राज्याचा कारभार आपण चालविला. तिच्या कारकीर्दीत मराठ्यांचें लक्ष्य लुटीकडे फार होतें. त्यां नीं दक्षिणेंतील कितीएक गांव जमीनदोस्त केले; आणि गुजराथ व माळवा ह्या प्रांतांस स्वाऱ्या करून तेथील बादशाहांपासून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क घेतले. परशुराम त्रिंबक ह्यानें सातारा आपले अमलांत परत आणिला.

इतक्यांत, इ० स० १७०७ ह्या वर्षीं औरंगजेब निव-

र्तला. त्याचे गादीवर अजीमशाहा बसला. त्यास आपल्या मुक्ततेविषयीं, शिवाजीनें, ह्मणजे संभाजीचा पुत्र आपल्या मातुश्रीसहवर्तमान दिल्लीमध्यें कैदेंत होता, त्यानें अर्ज केला. त्यापासून आशंकितपणाचें वचन घेऊन बादशाहानें त्यास सोडिलें. तो तेथें १७ वर्षे कैदेंत होता. त्याजवर औरंगजेब, व त्याची कन्या बेगमसाहेब हीं फार प्रीति करीत. त्यामुळें औरंगजेबानें आपल्या दोघां मोठ्या मराठ्या सरदारांच्या दोन कन्यांशीं त्याचीं लग्नें लावून देऊन, शिवाय अक्कलकोट, इंदापुर, नेवासें, व सुपें हे गांव त्यास जहागीर दिले होते. तो बादशाह, त्याचा आजा शिवाजी ह्यास चोर ह्मणे, व त्यास साव ह्मणे, त्यावरून ह्या पुरुषाचें नांव शिवाजी असतां शाहू असें पडलें.

इ० स० १७०८ त शाहू दक्षिणेंत आला, आणि त्यानें ताराबाईशीं लढून आपलें राजपद मिळविलें. त्या लढाईच्या गडबडींत कोणी एका बाईनें आपला लहान मुलगा शाहूच्या पायांवर आणून घातला. त्यास त्यानें फत्तेशिंग असें नांव ठेवून वाढविलें. तोच पुरुष अक्कलकोटच्या भोंसले राजांचा मूळ पुरुष झाला. शाहू गादीवर आल्यामुळें ताराबाई आपल्या पुत्रासहवर्तमान कोलापुरास गेली. आणि तिनें तेथें, इ० स० १७१२ त वेगळें राज्य स्थापिलें.

**शाहूच्या** कारकीर्दीत मराठ्यांनीं ह्मणण्यासारखा कोठें पराक्रम केला नाहीं. तो स्वतः विलासी असे. त्यानें आपल्या राज्याचा सगळा कारभार, आपला पेशवा, **बाळाजी विश्वनाथ** भट, श्रीवर्धनचा कुळकरणी, ह्याजकडे दिला. त्यानें **शाहूला** गादीवर बाहुल्याप्रमाणें मानून सर्व राज्य आपण हांकिलें. तो मोठा मसलती असल्यामुळें दिल्लीच्या दरबारीं त्याचें चांगलें वजन असे. **शाहू** इ० स० १७४९ त निवर्तला. तेव्हां पेशवे सर्व राज्याचे केवळ मालक होऊन बसले होते. **शाहूचे** मागें त्याचे गादीवर **राम**राजा, दुसरा **शाहू**, **प्र**तापसिंह, आणि **शा**हाजी इतके पुरुष बसले. ते केवळ परतंत्र होते.

**बाळाजी विश्वनाथाचे** मागें त्याचे वंशज पेशव्याचें पद पावत गेले. त्याचें व इतर कितीएक एतद्देशीय राजांचीं राज्यें शेवटीं दूरच्या बेटांतील लोकांनीं घेतलीं. त्यांविषयीं जसा जसा ओघ येईल त्याप्रमाणें त्यांचें पुढें वर्णन करूं.

---

## भाग पांचवा.

### इंग्लिशांचा उत्कर्ष, व पेशवे.

इ० स० १६७५ पासून १७५६ पर्यंत.

ख्रिस्ती शकाच्या १५ व्या व १६ व्या शतकांत **पोर्तु**गीज, **द**च, इंग्लिश. **फ्रें**च, इत्यादि **युरो**पांतल्या

लोकांनीं हिंदुस्थानामध्यें प्रथमतः व्यापाराच्या निमित्तानें प्रवेश केला. इ० स० १५१० त पोर्तुगीज लोकांनीं मलबार किनाऱ्यावर व्यापार मांडला. इंग्लिशांनीं इ० स० १६१२ ह्यावर्षीं सुरतेस वखार बांधिली. त्याच शहरांत फ्रेंचांनीं इ० स० १६७५ त व्यापार चालू केला, व पुढें चार वर्षांनीं पोंदेशरी येथें मुख्य ठाणें घातलें. देन्स लोक त्रांक्विबार येथें व्यापार करूं लागले. ह्या लोकांनीं हिंदुस्थानांत व्यापार करण्याविषयीं आपापले राजांपासून सनदा घेतल्या होत्या. त्यांच्या अशा व्यापारी मंडळीस कंपनी अशी संज्ञा असे. इंग्लिशांच्या कंपनीस ईस्तइंदिया कंपनी असें नांव होतें.

पुढें व्यापार वाढतां वाढतां इंग्लिशांस मद्रास, मुंबई, आणि कलकत्ता हीं शहरें मिळालीं. फ्रेंचांचा मुख्य गव्हरनर दुप्ली असे. त्याची बुद्धि फार खोल होती. फ्रेंच व इंग्लिश ह्या दोन्ही कंपन्यांचा उद्देश एक असल्यामुळें, ह्मणजे उभयतांचेही मनांत हिंदुस्थानामध्यें व्यापार करण्याचा आला ह्मणून त्यांचें वैमनस्य आलें. इतक्यामध्यें युरोपांत इंग्लंद व फ्रान्स ह्यांचें युद्ध सुरू झाल्याची खबर समजली. तेव्हां उघड वैर लागून, फ्रेंचांचा सरदार लाबोरदोने ह्यानें हल्ला करून इ० स० १७४७ त मद्रास घेतली. तेव्हां तो जळमार्गानें आला होता, व त्याजबरोबर खलाशांसुद्धां सुमारें ३७००

लोक होते. आंत सांपडलेल्या इंग्लिश लोकांस त्या फ्रेंच सरदारानें प्रतिबंधांत ठेविलें. हें समजतांच इकडे इंग्लिशांनीं पोंदेशरीस वेढा घातला. परंतु इ० स० १७४८ त युरोपामध्यें फ्रेंच व इंग्लिश ह्यांचा तह ठरला. त्याच्या योगानें मद्रास इंग्लिशांस परत मिळाली.

तंजावरच्या शाहूराजास पदच्युत करून प्रतापसिंह नामक दासीपुत्रानें त्याची गादी बळकाविली होती. तेव्हां देविकोट किल्ला देऊं करून शाहूनें इंग्लिशांपाशीं साह्य मागितलें. तें ते देऊं लागले, तों प्रतापसिंह देविकोट देऊन आणखी कांहीं मुलूखही त्यांस देण्यास कबूल झाला. तें त्याचें बोलणें मान्य करून इंग्लिशांनीं शाहूचा पक्ष सोडिला. ही गोष्ट इ० स० १७४९ त घडली.

ह्याच वेळेच्या सुमारास निजामाचे गादीचा मालक नासिरजंग, व अर्काटचा नबाब अनवरुद्दीन, ह्यांस यथानुक्रमें मुझफरजंग व चंदासाहेब हे शत्रु उत्पन्न झाले. त्यांनीं फ्रेंचाचें साह्य मागितलें. तें त्यांस तात्काळ मिळालें. इंग्लिशांनीं नासिरजंग व अनवरुद्दीन ह्यांचा पक्ष धरिला. उभयतांकडील सैन्याचीं कितीएक युद्धें झालीं. शेवटीं फ्रेंच जय पावले. त्यांनीं चंदासाहेबांस अर्काटचा नबाब केलें. त्याबद्दल त्यानें त्यांस पोंदेशरीजवळ ८१ गांव बक्षीस दिले.

तसेंच इकडे नासिरजंगास व मुझफरजंगास डुर्लीनें पठाणाकडून ठार मारवून निजामाचा एक पुत्र सलाबतजंग नामें होता, त्यास निजामाचे गादीवर बसविलें. अंबूर येथें मोठा संग्राम होऊन अनवरुद्दीन पडला, व त्याचा पुत्र महमद अल्ली हा त्रिचनापल्ली येथें पळून जाऊन राहिला होता. त्याशीं इंग्लिशांचें सख्य, व फ्रेंच आणि चंदासाहेब ह्यांचें वैर होतें; ह्मणून शत्रूंनीं त्रिचनापल्लीस मोठया सैन्यानिशीं वेढा दिला. तो उठविण्याविषयीं इंग्लिश लोक विचार करूं लागले.

हा वेढा उठविण्याची कल्पना राबर्ट क्लैव नामक एका इंग्लिश सरदारानें काढिली. ती अशी कीं, नबाबाची प्रियराजधानी अर्काट, हिजवर हल्ला करावा; ह्मणजे चंदासाहेबांचें सैन्य सहजच तिच्या संरक्षणार्थ तिकडे जाईल, आणि इकडचा वेढा नाहींसा होऊन महमद अल्ली सुटेल. ही युक्ति त्यानेंच स्वतः २०० गोरे लोक, ३०० काळे लोक, व ३ तोफा, इतकें सैन्य अर्काटावर घेऊन जाऊन, व तें शहर हस्तगत करून सिद्धीस नेली. त्रिचनापल्लीचा वेढा उठला. महमद अल्लीस साह्य पोंचलें. आणि इंग्लिशांस उमेद आली. ही गोष्ट इ० स० १७५१ त घडली.

ह्या आलीकडच्या लढायांत फ्रेंच व चंदासाहेब अगदीं टेंकीस आले. नबाबास आश्रय नाहींसा झाल्या-

मुळें, तो तंजावरच्या राजाच्या हातीं लागला. त्यानें त्यास ठार मारिलें. आणि इकडे महमदअल्ली ह्यास इंग्लिशांनीं अर्काटच्या नबाबगिरीचीं वस्त्रं दिलीं. हें कृत्य इ० स० १७५४ त झालें.

ह्याप्रमाणें कर्नाटकामध्यें फ्रेंचांचें वर्चस्व नाहींसें झालें, तरी, निजामाच्या दरबारांत ते चांगलें वजन बाळगून होते. सलाबतजंग मागचे उपकार स्मरून त्याचे हातून पाणी पीत असे. त्यानें बुसी नामक एका फ्रेंच अधिकाऱ्याकडे मदापल्लीपासून जगन्नाथपुरीपर्यंत तीनशें कोस प्रांताचें काम सांगितलें.

इकडे बाळाजी विश्वनाथ पेशवा, इ० स० १७२० त निवर्तल्यावर, त्याचा वडील पुत्र बाजीराव हा पेशवा झाला. त्यानें, इ० स० १७३१ ह्या वर्षी बडोद्याजवळ लढाई करून त्रिंबकराव दाभाडा मारिला. व निजामास वेढा घालून त्यापासून पाहिजेत तसे करार त्यानें करून घेतले. ह्याचे कारकीर्दींत मल्हारराव होळकर इंदूरच्या संस्थानाचा स्थापक, राणोजी शिंदा ग्वाल्हेरच्या संस्थानाचा मूळ पुरुष, व पिलाजी गायकवाड हे उदयास आले. ह्या पेशव्याचा भाऊ चिमणाजी आपा ह्यानें कोंकणामध्यें पोर्तुगीज लोकांशीं लढून, त्यांचा पराभव केला. बाजीराव इ० स० १७४० त वारला.

नंतर त्याचा पुत्र बाळाजी, ज्यास नानासाहेब म्हणत,

तो पेशवा झाला. त्यापासून रघूजी भोंसला ह्यानें इ० स० १७५० त बंगाल, बहार, व अयोध्या हे प्रांत शिरजोरपणानें घेतले. नंतर पुणें शहर पेशव्याची राजधानी झालें. नानासाहेबाचे वेळीं त्याचा सखा भाऊ रघुनाथराव ह्यानें, इ० स० १७५८ त हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली; आणि पंजाबांत अहमदशाह अबदाली ह्याचा सुभेदार होता, त्यास घालवून देऊन तेथें अपला अंमल बसविला. हें अहमदशाहास कळतांच तो बरोबर मोठें सैन्य घेऊन मराठ्यांवर आला. त्याशीं लढण्याकरितां, चिमणाजी आपाचा पुत्र सदाशिवराव भाऊ, व पेशव्याचा थोरला मुलगा विश्वासराव, हे, १५००० पायदळ, ५५००० स्वार, २०० तोफा, आणि २००००० बाजार बुणगें, इतक्या फौजेसहवर्तमान, चालून गेले. उभयपक्षांची लढाई, इ० स० १७६१ च्या जानेवारी महिन्यामध्यें पानपताजवळ झाली. तींत मराठे केवळ पराभव पावले. पेशव्यांच्या कुळांतले दोघेही सरदार पडले. २२००० कैदी, ५०००० घोडा, व अतोनात लूट शत्रूंस सांपडली.

आंगऱ्याशीं युद्ध करतेसमयीं नानासाहेबास इंग्लिशांनीं साह्य दिलें. त्याबद्दल त्यानें त्यांस बाणकोट व आणखी नऊ गांव इनाम दिले; व त्यांशीं तह केला. हा पेशवा इ० स० १७६१ च्या जून महिन्याच्या अखे-

रीस पुण्यांत पर्वतीच्या देवळांत मरण पावला. ह्याचे वेळीं पुष्कळ सुखें प्रजेस प्राप्त झालीं.

---

## भाग सहावा.

### बंगाल्यांतील वर्तमानें.

इ० स० १७५६ पासून इ० स० १७६० पर्यंत.

बंगाल्याचा सुभेदार अलिवर्दीखान हा, उदररोग होऊन, आपले वयाचे ८० वे वर्षी, इ० स० १७५६ त मरण पावला. नंतर त्याचे गादीवर, त्याचा पुतण्या सुराजउद्दवला हा बसला. तो स्वभावानें फार क्रूर, जुलमी, व्यसनी, आणि लोभी असा असे. त्याच्या मुलखांतला कोणी एक श्रीमान व्यापारी अन्यायास त्रासून, आपल्या विपुल द्रव्यासहवर्तमान कलकत्त्यास येऊन इंग्लिशांच्या आश्रयाखालीं राहिला. ते त्यास नबाबाच्या इच्छेप्रमाणें त्याचे स्वाधीन करीनात, हें एक कारण; व इंग्लिश लोकांनीं कलकत्त्याच्या सभोंव-तालची भिंत, त्याची परवानगी न घेतां नीट करण्याचें काम सुरू केलें, हें दुसरें. हीं दोन कारणें बाह्या-त्कारें दाखवून, केवळ दुष्टपणानें द्रव्याची आशा धरून सुराजउद्दवला ह्यानें, इ० स० १७५६ च्या जून महिन्यांत कलकत्त्यावर स्वारी केली. तेव्हां तेथील मुख्य मुख्य

इंग्लिश अंमलदार जाहाजांत बसून पळून गेले. तरी १४६ इंग्लिश लोक शत्रूच्या हातीं लागले. त्यांस नवाबाच्या लोकांनीं एका लहानशा अंधार कोठडींत रात्रभर कोंडून ठेविलें. त्यांतले १२३ लोक उजाडण्यापूर्वीच प्राणांस मुकले; आणि बाकी २३ मात्र जीवंत निघाले. ह्या हल्लयांत सुराजउद्दवल्यास इंग्लिशांच्या खजिन्यांत सुमारें ५०००० रुपये सांपडले.

हें वर्तमान होत आहे तों, क्लैवसाहेब स्वदेशीं गेला होता, तो हिंदुस्थानांत परत आला. त्याला ही कलकत्त्याची हकीकत समजतांच, त्या शहरावर गोळ्यांचा भडिमार करून, तें, इ० स० १७५७ च्या जानेवारी महिन्याचे दुसरे तारखेस त्यानें नवाबाचे लोकांपासून परत घेतलें. ह्याचे पूर्वीं नुकतेंच त्यानें आंग्र्यांचें ठाणें गिर्या, हें काबीज केलें होतें.

कलकत्ता परत घेण्यासाठीं सुराजउद्दवल्याच्या सरदारानें त्यास वेढा घातला. तेव्हां त्यांतूनही रात्रीं क्लैव साहेब सैन्यासह निघून गेला. हें पाहून, इंग्लिशांपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें नबाबास वाटलें. म्हणून, त्यानें त्यांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं त्यानें इंग्लिशांच्या वखारी घेतल्या होत्या त्या परत द्याव्या; त्यांचा माल त्याजकडे असेल तो परत पाठवावा; आणि परराज्य घेण्याकरिनां अथवा स्वराज्यसंरक्ष

णाकरितां उद्योग करणें तो उभयतांनीं एकविचारें करावा. ह्या तहानंतर लवकरच फ्रेंचांचें चंद्रनगर क्लैवसाहेबानें घेतलें.

ह्याप्रमाणें बाह्यात्कारें तह झाला तरी इंग्लिश व नबाब ह्यांचे मनांतील परस्परांविषयींचें वैर मोडलें नाहीं. नवाबाच्या दुष्ट आचरणास खुद त्याचे मंत्री, सरदार, व प्रजा, हीं त्रासून गेलीं होतीं. आणि त्यास पदच्युत करण्याविषयीं मसलत चालली होती. तींत, अलिवर्दीखानाच्या बहिणीचा नवरा मीरजाफर, सुराज-उद्दवला ह्याचा सेनापति, हा प्रमुख होता. त्यानें आपला बेत कलकत्त्याच्या इंग्लिश लोकांस कळविला. त्यांस तो फार पसंत पडला; आणि तेही त्यांत शिरले. व, इंग्लिशांनीं नवाबाशीं लढाई करण्याचा प्रसंग आणावा, आणि मीरजाफरानें आयत्या वेळीं त्यांस सैन्यासह येऊन मिळावें, असें ठरलें.

नंतर इंग्लिशांनीं मागच्या कलहाची कुरापत काढून, नबाबाशीं लढण्याकरितां नऊशें गोरे लोक, दोन हजार काळे शिपाई, आठ तोफा आणि दोन जंजाला, इतकी सामग्री सिद्ध केली. तिचा मुख्य अधिकारी क्लैवसाहेब होता. नवाबाकडे ३५००० पायदळ, १५००० स्वार, आणि ४० तोफा, एवढी फौज तयार होऊन निघाली. ह्या सैन्यांचें तुमुल युद्ध, इ० स०

१७५७ च्या जून महिन्यांत प्लासी येथें झालें. त्यांत नवाब अपजय पावून समरांगणांतून दोन हजार लोकांनिशीं पळून गेला. आणि मीरजाफर संकेतानुरूप इंग्लिशांस येऊन मिळाला. ह्या लढाईंत इंग्लिशांकडचे सुमारें ७२ लोक मात्र निकामी झाले. आणि शत्रूकडचे निदान ५०० तरी लोक प्राणांस मुकले असावे, असा स्वतः क्लैवसाहेबानें अजमास केला.

ह्या एका जयानें बंगाल, बहार, आणि ओढ्यादेश ह्या तीन प्रांतांचा धनी जो बंगालचा नवाब, तो इंग्लिशांनीं अगदीं आपले हातचा करून ठेविला. प्लासीची लढाई संपतांच त्यांनीं मीरजाफरास नवाबाचे गादीवर बसविलें. त्यानें त्यांस सवादोन कोटी रुपये खर्चाबद्दल, वगैरे देऊं केले. त्यांपैकीं निमे ऐवज क्लैवसाहेबानें रोख घेतला. आणि बाकी राहिलेली रकम नवाबानें तीन वर्षांत तीन हप्त्यांनीं द्यावी, असें ठरविलें.

सुराजउद्दवला पळत असतां त्यास त्याच्या एका दावेदाऱ्यानें पकडून मीरजाफराकडे नेलें. त्यानें त्यास आपला मुलगा मीरन ह्याचे हवालीं केलें. त्यानें मारेकऱ्यांचे हातून त्याच रात्रीं त्याचे प्राण घेतले. त्या पाषाणहृदय दुष्टांनीं त्यास देवाचें नांव घेण्यास देखील थोडीशी सवड दिली नाहीं.

ह्या घालमेलींत इंग्लिशांस कलकत्त्यापासून कालपी पावेतों मुलूख नवाबाकडून मिळाला. व त्यांच्या मालावर

त्याच्या मुलखांत जकात पडूं नये, असें ठरलें. शिवाय सिंहासनारूढ होतेसमयीं मीरजाफरानें अंमलदारांस बक्षीस दिलें तें वेगळेंच. एकट्या क्लैवसाहेबालाच तेवीस लक्षांपेक्षां अधिक रुपये मिळाले.

इकडे कर्नाटक प्रांतीं, महमदअल्ली ह्यानें देऊं केलेला पैसा वसूल करण्याकरितां इंग्लिशांनीं तिनवेल्ली व नेलोर ह्या प्रांतीं फौज पाठविली. ही चांगली संधी पाहून फ्रेंचांनीं त्रिचनापल्लीवर पुनः हल्ला केला. तो कप्तान कालियद ह्या इंग्लिश सरदारानें मोठ्या शौर्यानें हटविला. ही गोष्ट इ० स० १७५६ त झाली.

इ० स० १७५७ ह्या वर्षीं लाली नामक एक फ्रेंच सरदार हिंदुस्थानांत आला. त्यानें पहिल्या धडाक्यास, इ० स० १७५८ च्या जून महिन्यांत, इंग्लिशांचा सेंत देविद किल्ला घेतला. इ० स० १७५९ च्या अखेरीस लालीच्या व इंग्लिशांच्या सैन्याची लढाई वांदिवाश येथें झाली. तींत फ्रेंच पराभव पावले. ह्याच फ्रेंच सरदारानें तंजावरच्या राजावर ५६००००० रुपये मागची बाकी काढून, ती वसुलांत आणण्या करितां त्याजवर स्वारी केली. परंतु, त्यास इंग्लिशांचा आश्रय चांगला असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. ह्यापूर्वीं लालीनें हल्ला करून मद्रासचा बाहेरकोट इंग्लिशांकडून घेतला होता; पण तो त्यांनीं त्याला फारवेळ पचूं न देतां तात्काल परत घेतला. शिवाय जिंजी वगैरे अनेक किल्ले इंग्लि-

शांस मिळालें. तेणेंकरून फ्रेंचांचें बळ दिवसें दिवस अगदीं कमी कमी होत जाऊन, शेवटीं त्यांनीं हिंदुस्थानांत राजसत्ता प्राप्त करून घेण्याची आशा सोडिली.

इकडे दिल्लीचा नामधारी बादशाहा अलमगीर ह्याचा पुत्र शाहा अलम व अयोध्येचा नवाब सुराज उद्दवला ह्यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून मीरजाफराच्या मुलखांत स्वारी केली, आणि पाटण शहरास वेढा घातला. तेथचा सुभेदार रामनारायण, ह्यानें क्लैवसाहेबाच्या आश्वासनपूर्वक निरोपावर भरवसा ठेवून बरेच दिवस त्या शहराचें रक्षण केलें. इतक्यांत, क्लैवसाहेब व मीरजाफराचा पुत्र मीरन हे सैन्यासहवर्तमान त्याच्या साह्यार्थ आले. तेव्हां शाहाजादा वेढा उठवून निघून गेला. ह्याप्रमाणें बहार प्रांतांत सर्वत्र शांतता करून क्लैवसाहेब, मीरजाफराची राजधानी मुर्शिदाबाद येथें गेला. तेव्हां मीरजाफरानें त्याचें फार आभार मानून व त्यास अमीर उल् उमराव हा किताब देऊन, इंग्लिश कंपनीकडून कलकत्त्याजवळचा जो सालीना तीन लक्ष रुपये वसूल यावयाचा, तो त्यास खासगत जहागीर ह्मणून दिला. हें कृत्य इ० स० १७५९ त घडलें.

मीरजाफराला इंग्लिशांनीं गादीवर बसविलें खरें; परंतु, त्याला पुढें असें वाटूं लागलें कीं, आपणास इंग्लिशांच्या तंत्रानें वागावें लागतें हें नीट नाहीं; ह्मणून त्यानें

त्यांस हिंदुस्थानांतून काढून देण्यासाठीं डच लोकांपाशीं साह्य मागितलें. त्यांनीं चिनसुरा येथून ७०० गोरे व पुष्कळ काळे लोक कलकत्त्यानजीकच्या हुगळी नदींतून पाठवून दिले. तें समजतांच क्लैवसाहेबाच्या हुकुमावरून कर्नल फोर्दनामक इंग्लिश सरदारानें ३०० गोरे लोक व ८०० काळे लोक इतकें सैन्य आणून शत्रूंस पिटून लाविलें. हें वर्तमान इ० स० १७६० त घडलें. नंतर लवकरच क्लैव साहेब इंग्लंदास निघून गेला.

ह्याप्रमाणें इंग्लिशांच्या मनांत मीरजाफराविषयीं वांकडें आलें, व तो त्यांचा कबूल केलेला पैसा देण्यास टाळाटाळ करूं लागला. आणि ह्याच संधीस त्याच्या फोजेनें आपला मागचा मुशाहिरा मागण्याकरितां त्याच्या दारीं धरणें घेतलें. ही चांगली संधी पाहून इंग्लिशांनीं त्यास गादीवरून काढून टाकिलें, आणि त्याचा जांवई मीर कासीम ह्यास गादीवर बसविलें. त्यानें ह्या उपकाराबद्दल २०,००,००० रुपये त्यांस देऊं केले होते, त्यांपैकीं सुमारें ३,००,००० रुपये हलवेल साहेबयास व सुमारें ५,८०,००० रुपये तेव्हांचा गवर्नर वान्सितार्त साहेब ह्यास तेव्हांच मिळाले.

# भाग सातवा.

## बंगाल्यांतील वर्त्तमानें; हैदराशीं युद्ध वगैरे, इ० स० १७६० पासून इ० स० १७७९ पर्यंत.

बंगाल्याच्या नवाबगिरीचीं वस्त्रें इंग्लिशांनीं मीरकासीमास दिलीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो मीरकासीम त्यांच्या मनाप्रमाणें वर्तेना, त्यांस मागितला पैसा देईना, व आपल्या सैन्यास वेळचे वेळीं पगार वांटीना. ह्या कारणांवरून त्यास त्यांनीं इ० स० १७६३ त पदच्युत करून, मीरजाफरास पुन: गादीवर बसविलें. नंतर मीरकासीम कर्मनाशा नदी उतरून, शाहा आलम व अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला हे बुंदेलखंडावर स्वारी करण्याच्या बेतांत होते, त्यांस जाऊन मिळाला. आपली गादी आपणास इंग्लिशांनीं पुनः दिली, असें मनांत आणून ह्याही वेळीं त्यांस मीरजाफरानें पुष्कळ द्रव्य दिलें. ह्या नवाबाचे कारकिर्दीत इंग्लिशांनीं सगळ्या व्यापारांत हात शिरकवून, रयतेवर जुलूम करून व न्यायास एकीकडे ठेवून आपल्या पिशव्या भरिल्या. प्रजा अगदीं हैराण होऊन गेली. ही अव्यवस्था मोडण्याकरितां क्लैव साहेबास इंग्लंदांतून पुनः हिंदुस्थानांत पाठविलें.

इ० स० १७६३ त शाहा आलम, अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला व मीर कासीम हे एकत्र होऊन इंग्लिशांवर उठले होते. त्यांच्या व इंग्लिशांच्या सैन्याची

लढाई बक्सार येथें ता० २२ आक्टोबर रोजीं झाली. तींत इंग्लिशांचे शत्रु पराभव पावले. त्याचे २००० लोक कर्मनाशा नदींत बुडाले व २००० समरांगणावर पडले. इंग्लिशांकडचे फक्त ८४७ लोक मात्र जायां झाले. ह्या प्रसंगीं मेजर मनरो नामक इंग्लिश सरदारानें मोठा पराक्रम केला.

क्लैव साहेब विलायतेहून निघाला तो इ० स० १७६५ च्या मे महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोंहोंचला. त्यानें असें ठरविलें कीं, सरकारी कामगार लोकांनीं खासगी व्यापार करूं नये, व नजराणा घेऊं नये. हें त्या लोकांस मानवलें नाहीं; तरी त्यांची त्यानें कांहीं फिकीर न बाळगितां ती गडबड मोडिली. मीठ, तमाखू, आणि सुपारी ह्यांचे मक्ते ठरवून त्यांचें उत्पन्न मात्र त्यांनीं यथाविभागें वांटून घ्यावें असें त्यानें ठरवून ठेविलें होतें; तरी हाही ठराव पुढें फार दिवस चालला नाहीं.

आणखी एक मोठें काम क्लैव साहेबानें केलें. तें हेंच कीं, बंगाला, बहार, आणि ओढ्यादेश ह्या प्रांतांचा नवाब मीरजाफर मरून त्याची गादी, नजीब उद्दवला नजीब ह्यास मिळाली होती, त्याला सालाची ५००००००० रुपये नेमणूक ठरवून देऊन, सर्व प्रांतांचा कारभार आपले हातीं घेतला. ही गोष्ट इ० स० १७६५ च्या जून जुलै ह्या महिन्यांत घडली. नंतर लागलीच आगष्ट महिन्याच्या १२ व्या तारखेस, त्यानें, दिल्लीचा बाद-

शाहा शाहा आलम ह्याजपासून त्या प्रांताच्या स्वामित्वाची सनद कंपनीसरकारच्या नांवानें घेतली. हीं दोन्ही कामें अत्यंत महत्वाचीं होत.

म्हैसूरचा हिंदु राजा चिक्क कृष्णराय, ह्याचा कारभारी नंदराज, ह्याचे पदरीं हैदर नाईक म्हणून एक सरदार असे. त्याला मुलगे दोन; एक हैदर, आणि दुसरा शाबास. ह्यांपैकीं हैदर हा इतका शूर व साहसी निघाला कीं, त्यानें आपल्या धन्यास पादाव करून, इ० स० १७६१ ह्या वर्षी आपणास राजा ह्मणविलें.

पुढें तो फार वाढला, आणि त्यास आसपासचे संस्थानिक थरथरां भिऊं लागले. कारण, तो त्यांस फार त्रास देत असे. त्याला जिंकण्यासाठीं बाळाजी बाजीरावाचा पुत्र माधवराव पेशवा, निजामअली, आणि इंग्लिश, हे तिघे एक झाले. हें हैदरास कळतांच त्यानें ३५००००० रुपये देऊन पेशव्यास त्या कटांतून फोडिलें. आणि तसेंच आणखी पुष्कळ द्रव्य देऊन निजाम अलीस फितविलें. तेव्हां इंग्लिश एकटे राहिले. नंतर हैदरानें त्रिनोमाली येथें कर्नल स्मिथ ह्याजवर हल्ला केला. त्यांत त्याचाच पराजय झाला. व आणखीही कितीएक लढायांत तो तसाच अपजय पावला. त्यामुळें त्यानें व निजामानें निरुपायास्तव, इ० स० १७६९ च्या एप्रिल महिन्यांत इंग्लिशांशीं तह ठरविला.

इ० स० १७७० ह्या वर्षी बंगाल्यामध्यें मोठा दुष्काळ

पडून देशांतील सुमारें ⅓ लोंक अन्न अन्न करून मरण पावले.

अलमगीर बादशाहा मारला गेला, तेव्हां शाहा आलम त्याचा औरस पुत्र, बंगाल्यांत लढत होता; त्यामुळें दिल्लीचें तक्त दुसऱ्यासच मिळालें. तेव्हां अर्थात त्यास निराश होऊन इकडे स्वस्थ राहणें प्राप्त पडलें. इतक्यानंतर, माधवराव पेशव्यानें, इ० स० १७७० ह्या वर्षी, विसाजी कृष्ण सेनापति ह्याजबरोबर ५०००० फौज देऊन त्यास हिंदुस्थानांत पाठविलें. त्याजबरोबर महादजी शिंदा व तुकोजी होळकर हेही होते. ह्या सैन्याच्या साह्यानें शाहा आलम, इ० स० १७७१ च्या दिसेंबर महिन्याच्या अखेरीस दिल्लीच्या तक्तावर बसला. त्यानें आपणास साह्य केल्याबद्दल मराठ्यांस अलाहाबाद व कोरा हे प्रांत, जे त्यास इंग्लिशांकडून मिळाले होते, ते दिले. पुढें, इ० स० १७७२ त माधवराव निवर्तला. तो स्वभावानें फार चांगला होता. त्याच्या राज्याचें खरोखर उत्पन्न सात कोटींचें होतें. ह्याचे मागें ह्याचा भाऊ नारायणराव हा पेशवा झाला.

हिंदुस्थानांतील मुलखाच्या राज्यकारभाराविषयीं विलायतेमध्यें पार्लमेंत सभेंत पुष्कळ विचार होऊन एक नवा कायदा ठरला. त्याचें नांव रेग्युलेटिंग आक्त त्यांतील मुख्य कलमें येणें प्रमाणें:—१ बंगाल्याच्या गव्हरनरास गव्हरनर जनरल ह्मणावें; त्याला चार

कौन्सिलर ( मंत्री ) असावे; व त्याचा हुकूम मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांवर चालावा. २ कलकत्त्यास एक मोठी अदालत असावी; तिजवर गव्हरनर जनरलाचा हुकूम चालूं नये; व तींत एक मुख्य आणि तीन मददगार जड्ज असावे. ३ पहिल्या कामदारांची नेमणूक राजानें करावी. ४ कामदारांनीं नजराणा घेऊं नये व व्यापार करूं नये. इत्यादि अनेक कलमें होतीं. हा कायदा इ० स० १७७३ त ठरला. ह्याच्या पूर्वी एक वर्ष वारन् हेस्तिंग्स साहेब कलकत्त्यास गव्हरनर होऊन आला होता.

मराठ्यांनीं शाहाआलमास दिल्लीपति केल्यावर इ० स० १७७३ ह्या वर्षी रोहिलखंडावर स्वारी केली. रोहिले लोकांचा सरदार जाबताखान ह्यानें त्यांशीं कांहीं वेळ लढून, उपाय चालेना तेव्हां शेवटीं, अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला ह्याचा आश्रय धरिला; व इंग्लिशांच्या सल्ल्यानें त्याशीं तह ठरविला. त्यांत असें होतें कीं, सुजाउद्दवल्यानें मराठ्यांच्या हल्ल्यापासून रोहिल्यांचें रक्षण करावें; व त्याबद्दल त्यांनीं त्यास दहा लक्ष रुपये रोख, व तीस लक्ष रुपये तीन वर्षांनीं द्यावे. परंतु मराठे प्रथम रोहिलखंडांतून आपोआप निघून गेले, व पुनः आले तेव्हां हाफिज रहिमत नामक रोहिल्या सरदारानें त्यांस पुष्कळ द्रव्य देऊन मागें परतविलें. तेणेंकरून सुजाउद्दवला ह्याच्या साह्याचें कारणच पडलें नाहीं.

तेव्हां आर्थात, रोहिल्यांकडून त्यास रक्कम पोहोंचली नाहीं.

पुण्यांत नारायणराव पेशवा गादीवर बसल्यास आठ महिने पुरे झाले नाहींत तोंच, त्यास त्याचा चुलता राघोबादादा ह्यानें, इ० स० १७७३ च्या आगष्ट महिन्याच्या तिसऱ्या तारखेस मारेकऱ्यांचे हातून ठार मारविलें; आणि पेशवाईची गादी आपण घेतली. परंतु दरबारचे लोक त्यास अनुकूल नव्हते. प्रतिकूल होते ह्यामुळें, तो सैन्यासहवर्तमान बाहेर स्वारींत असतां, नारायणरावाची स्त्री गंगाबाई, नवरा निवर्तला तेव्हां गरोदर होती ती, तारीख १८ एप्रिल सन १७७४ रोजीं पुत्र प्रसवली. तो ४० दिवसांचा झाल्याबरोबर यास सवाईमाधवराव असें नांव ठेवून, कारभारी सखारामबापू, त्रिंबकरावमामा, व नानाफडनवीस, ह्यांनीं गादीवर बसविलें,

कबूल केलेली रक्कम रोहिले देईनात, ती वसुलांत आणण्यासाठीं त्यांजवर स्वारी करावी, असा विचार मनांत आणून, अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला ह्यानें त्या कामीं इंग्लिशांची मदत मागितली. वारन् हेस्टिंग्स साहेबानें ह्या वेळेपूर्वी नुकतेच अलाहाबाद व कोरा हे प्रांत, द्रव्याच्या अडचणीस्तव, पन्नास लाख रुपये घेऊन, त्याच नबाबास विकले होते. तरी, आणखी पुष्कळ पैसा पाठवून देण्याविषयीं विलायतेहून सक्त हुकूम

आला होता. ह्मणून, वर सांगितलेलें नबाबाचें ह्मणणें त्यानें तात्काळ मान्य केलें. त्यांत उभयपक्षानुमतें असें ठरलें कीं, नबाबानें लष्कराचा खर्च परस्पर भागवून, लढाई संपतांच चाळीस लक्ष रुपये इंग्लिशांस द्यावे. ही स्वारी इ० स० १७७४ च्या एप्रिल महिन्यांत झाली. तेव्हां समरांगणीं हाफिजर हिमत व २००० रोहिले प्राणांस मुकले; आणि फैजुल्लाखान नामक सरदार शरण आला. नंतर इंग्लिशांची फौज तेथून परतली. रोहिलखंड सुजाउद्दवल्याचे अंकित झालें. केवळ द्रव्याकडे नजर देऊन गरीबांवर हल्ला करण्यास वारन् हेस्टिंग्स ह्यानें आपलें सैन्य दिलें हें त्याच्या नांवास मोठें लांछन होय.

इकडे, आपणास पेशवाईची गादी मिळावी ह्मणून राघोबादादा, ह्मणजे पहिल्या बाजीरावाचा पुत्र, ह्यानें मुंबई सरकारास साष्टी, वसई, व गुजराथचा कांहीं भाग देऊं करून साह्य मागितलें. तें त्यास तात्काळ मिळालें. परंतु गव्हर्नर जनरलास तें कृत्य अगदीं अयोग्य वाटल्यावरून, त्यानें मदत ताबडतोब परत काढून घेतली; आणि अप्तन साहेबाच्या द्वारें गादीवर च्या पेशव्याशीं ( सवाई माधवराव साहेबांशीं ) पुरंदर येथें इ० स० १७७५ त तह ठरविला. त्यावरून साष्टी इंग्लिशांस कायम मिळाली, व शिवाय बराच लाभ झाला. नंतर राघोबादादा निराश होत्साता, आपलें सर्व

फौजेस फांटा देऊन, दरमहा २५,००० रुपये नेमणूक ठरवून घेऊन, कोपरगांवीं जाऊन स्वस्थ राहिला, तो तेथेंच इ० स० १७८४ त निवर्तला. त्यास दोन पुत्र होते; एक बाजीराव, आणि दुसरा चिमणाजी आपा.

---

## भाग आठवा.

### पेशव्याशीं पुनः तह.—सालप्याचा तह.—टिपूचा शेवट—इ०

इ० स० १७७५ पासून इ० स० १८०० पर्यंत.

पेशवे व इंग्लिश ह्यांच्या मध्यें पुरंदर मुक्कामीं तह ठरला खरा; तरी पेशव्याच्या दरबारचा मुख्य कारभारी नाना फडनवीस, ह्याचें मन त्याविषयीं शुद्ध नव्हतें. ह्मणून तो फ्रेंचांच्या साह्यानें इंग्लिशांस बुडविण्याची मसलत करूं लागला. ही बातमी त्यांस समजतांच त्यांनीं बंगाल्याहून व मुंबईहून आपलें सैन्य पुण्यावर पाठविलें. त्याचा पराभव वडगांवानजीक मराठ्यांच्या लष्करानें केला. नंतर, पुष्कळ द्रव्य व आपले अमलांतील थोडासा प्रदेश देण्याच्या कबुलायतीनें त्यांनीं मराठ्यांशीं तह ठरविला. ही गोष्ट इ० स० १७७८ त घडली.

आग्र्याच्या दक्षिणेकडे कांहीं प्रांत गोहदच्या राण्याच्या अमलांत होता. त्यांत शिरून मराठ्यांनीं त्यास उपद्रव दिला, व ग्वाल्हेरही घेतली. तेव्हां राण्यानें

इंग्लिशांपाशीं साह्य मागितलें. तें त्यास त्यांनीं तात्काळ दिलें. तेव्हां अर्थातच इंग्लिश आणि मराठे ह्यांचें युद्ध लागलें. इ० स० १७८० च्या आगष्ट महिन्यांत पाफम साहेबानें ग्वाल्हेर माघारी घेतली. ह्याशिवाय उभय पक्षांच्या आणखीही पुष्कळ झटापटी उडाल्या. शेवटीं, इ० स० १७८२ च्या मे महिन्याच्या १७ व्या तारखेस सालपें मुकामीं इंग्लिश व मराठे ह्यांचा तह ठरला. त्या वेळेस कंपनीसरकारतर्फे अंदरसन साहेब, व पेशवे वगैरे मराठ्यांच्या वतीचे महादजी शिंदे हे तेथें होते. ह्या तहावरून पूर्वीं नुकताच काबीज केलेला मुलूख इंग्लिशांस सोडून द्यावा लागला.

इ० स० १७६९ त तह झाला, त्यामध्यें असें होतें कीं, संकटसमयीं इंग्लिशांनीं हैदरास साह्य करावें. परंतु, मराठे त्याच्या मुलखांत शिरले तेव्हां इंग्लिश लोक स्वस्थ राहिले. हा विश्वासघात हैदरास न साहून, त्यानें निजाम व फ्रेंच ह्यांची मदत घेऊन, एक लक्ष सेना व १०० तोफा इतक्यांसहवर्तमान, इ० स० १७८० च्या जुलै महिन्यांत अर्काटावर हल्ला केला. तरी मद्रासचे इंग्लिश लोक स्वस्थ राहिले. हैदर गांवांचे गांव जाळून उद्द्स्त करूं लागला, तेव्हां ते जागृत झाले. नंतर, हेक्तर मनरो व बेली ह्या सरदारांचे हाताखालीं मोठीं सैन्यें देऊन त्यांस हैदरावर

पाठविलें. परंतु, कोचीच्या नजीक हैदरानें त्यांचा अगदीं फज्जा उडविला. ह्याखेरीज मध्यंतरीं पुष्कळ चकमकी झडल्यावर, तारीख १ माहे मे सन १७८१ रोजीं पोर्तोनोवो येथें तुमुल युद्ध झालें. त्या समयीं तुमुल हैदर इतका पराभव पावला कीं त्यास पळ काढावा लागला. त्याचे १०००० लोक समरांगणीं पडले. इंग्लिशांकडचे फक्त ३०६ मात्र जायां झाले. तरी तो त्यांशीं लढतच होता. शेवटीं, तारीख ७ माहे दिसेंबर सन १७८२ रोजीं हैदर मरण पावला. नंतर त्याचा मुलगा टिपूसाहेब हा त्याचे गादीवर बसला.

इकडे गव्हरनर जनरल हेस्तिंग्स साहेब ह्यास पुष्कळ द्रव्य पाठवून देण्याविषयीं विलायतेहून फार सक्तीचे हुकूम आल्यावरून, त्यानें न्यायान्याय न पाहतां द्रव्य जमा करण्यास आरंभ केला. तो असा. काशीचा राजा चैत शिंग ह्याजपाशीं त्यानें दोन वर्षे खंडणीचा पैसा ठरावापेक्षां पुष्कळ अधिक मागितला. तो त्यानें भिऊन बिन तकरार दिला. त्याहूनही जास्ती पैसा पाठवून देण्याविषयीं हेस्तिंग्स साहेबानें त्यास हुकूम केला. तेव्हां तो अमळसा कुरकुरूं लागला. हें इकडे समजतांच हेस्तिंग्स साहेब इ० स० १७८१ च्या आगष्ट महिन्यांत स्वतः काशीस गेला; आणि त्यानें चैतशिंगास गादीवरून काढून, त्याच्या बहिणीच्या मुलास राज्यावर बसविलें. त्यानें गव्हरनर जनरलास

४०००००० रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. आणि त्याच्या मुलुखांतल्या रयतेचे इनसाफ इंग्लिश अंमलदारांनीं चुकवावे, असें ठरलें.

दुसरा एक जुलूम हेस्टिंग्स साहेबानें केला. तो असा कीं, अयोध्येचा दुर्बल नवाब असफउद्दवला ह्याजपाशीं स्वतः तर पैसा नव्हताच; पण त्याच्या आया फार सधन असत. त्यांजवर फार क्रूरपणाची सक्ती करून त्यांजपासून त्यानें एक कोटी वीस लक्ष रुपये काढले. ही गोष्ट वर सांगितल्या वर्षींच घडली.

टिपू गादीवर बसला ह्मणून वर लिहिलें. तो आपल्या बापाप्रमाणें इंग्लिशांशीं वैरभावानें वागूं लागला. त्यानें कर्नल माथ्यूस साहेबाचा पराभव करून, त्यापासून, इ० स० १७८३ त बेदनूरचा किल्ला घेतला, व त्यांतले इंग्लिश लोक धरून ह्मैसूर येथें नेऊन प्रतिबंधांत ठेविले. मंगळुरासही टिपूनें वेढा घातला होता; परंतु तेथच्या क्यांबेल नामक इंग्लिश सरदारानें मोठ्या शौर्यानें आपलें नांव राखिलें. ह्याखेरीज आणखी कितीएक वेळां उभय पक्षांच्या गांठी पडून झटापटी झाल्या. त्यांनीं टिपू अगदीं त्रासून गेला; आणि त्यानें इ० स० १७८४ च्या मार्च महिन्यांत इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, लढाई सुरू झाल्यावर जो एकमेकांचा मुलूख एकमेकांनीं घेतला असेल, तो ज्याचा त्यास परत मिळावा.

वारन हेस्तिंग्स इ० स० १७८५ च्या मार्च महि-न्यांत आपलें गवरनर जनरलचें काम सोडून विलायतेस निघून गेला. त्याजवर लांच खाल्लयाचे अनेक खटले उपस्थित करून त्याच्या वैऱ्यांनीं त्यास छळिलें; तरी तो स्वराजहितकर्ता होता, ह्यांत संशय नाहीं. ह्याचे मागून लार्ड कार्नवालिस साहेब गवर्नर जनरल होऊन आला.

इंग्लिश सरकारचा दोस्त त्रावणकोरचा राजा, ह्या-जवर इ० स० १७८९ त टिपूनें हल्ला केला. त्यांत त्याला कांहीं लाभलें तर नाहीं; पण तेणेंकरून इंग्लिशांशीं मात्र पुनः विपट पडलें. त्याच्या पुढच्या वर्षी इ० स० १७९० त मेदोस नामक इंग्लिश सरदार सैन्यासहवर्तमान टिपूच्या प्रांतांत शिरला. टिपूनेंही इंग्लिशांच्या दोन टोळ्यांचा दोन जागीं पराभव केला.

टिपू उत्तरोत्तर प्रबळ होत चालला; तेव्हां लार्ड कार्नवालिस ह्यानें मराठे व निजाम ह्यांशीं सल्ला करून त्यांच्या साह्यानें, इ० स० १७९२ च्या फेब्रुवारी महि-न्यांत श्रीरंगपट्टणावर हल्ला केला. ह्या मोहिमींत परशुरामपंत भाऊ पटवर्धन व बापू गोखले हे पेशव्यां-चे सरदार होते. टिपूजवळ ५०००० पायदळ, ५००० स्वार व ४०० तोफा इतकी रणसामग्री होती. उभयपक्षांच्या अनेक लढाया होऊन शेवटीं शत्रु हटला; आणि त्यानें तहाचें बोलणें लाविलें, तें इंग्लिशांनीं मान्य केलें. तेव्हां असें ठरलें कीं, टिपूनें आपलें अर्धे राज्य

इंग्लिशांस द्यावें; तीन कोटी रुपये लढाईचा खर्च द्यावा; व जे इंग्लिश त्याचे प्रतिबंधांत असतील, त्यांची सुटका करावी. त्याप्रमाणें निम्में राज्य आलें. त्यापैकीं तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा मुलूख मराठ्यांस दिला; गजकोट व कड्या हे प्रांत निजामास दिले; आणि बारामहाल व दिंदिगल हे प्रांत, आणि घाटाखालचे मलबार व कानडा हे प्रांत इंग्लिशांनीं आपणांकडे घेतले.

नंतर कार्नवालिस साहेबानें अर्काटच्या नवाबाशीं नवा तह ठरविला. त्यावरून असें झालें कीं, नऊ लक्ष वराई खंडणी नवाबानें इंग्लिशांस द्यावी; लढाईचे वेळीं आपल्या सर्व मुलखाची व्यवस्था इंग्लिशांकडे ठेवावी; आणि खंडणीचा ऐवज वक्तशीर न आल्यास तितक्यापुरता मुलूख त्यांनीं जप्त करून घ्यावा. ह्या गोष्टी त्या नवाबानें कबूल केल्या.

इतक्यांत युरोपामध्यें फ्रेंच व इंग्लिश ह्यांची लढाई सुरू झाल्याचें वर्त्तमान आलें. ही संधी पाहून फ्रेंचांचीं सारीं ठाणीं घेऊन इंग्लिशांनीं त्यांस हिंदुस्थानांतून हांकून लाविलें.

ह्या गवर्नर जनरलाचे कारकीर्दींत महादजी शिंदा प्रबल झाला. त्यानें प्रयागाचे उत्तरेकडचा व पश्चिमेकडचा प्रांत घेतला; दिल्लीच्या शाहा आलम बादशाहास कैदेंत ठेविलें; आणि फ्रेंच लोक आपल्या सैन्यांत अंमलदार नेमून लष्कराची तयारी चालविली.

लार्ड कार्नवालिस गव्हर्नर जनरलाचें काम सोडून इ० स० १७९३ ह्या वर्षी स्वदेशीं निघून गेला. त्यानें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांत फार चांगली व्यवस्था ठेविली. जिल्ह्यानिहाय जज्ज व कलेक्टर नेमिले; व वसुलाची शिस्त चांगली लावून दिली. त्याचेवेळीं सुमारें तीस एकतीस लक्ष रुपये वसूल होता. शिवाय मिठाच्या वगैरे मक्त्यांचें उत्पन्न सुमारें पस्तीस लक्ष रुपये येत असे. ह्याचे मागें **सर जान शोर** नामें साहेब गवर्नर जनरल झाला.

आपल्या लोकांत खड्र्याची लढाई ह्मणून जी प्रसिद्ध आहे, ती, चौथाईच्या प्रकरणावरून, **मराठे** व **निजाम** ह्यांच्या मध्यें इ० स० १७९५ त झाली. त्या वेळीं **मराठ्यांकडे** दौलतराव शिंदा, तुकोजी होळकर, **गाय**-कवाड, वगैरे पुष्कळ सरदार होते. त्यांचें एकंदर लष्कर एक लक्ष तीस हजारांहून अधिक होतें. व शिवाय दाहा हजार पेंढारी होते. **निजामाकडे** एक लक्ष दहा हजार फौज होती. **मराठ्यांनीं** **निजामा**-चा मोड केला, आणि त्यापासून तीन कोट रुपये स्वा-रीचा खर्च, शिवाय पस्तीस लक्षांचा मुलूख, आणि दौलताबाद किल्ला हीं **मराठ्यांनीं** घेतलीं. तेव्हां पेशवा-ईच्या गादीवर **सवाई माधवराव** असून, त्याचा सर्व राज्यकारभार **नानाफडनवीस** पहात असे. हा पेशवा इ० स० १७९५ च्या **अक्तोबर** महिन्यांत माडीवरून

खालीं कारंजावर उडी टाकून मरण पावला. नंतर राघोबादादाचा पुत्र बाजीराव हा दौलतराव शिंद्याच्या साह्यानें त्याचे गादीवर बसला.

रोहिल्यांचा सरदार फैजुल्लाखान मरण पावला त्याचा वडील पुत्र महंमद अली ह्यास त्याचा धाकटा भाऊ गुलाम महंमद ह्यानें मारून टाकून गादी बळकाविली. त्यास इंग्लिशांनीं काढून टाकून फैजुल्लाखानाचें सर्व द्रव्य अयोध्येचा नवाब असफउद्दवला ह्यास दिलें. तो नवाबही पुढें लवकरच निवर्तला. नंतर त्याचा पुत्र वजीर अली हा इ० स० १७९७ त इंग्लिशांच्या सल्ल्यानें नवाबाचें पद पावला. परंतु हा अस्सल मुलगा नव्हे, असा बोभाट झाल्यावरून त्याची रयत फार नाखुष झाली. म्हणून गव्हर्नर जनरलानें त्यास पदच्युत करून, असफउद्दवल्याचा भाऊ सादत अली ह्यास तो अधिकार दिला. त्याबद्दल त्यानें इंग्लिशांस बारा लक्ष रुपये द्यावे; त्यांची दहा हजार फौज त्यानें आपले चाकरीस ठेवावी; परराज्यांशीं संबंध त्यानें बिलकुल राखूं नये; आणि इतर युरोपियन लोक जवळ बाळगूं नयेत; असा तह, इ० स० १७९८ च्या जानेवारी महिन्यांत ठरला.

इ० स० १७९८ त सर जान शोर साहेब आपलें काम सोडून विलायतेस गेला. त्याचे जागेवर मार्क्विस आफ् वेल्सली हा साहेब गव्हरनर जनरल होऊन आला.

तेव्हां टिपू इंग्लिशांचा घात करण्याच्या बुद्धीनें इतर संस्थानिकांशीं मसलती करीत आहे, असें पक्कें वर्तमान त्यास समजलें. तेव्हां त्यानें तात्काळ युद्धाची तयारी केली. अर्काटाहून व निजामाकडून सैन्यें आणून एकंदर सुमारें ३०००० फौज़ जमविली. आणि हारिस साहेब तिजवर मुख्य नेमिला. हें प्रचंड सैन्य लढत लढत टिपूची राजधानी श्रीरंगपट्टण हिजपाशीं येऊन थडकलें. त्यानें, मोठ्या शौर्यानें तारीख २१ माहे एप्रिल सन १७९९ रोजीं टिपूच्या फौजेचा मोड करून जय मिळविला. त्या युद्धांत टिपू स्वतः पडला. नंतर त्याच्या गादीवर कोणी प्राचीन कुळांतला एक पुरुष बसवून त्याजकडे टिपूच्या राज्यापैकीं तेरा लक्षांचा मुलूख दिला. व बाकीचा इंग्लिशांनीं आपणांकडे घेतला; आणि त्यांतला थोडासा निजामास दिला. ह्याप्रमाणें टिपूच्या राज्याचा शेवट इ० स० १८०० च्या आक्तोबर महिन्यांत झाला.

---

## भाग नववा.

### मराठ्यांशीं लढाया—तह—इत्यादि.

इ० स० १८०० पासून इ० स० १८०६ पर्यंत.

तंजावरचा राजा तुळजाजी मरण पावला, आणि त्याचा औरस पुत्र अमरसिंग हा इंग्लिशांच्या सहायानें त्या-

चें गादीवर बसला. पुढें त्याचें आचरण इंग्लिशांस न आवडल्यामुळें त्यांनीं त्यास पदच्युत करून, त्याचा दत्तक बंधु सरफोजी ह्यास राज्यावर बसविलें. त्या समयीं गवरनर जनरलानें असा ठराव केला कीं, सरफोजी ह्यानें नामधारी राजा होऊन नियमित नेमणूक घेऊन रहावें; व त्याच्या राज्याचा सर्व कारभार इंग्लिशांनीं पाहावा. तारीख २५ आक्तोबर सन १७९९ रोजीं हा ठराव झाला. ह्याप्रकारेंकरून तंजावरचें राज्य इंग्लिशांच्या घरांत आलें.

अफगाणांचा बादशाह शहाजमान ह्यानें इ० स० १८०१ ह्या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां अयोध्येचा नबाब सादत अली हा घाबरून, स्वसंरक्षणार्थ इंग्लिशांशीं साह्य मागूं लागला. त्यापासून १,३५,२३,४७४ रुपये वसुलाचा मुलूख मदतीबद्दल घेऊन त्यांनीं त्याचें म्हणणें मान्य केलें. ह्याच सुमारास फरक्काबादच्या नबाबाचा भागीरथीच्या कांठचा सुमारें साडे दहा लाखांचा मुलूख आपणांकडे घेऊन इंग्लिशांनीं त्यास सालीना ८०००० रुपयांची नेमणूक करून दिली.

तिकडे अर्काटचा नवाब उमदत उलउमराव हा दंग्यांचे वेळीं टिपूस साह्य करीत होता, अशा आरोपावरून इंग्लिश सरकारानें त्याची चौकशी चालविली. कांहीं शाबिदी त्याजवर झाली, इतक्यांत तो इ० स०

१८०१ ह्या वर्षीं मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र अली हुसेन हा नेमणूक पतकरून राज्य सोडण्यास कबूल न होई सबब, तो नवाबाचा मुलगाच नव्हे असें गवर्नर जनरलाच्या अभिप्रायानें ठरवून, उमरावाचा भाऊ अजीम उद्दवला ह्यास इंग्लिशांनीं गादीवर बसविलें; आणि मुलखाच्या उत्पन्नांतून खर्च वजा जाऊन बाकी राहील तिचा एक पंचमांश त्यानें नेमणूक घेऊन फक्त राजा नांव धारण करून स्वस्थ रहावें, असें ठरविलें. ह्याप्रकारेंकरून इंग्लिशांनीं त्याचा मुलूख आपणांकडे घेतला.

सुरतचा किल्ला इ० स० १५४२ त बांधिला. तेथील नवाब इ० स० १७९९ त मेला. त्याचेंही गादीविषयीं वाद पडला. तेव्हां वारस मीर नासरुद्दीन ह्यास सालीना एक लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याचा मुलूख इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतला.

होळकराची मूळ गादी स्थापणारा मल्हारराव हा इ० स० १७६६ त मरण पावला. त्याची सून अहि- ल्याबाई, हिनें तुकोजी नामक पुरुषास आपल्या राज्याचा अधिकार दिला. तो पुढें इ० स० १७९७ त वारला. त्याला चार पुत्र होते. काशीराव आणि मल्हारराव हे लग्नाच्या बायकोचे; व विठोजी आणि यशवंतराव हे राखेच्या पोटचे. त्यांपैकीं काशीराव हा राज्याचा उप- भोग करूं लागला. त्याला मल्हारराव हा शत्रु उत्पन्न

झाला. हा भावांचा वाद पुण्यास पेशव्यांचे दरबारीं गेला. तेथें बाजीरावाचा सगळा कारभार दौलतराव शिंदा पाहात असे. त्यानें काशीरावाकडून पुष्कळ पैसा खाऊन त्याचा पक्ष खरा ठरविला; व मल्हाररावावर गर्दी करून त्यास ठार मारविलें. हें पाहातांच विठोजी व यशवंतराव हे पळून गेले. तरी विठोजीस धरून आणून त्यानें त्याचा प्राण घेतला. बाकी राहिला यशवंतराव, त्यानें धारचा पवार व अमीरखान पठाण ह्यांचे साह्यानें ६०००० फौज जमवून एकाएकीं इंदुराजवळ तळ दिला. तेथें तारीख १४ माहे आक्टोबर सन १८०१ रोजीं शिंद्याच्या व त्याच्या लष्करांमध्यें लढाई झाली. तींत होळकर पराभव पावला. पुढच्या वर्षी पुनः फौज जमवून होळकरानें पुण्यावर स्वारी केली. तेव्हां त्यास यश आलें. हें पाहून बाजीराव पेशवा भयाभीत होत्साता पुण्यांतून पळून गेला. त्यानें नीट कोंकणची वाट धरिली. इकडे पुणें शहरांत होळकरानें बाजीरावाचा भाऊ अमृतराव ह्यास पेशवाईचे गादीवर बसविलें.

आपणास आपली गादी परत मिळावी ह्मणून बाजीरावानें साह्यार्थ इंग्लिशांची प्रार्थना केली. त्यांनीं ती मान्य करून आधीं त्याशीं तारीख ३१ माहे दिसेंबर सन १८०२ रोजीं वसई मुक्कामीं तह ठरविला. त्यांत असें होतें कीं, बाजीरावानें इंग्लिशांचीं ६ पलटणें आप-

त्या चाकरीस ठेवावी; त्यांच्या खर्चाबद्दल त्यानें त्यांस गुजराथेंत अथवा करनाटकांत २५ लक्षांचा मुलूख द्यावा; त्यानें त्यांच्या सल्लयाखेरीज दुसऱ्या कोणत्याही राजाशीं लढाई किंवा तह करूं नये; आणि इतर कोणत्याही युरोपियन लोकांस चाकरीस ठेवूं नये. ह्या तहानंतर इंग्लिशांनीं बाजीरावास त्याचे गादीवर बसविलें; पण त्या वेळेपासून मराठी राज्याचें स्वातंत्र्य गेलें. बाजीराव गादीवर येण्यापूर्वींच होळकर आपल्या राज्याच्या बंदोबस्ताकरितां महाराष्ट्र देशांत निघून गेला होता. त्यानें जाण्याच्या अगोदर पुणें शहर लुटलें, व लोकांना अनेक प्रकारचीं दुःखें देऊन त्यांपासून पुष्कळ द्रव्य काढून घेतलें.

वसईचा तह बाजीरावानें तरी निरुपायास्तव कबूल केला. आणि शिंदा व भोंसला ह्यांस तर तो मुळींच आवडला नाहीं. तेव्हां अर्थातच त्यांचें व इंग्लिशांचें वांकडें आलें. उभयपक्षांच्या सैन्यांची सिद्धता होऊन युद्धें चाललीं. त्यांत कर्नल वेल्सली, म्हणून जो गवर्नर जनरलाचा बंधु एका टोळीचा मुख्य होता, त्यानें फार पराक्रम केले. दिल्ली, लासवारी, इत्यादि अनेक जागीं अनेक प्रसंगीं युद्धें चाललीं होतीं. त्यांत अजिंठ्याजवळ खेळणा नदीच्या तीरीं आसई येथें मोठी लढाई झाली. तेव्हां वेल्सली साहेबाजवळ ४५०० फौज होती. आणि मराठ्यांचें लष्कर ह्या मानानें पाहिलें

असतां फारच मोठें ह्मणजे ५०००० असून, शिवाय १०० तोफा होत्या. तरी त्यांवर एकदम चालून जाऊन कर्नल वेल्सली ह्यानें त्यांचा अगदीं मोड करून टाकिला. मराठ्यांचे १२०० लोक पडले; आणि ९८ तोफा व ७ बावटे इंग्लिशांचे हस्तगत झाले. इंग्लिशांकडचे ४२८ लोक मेले, व ११३८ जखमी झाले. हें वर्तमान तारीख २३ सप्टेंबर सन १८०३ रोजीं घडलें.

इतकें झालें तरी त्या, दोघांची रग जिरली नाहीं. पुढें कांहीं दिवसपावेतों त्यांनीं इंग्लिशांशीं वैर चालविलें होतें. परंतु आपण कांहीं केलें तरी ते आपणास आटोपत नाहींत, असें आधीं भोंसल्यास वाटल्यावरून त्यानें त्यांशीं तारीख १७ माहे दिसेंबर सन १८०३ रोजीं देवगांवीं तह केला. त्यांतलीं मुख्य कलमें अशीं. लढाईमुळें इंग्लिशांचें जें नुकसान व जो खर्च झाला असेल, तो भोंसल्यानें भरून द्यावा; शिवाय कटक प्रांत व बलसोड किल्ला त्यांचे हवालीं करावा; गावलगड व नर्नाळा ह्या किल्ल्यांच्या सभोंवतालचा ३६ लक्षांचा मुलूख, व इंग्लिशांच्या सरहद्दीपासून पश्चिमेस वर्धानदीपर्यंत मुलूख निजामास सोडावा; भोंसल्यानें युरोपियन लोक चाकरीस ठेवूं नयेत; आणि भोंसले व इंग्लिश ह्यांचे वकील परस्परांच्या दरबारांत असावे.

पुढें तिसाव्या तारखेस अंजिण गांवीं शिंद्यानेंही

इंग्लिशांशीं तह केला. त्यांत ठराव झाला तो असा. भागीरथी व यमुना ह्यांचे मधला मुलूख, जयपूर, जोतपूर व गोहद ह्या संस्थानांच्या उत्तरेकडचा मुलूख व भडोचचा किल्ला व तो प्रांत इतका मुलूख शिंद्यानें इंग्लिशांस द्यावा; अहमदनगरचा किल्ला व तो प्रांत त्यानें पेशव्यांस द्यावा; अजिंठ्यापासून गोदावरीपावेतों मुलूख निजामास द्यावा; शाहा अलम, पेशवा, निजाम, व गायकवाड, ह्यांजवरचे दावे सोडावे; आणि इंग्लिशांचे शत्रु युरोपियन व अमेरिकन लोक ह्यांस चाकरीस ठेवूं नये.

शिंदा व भोंसला ह्याप्रकारें करून स्वस्थ झाले, तोंपर्यंत होळकरानें कांहीं एक गडबड केली नाहीं; परंतु ही लढाई संपतांच त्यानें इंग्लिशांशीं भांडण्यास कंबर बांधिली. त्याच्या व इंग्लिशांच्या सैन्याच्या, दिल्ली, गोवर्धन, दिग, इत्यादि स्थलीं झटापटी झाल्या. त्यांत होळकराला शिंद्याचें अंग होतें. तरी लार्द लेक व कर्नल वालेस ह्या इंग्लिश सरदारांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

इतक्यांत मार्किस अफ् वेल्सली इ० स० १८०५ च्या जुलै महिन्यांत गव्हरनर जनरलाचें काम सोडून स्वदेशीं गेला. त्याचे जागीं पूर्वीचा गव्हरनर जनरल मार्किस कार्नवालिस हा नेमिला. त्यानें शिंदा व होळकर ह्यांशीं तह ठरविण्याविषयीं जनरल लेक ह्यास

लिहिलें. तें काम होण्यापूर्वीच कार्नवालिस साहेब गाजीपूर येथें मरण पावला. त्याचें काम कौंसलचा मुख्य हुद्देदार बार्लो हा पाहूं लागला.

पुढें नोवेंबर महिन्यांत शिंद्याशीं नवा तह ठरला. तो असा. ग्वाल्हेरी व गोहद प्रांत हे इंग्लिशांनीं शिंद्यास द्यावे; चंबळा नदी ही इंग्लिशांच्या व शिंद्याच्या राज्यांची सीमा असावी; आणि मागच्या तहावरून शिंद्याचा जो मुलूख इंग्लिशांकडे आला होता, त्यांतील त्यानें आपले सर्व हक्क सोडून द्यावे, व त्यांबद्दल त्यास इंग्लिशांनीं दर साल तीन लाख रुपये द्यावे. असें ठरलें.

लागलाच पुढें दिसेंबर महिन्यांत होळकरानेंही इंग्लिशांशीं तह केला. त्याचीं मुख्य कलमें येणें प्रमाणें. चंबळा नदीच्या उत्तरेकडील मुलूख, बुंदेल खंड, व पुणें, ह्यांवरचा दावा होळकरानें सोडावा; इंग्लिशांच्या सल्ल्यावांचून गोरे लोक चाकरीस ठेवूं नयेत; आणि इंग्लिशांच्या राज्यास उपद्रव न देतां ठरविलेल्या मार्गानें त्यानें इंदुरास जावें.

इ० स० १८०५-१८०६ ह्या वर्षीं हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याचें उत्पन्न १५,४०,३४,०९० रुपये होतें; व खर्च १५,५६,१२२,८० रुपये झाला. उत्पन्नाची रकम आलीकडे पुष्कळ वाढली आहे, तरी तेवढीनेंही खर्च भागत नाहीं, असें ह्मणतात.

मराठी ग्रंथ ... नं० ठाणें सन १...



## भाग दाहावा.

### लॉर्ड मिंतो ह्याची कारकीर्द.

#### इ० स० १८०६ पासून इ० स० १८१३ पर्यंत.

इ० स० १८०६ ह्या वर्षीं इंग्लिशांच्या काळ्या पलटणींतील शिपायांस दाढ्या मिशा राखण्याचा व निराळे तऱ्हेचीं पागोटीं बांधण्याचा हुकूम मद्रास इलाख्यांत झाला. तेव्हां सरकार साऱ्या लोकांस जुलमानें ख्रिस्ती करणार, अशी अवाई उठून, वेलूरास टिपूचे मुलगे होते त्यांच्या सामलातीनें, तेथें तारीख १० जुलै रोजीं फौजेंत दंगा झाला. त्यांत ११३ इंग्लिश सरदार व दुसरे अनेक लोक प्राणास मुकले. हा दंगा, अर्काटाहून ४०० लोक बरोबर आणून गिलेप्सी साहेबानें मोडिला. तेव्हां ४०० बंडवाले मारले गेले; व ३५० हातीं लागले. नंतर टिपूचे मुलगे तेथून काढून कलकत्त्यास आणून ठेविले.

ह्या दंग्याचा मोड तिकडे होत होता इतक्यांत लार्ड मिंतो नामक साहेबांची योजना गव्हरनर जनरलाचे जागीं झाली. तो इ० स० १८०७ च्या जुलै महिन्यांत कलकत्ता येथें येऊन पोहोंचला.

निजामाचा वजीर मुनीर उल्मुलूख ह्याचे पदरीं हिशेबी काम पाहणारा चंदुलाल म्हणून एक कायस्थ

ब्राह्मण असे. तो आपले कामांत हुशार होता. त्यानें इंग्लिशांशीं सख्य ठेवून त्यांच्या मार्फत फौजेच्या वेतनाचे तनके तोडून दिले. तेणेंकरून त्या लष्करांत चांगला बंदोबस्त झाला. व तत्संबंधीं सर्व काम, विलायत सरकारच्या आज्ञेवरून, रसिदेंत पाहूं लागला निजामाच्या मुलकी राज्यव्यवस्थेंतही फार घोंटाळा होता. व रसिदेंतानें तो तेव्हांच मोडून टाकिला असता; पण त्यांत हात घालण्यास त्याला परवानगी नव्हती, ह्यामुळें त्याचा उपाय खुंटला.

फ्रान्सदेशचा बादशाह नेपोलियन बोनापार्ट, ह्यानें इराणांत वकील पाठवून, तेथील राजा फत्तेअलीशाह ह्याशीं तह केला. हें गव्हरनर जनरलास समजलें तेव्हां त्यानें दूरदृष्टीनें त्या राजाशीं आपणही सल्ला ठरविला. तो असा कीं, शाह जोंपर्यंत रुशियाच्या बादशाहाशीं लढत असेल, तोंपर्यंत त्यास इंग्लिशांनीं दरसाल दाहा लाख रुपये देत जावे; त्याची सेना तयार करण्याकरितां कांहीं गोलंदाज व सरदार त्याजकडे पाठवावे; चोवीस तोफा व सोळा हजार बंदुका त्यास पुरवाव्या; आणि फ्रेंच लोक हिंदुस्थानावर चालून आल्यास त्यानें इंग्लिशांस कुमक करावी. हा तह इ० स० १८०९ त ठरला.

त्रावणकोरच्या राजाचा खर्च कमी होऊन, आपली खंडणी बेताचे बेतावर यावी, ह्या इराद्यानें त्याच्या

कांहीं फौजेस फाटा देण्याविषयीं इंग्लिशांनीं आग्रह धरिला. तो त्याचे दिवाणास आवडला नाहीं. इंग्लिशांचे शिपाई त्यानें आलपल्ली येथें पकडून बुडवून मारिले; आणखी पुष्कळ दंगा मांडिला. रसिदेंताच्या बंगल्यावरही तो चाल करावयास चुकला नाहीं. तेव्हां इंग्लिश सैन्यानें त्याशीं लढून, इ० स० १८०९ च्या जानेवारी महिन्यांत त्याचा पराभव केला. मग दिवाणानें पळ काढिला. त्याचे मागें इंग्लिश सैन्य लागलेंच होतें, तरी तो शेवटीं हातीं लागला नाहीं. आतां कांहीं उपाय नाहीं, असें पाहून आत्महत्या करून घेऊन त्यानें प्राण सोडिला.

बुंदेलखंडांत अनेक संस्थानें होतीं. त्यांच्या राज्यव्यवस्थेकडे पाहावयाचें सुद्धां नाहीं, असा इंग्लिश सरकारचा निश्चय होता. पण त्यांतले राजे एकमेकांशीं इतके कलह करूं लागले कीं, त्यांपासून आपले राज्यास कोणते वेळीं काय अपाय घडेल नकळे, असें मिंतो साहेबास वाटलें; ह्मणून त्यानें आपलें सैन्य त्यांजवर पाठविलें. त्याचा मुख्य अधिकारी कर्नल मार्तिंदल साहेब होता. ह्या सैन्यानें तिकडील अव्यवस्था मोडून टाकून अजगड व कलिंजर हे किल्ले घेतले. अजगडच्या संस्थानिकाचें नांव लक्ष्मण देव, व कलिंजरच्याचें दर्यावसिंग, असें होतें. सदरहू वर्त्तमान इ० स० १८०९ त घडलें.

ह्याच वर्षी इंग्लिशांनीं, शिकांचा राजा रणजितशिग ह्याशीं नवा तह ठरविला. तो असा. सतलज नदी ही उभयतांच्या राज्यांची सरहद्द असावी; तिच्या पश्चिमेस व उत्तरेस इंग्लिशांनीं दाखलगिरी ठेवूं नये; व तिच्या डाव्या तीरास जो त्याचा मुलूख असेल, त्यांत वसुलाच्या कामापेक्षां अधिक फौज त्यानें ठेवूं नये; व तेथील शीक सरंजाम्यांस उपद्रव देऊं नये.

हिंदी महासागरांत फ्रेंचांचें बरेंच प्राबल्य होतें. ते त्यांतील बेटांवर राहून डाव साधेल तेव्हां इंग्लिशांचे व्यापाराचें नुकसान करीत. इ०स० १८०७ ह्या वर्षाच्या एका दीड महिन्यांत त्यांनीं कलकत्त्यांतील व्यापारास ३०,००,००० रुपयांची टोपी घातली. हा उपद्रव चांगला नव्हे असें गवर्नर जनरल साहेबांस वाटून त्यांनीं फ्रेंचांचीं मारिशस व बुर्बों हीं बेटें मोठी फौज पाठवून आपले ताब्यांत घेतलीं. ही गोष्ट इ०स० १८१० त घडली. पुढच्या वर्षी ह्मणजे १८११ त, डच लोकांपासून बटेविया वगैरे बेटें इंग्लिशांनीं जिंकून घेतलीं. तेव्हां तेथले ५,००० डच लोक पाडाव केले.

मिंतो साहेबाच्या कारकीर्दीत, होळकराचा सरदार अमीरखान पठाण ह्यानें पेंढारी ह्मणून लुटारू लोक असत ते पुष्कळ जमवून भोंसल्याच्या वगैरे राज्यांत बंडाळी मोडली व नेपाळच्या राजाचे लोक गोरखपूर व

सारण येथील इंग्लिश प्रजेस लुटून त्रासवूं लागले. ह्या दोन्ही गोष्टींचा बंदोबस्त करण्याचा निश्चय गवर्नर जनरलानें केला; परंतु तो सिद्धीस जाण्याचे आधींच इ० स० १८१३त, मिंतो साहेब आपलें काम सोडून विलायतेस निघून गेला. त्याचे जागेवर मार्किस आफ् हेरिंतग्स ह्याची नेमणूक झाली. तो अक्तोबर महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोहोंचला.

मिंतोसाहेबाच्या वेळीं हिंदुस्थानांत एक देखील जरी मोठी लढाई झाली नाहीं, तरी तो चतुर व मसलती होता हें खचीत. एतद्देशीय विद्येस उत्तेजन देण्याचें त्याचे मनांत होतें. कलकत्त्यास इंग्लिश पाठशाळा व नदिया आणि तहुत येथें हिंदु पाठशाळा, व दुसरे कोठें एक मुसलमानी पाठशाळा, अशीं विद्यालयें स्थापण्यासाठीं पुष्कळ यत्न केला. पण तो पूर्णपणें सिद्धीस गेला नाहीं. असो, हा पुरुष स्वदेशीं पोहोंचल्यावर थोडक्याच दिवसांनीं इ०स० १८१४ ह्या वर्षी मरण पावला.

---

## भाग अकरावा.

### नेपाळची लढाई—पेंढारी—इत्यादि.

इ० स० १८१३ पासून इ० स० १८१८ पर्यंत

नेपाळची राजधानी कटमंडू येथें कर्मयोध विक्रमशाह हा राजा गादीवर असतां, त्याच्या लोकांनीं इ० स०

१८१४ ह्या वर्षीं बुतवाल येथील इंग्लिशाचें ठाणें मारिलें, तेव्हां गव्हर्नर जनरल मार्किस आफ् हेस्टिंग्स ह्यानें त्याचा जबाब त्यास विचारला त्याचें उत्तर फार उद्धटपणाचें आलें. त्यामुळें युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला. गव्हर्नर जनरलानें २९,००० कवाईत शिकलेली फौज, ७४ तोफा, व सुमारें १०,००० मुलकी फौज, इतकें सैन्य जमवून त्याच्या चार टोळ्या केल्या. पहिलीवर मुख्य जनरल मार्ली, व कर्नल ब्रादशा, हे होते. हिनें पाटणेहून काटमंडूवर जावें; दुसरीचा सरदार कर्नल वुद साहेब, तिनें काशी व गोरखपूर ह्यांवरून पाल्प्यापर्यंत जावें, तिसरीचा सरदार गिलेप्सी साहेब, तिनें देरादून घेऊन पुढें जावें; आणि चवथीचा सरदार कर्नल आक्तर लोनी यानें लुधियाना येथून निघून सतलज नदीच्या वरचे बाजूच्या मुलखांत शिरावें. असा बेत ठरला.

ह्या टोळ्यांनीं कलुंग जैकट, मलून, वगैरे ठिकाणीं गुरखे (नेपाळी) लोकांस लढाया दिल्या. परंतु त्यांपासून ह्मणण्यासारखा विशेष फायदा झाला असें नाहीं. शेवटीं देवथळ वाटांत नेपाळी फौजेनें इंग्लिशसैन्यास एकाएकीं गांठिलें, तेथें इंग्लिशांचे लोकांनीं शत्रूचा सरदार भगतीथापा ह्यास ठार मारिलें. तेव्हां त्यांचा दुसरा सरदार अमरसिंग ह्यानें तहाचें बोलणें लाविलें. तें, पर्जन्यकाळ समीप आला असें पाहून जनरल आक्तर लोनी साहेबानें मान्य केलें, त्या

वेळीं ठराव झाला तो असा. यमुना व सतलज ह्या नद्यामधले सारे किल्ले इंग्लिशांच्या हातीं असावे. दुसरा एक तह कर्नल ब्राडशा व नेपाळी सरदार गुरुराज मिश्र यांनीं ठरविला. त्यांत असें होतें कीं, ज्या सरहद्दीच्या मुलखाचा तंटा पडला होता, तो, व लढाईंत इंग्लिशांनीं घेतलेला मुलूख हे नेपाळच्या राजानें इंग्लिशांस द्यावे; नेपाळच्या राजानें सिक्किमच्या राजास उपद्रव देऊं नये; कांहीं तंटा पडल्यास इंग्लिशांच्या मार्फत त्याची तोड काढावी. काली नदीच्या पश्चिमेकडील मुलखावर त्यानें वारसा सांगू नये; युरोपियन किंवा अमेरिकन लोक नौकरीस ठेवूं नयेत, आणि एकमेकांचे वकील एकमेकांचे दरबारीं असावे. हीं वर्तमानें इ० स० १८१५ त घडलीं.

हा तह राजसभेंतील इतर सभासदांस आवडला नाहीं, तेणेंकरून लढाई पुनः उद्भवली. शेवटचा प्रसंग मकानपुराजवळ तारीख २८ फेब्रुवारी सन १८१६ रोजीं झाला. तेव्हां नेपाळाकडचा सरदार समशेर राणा ह्याचा आक्टरलोनी साहेबानें केवळ पराभव केला. नेपाळी लोक ८०० पडले. इंग्लिशांकडचे ४५ मेले, व १७५ जखमी झाले. नेपाळचा राजा जेरीस आला. त्यानें पूर्वी ठरलेल्या तहनाम्यावर सही करून तो चंद्रशेखर नामक उपाध्याचे हातीं इंग्लिश लष्करांत पाठविला. तो इंग्लिशांस पसंत पडला; आणि युद्ध समाप्त झालें. नंतर थोडक्याच दिवसांनीं नेपाळचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

राजा देवी येऊन मृत्यु पावला; आणि त्याचा अल्पवयस्क मुलगा इंद्रविक्रम हा गादीवर बसला. त्याचा सर्व कारभार भीमसिंग हा पहात असे.

पेंढारी म्हणून कोणी रानटी लुटारू लोक मध्यहिंदुस्थानामध्यें उठले. त्यांस प्रथमतः शिंदे, होळकर ह्यांचा आश्रय असे. गांवांत शिरावें, घरें जाळावीं, लोकांस राखेचे तोबरे द्यावे, माणसांच्या अंगास चिंध्या बांधून त्यांवर तेल घालून त्या पेटवून द्याव्या, अशा प्रकारें हाल करून लोकांपासून द्रव्य काढावें, असें त्यांचें आचरण असे. संस्थानिकांस त्यांची गरज नाहींशी झाली, तेव्हां ते देशभर फिरून दंगा करूं लागले. त्यांत गर्दिखान, करीमखान, अमीरखान, छट्टू, असे कांहीं मुख्य सरदार होते. त्यांनीं इ० स० १८१६।१७ त इंग्लिशांच्या मुलखांत शिरून अशी बंडाळी मांडिली कीं, अल्प काळांत त्यांनीं सुमारें तीनशें गांव उजाड करून टाकिले. गंटूर व मछलीपट्टण ह्या प्रांतांत त्यांची धुमाळी चालली होती, तेव्हां एका आठवड्यांत त्यांनीं १८२ माणसें कापून काढिलीं, ५०५ जखमी केलीं, आणि ३६३३ हालहाल करून मारिलीं, असें सांगतात.

ह्या उपद्रवकारक लोकांचा बंदोबस्त करण्याचा गव्हरनर जनरल साहेबानें निश्चय केला; आणि अनेक सरदारांबरोबर फौजा देऊन त्यांस त्यांजवर पाठविलें.

उभय पक्षांच्या झटापटी अनेक ठिकाणीं झाल्या. शेवटीं पेंढारी थकले. इ० स० १८१८ ह्या वर्षी करीमखान शरण आला. छट्टू अद्यापि तसाच भटकत फिरत होता. त्यास रानामध्यें एका वाघानें मारून खाल्लें. तेव्हांपासून पेंढाऱ्यांचा दंगा अगदीं मोडला.

राजस्थान म्हणजे रजपूतस्थान ह्या देशामध्यें जीं अनेक संस्थानें होतीं, त्यांत उदेपूर, जोतपूर, आणि जैपूर हीं बलिष्ठ होतीं. त्यांचीं आपसांत फार वैमनस्यें असत; व तेथील राजे नेहमी एकमेकांशीं भांडत. उदेपूरचा राणा भीमसिंग ह्याची परम रूपवती कन्या कृष्णकुमारी, हिजवरून मानसिंग वगैरे राजांनीं केवढाल्या कटकटी केल्या, व त्यांचा परिणाम काय झाला, हें सर्व वृत्त विद्यार्थ्यांस पांचव्या पुस्तकावरून माहीत आहेच. हे राजे अनेक कुरापती काढून एकमेकांशीं लढत, तेणें करून ते बहुधा बलहीन झाले. असें पाहून शिंदे व होळकर ह्यांनीं आपला मोर्चा त्यांजकडे फिरविला. तेव्हां ते भ्याले. आणि त्यांनीं त्या दोघांच्याही मुठी गच्च भरून, त्यांस माघारें लाविलें.

रजपूत संस्थानांपैकीं, माचेरी येथील राजानें मात्र बरेच दिवसांपूर्वी इंग्लिश सरकाराशीं तह ठरविला होता. बाकी सगळे स्वतंत्र असत. त्यांचे कज्जे व भांडणें शेवटीं इतकीं झालीं कीं, त्यांच्या कारभारांत हात घालून कांहीं बंदोबस्त करणें गव्हरनर जनरल साहेबास

आवश्यक वाटलें. आणि त्यांनां स्वतःलाही असें पक्कें समजलें कीं, इंग्लिश सरकारानें आपली गोष्ट मनास आणिल्यावांचून आपणांस स्वस्थता प्राप्त होत नाहीं. म्हणून, प्रथमतः जैपूरच्या राण्यानें, दिल्ली येथील इंग्लिश रेसिडेंटास, इ० स० १८१६ च्या एप्रिल महिन्यांत त्याविषयीं अर्ज केला. तो त्याणें सरकारांत पाठविला. सरकारानें त्यालाच त्या राण्याशीं तह करण्याचा अधिकार दिला. उदेपूर व जोदपूर येथील राण्यांनींही जैपूरवाल्याप्रमाणेंच इंग्लिश सरकारचा स्नेह संपादिला.

---

## भाग बारावा.

### पेशवे व भोंसले ह्यांचीं वर्तमानें.

इ० स० १८१४ पासून इ० स० १८१८ पर्यंत.

वसईच्या तहनाम्यावर बाजीरावानें सही केली खरी; परंतु तो संकटसमय जाणून ती त्यानें नाइलाजास्तव केली. वास्तविक पाहिलें असतां त्याचें मन इंग्लिशांविषयीं बिलकुल शुद्ध नव्हतें. शिंदा व नागपूरकर भोंसला हे इंग्लिशांच्या नाशाविषयीं गुप्तपणें बेत करीत होते; त्यांतही त्याचें अंग नव्हतें असें नाहीं.

पेशवे व गायकवाड ह्यांचा खंडणीविषयीं तंटा पुष्कळ दिवसांपासून चालला होता. त्याची तोड काढण्याकरितां फत्तेशिंग गायकवाड ह्याचा वकील गंगाधर

शास्त्री हा, इंग्लिशांचें अभयवचन घेऊन, इ० स० १८१४ च्या आरंभीं पुण्यास आला. त्यास बाजीरावानें आपल्या स्वारीबरोबर पंढरपुरास नेऊन, तेथें त्रिंबकजी डेंगळा ह्या नांवाच्या आपल्या एका प्रिय नौकराकडून, त्यास इ० स० १८१५ च्या जुलै महिन्यांत ठार मारविलें. हें इंग्लिशांस समजतांच त्यांनीं त्रिंबकजीस आपले स्वाधीन करण्याविषयीं बाजीरावास नेट लाविला. त्यानें त्याबद्दल पुष्कळ हरकती घेतल्या व अनेक सबबी सांगितल्या. परंतु इंग्लिश लोक अगदीं निकरावर आले असें पाहून, त्यानें त्यास, सप्तंबरच्या १९ व्या तारखेस त्यांचे हवालीं केलें. त्यास त्यांनीं साष्टी बेटांत कैद करून ठेविलें. तेथून तो, इ० स० १८१६ च्या सप्तंबर महिन्यांत मोठ्या युक्तीनें पळून गेला; व महादेवाच्या घाटांत लोक जमवूं लागला. त्यास पेशवा साह्य आहे, असें इंग्लिशांस पक्कें वाटलें. तथापि तें तो कबूल करीना. तेव्हां इंग्लिशांकडून त्यास अशी खरमरीत ताकीद गेली कीं, तुम्हीं एक महिन्याचे आंत त्रिंबकजीस धरून द्यावें; व धरून देण्याविषयीं मनांत कांहीं कपट नाहीं अशी खातरी करण्याकरितां सिंहगड, रायगड, व पुरंदर हे किल्ले स्वाधीन करावे. हें म्हणणें कबूल करण्यास बाजीरावाला मोठें संकट पडलें. तथापि निरुपायास्तव तें त्याला मान्य करावें लागलें. हें वर्तमान इ० स० १८१७ च्या मे महिन्यांत घडलें.

इतकें झालें तरी, पंढरपुराहून परत आल्यापासून, त्यानें छपावून नवीन फौज ठेवण्याचें, व इंग्लिशांच्या सैन्यांत फितूर करण्याचें जें कपट कर्म मांडिलें होतें, तें सोडिलें नाहीं. शेवटीं तें सगळें इंग्लिशांस समजलें. त्यांनीं युद्धाची तयारी चालविली. त्यांची कांहीं फौज पुण्यानजीक खडकी येथें होती. तिजवर, तारीख ५ माहे नोवेंबर सन १८१७ रोजीं पेशव्याच्या सैन्यानें हल्ला केला. ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. बाजीराव पर्वतीच्या उंच टेंकाडावर बसून तिची गंमत पाहात होता. ह्या लढाईत पेशव्यांकडचे सुमारें ५०० लोक पडले, व इंग्लिशांकडचे १८ मेले व ५७ जखमी झाले. पुढें आठ दिवसांत इंग्लिश सैन्यास भरपूर मदत येऊन पोहोंचली. नंतर खडकीचें लष्कर, तारीख १६ रोजीं, पुण्यास गारपिरावर येऊन उतरलें. खडकीची लढाई होण्यापूर्वीच पुण्याचा इंग्लिश रेसिडेंत एल्फिन्स्तनसाहेब ह्याचे बंगल्यावर चाल करून, पेशव्याच्या लोकांनीं त्याची दुर्दशा उडविली होती. साहेब मात्र त्या गर्दीतून पळून जाऊन खडकीच्या लोकांस मिळाला.

इंग्लिश सैन्यास घोडनदी वगैरे ठिकाणाहून मदत येऊन पोहोंचल्यावर १६ व्या तारखेस उभयपक्षांकडील सैन्यांची एक मोठी चकमक झडली. तींत बाजीराव केवळ पराभव पावून पुणें सोडून पळत सुटला; तो

एकसारखा सात महिने पळत होता. त्याचे पाठीवर इंग्लिश सरदार स्मिथसाहेब हा असे. शेवटीं सातपुड्याच्या वाटेनें हिंदुस्थानांत जात असतां त्या घांटाजवळ इंदुरास सर जान मालकम साहेब ह्याचें लष्कर येऊन पोहोंचलें. त्या वेळीं, पळून जाणें उपयोगीं नाहीं, असें बाजीरावास वाटून, तो दुर्बल होत्साता त्याच साहेबास शरण गेला; आणि त्यानें त्यास सांगितलें कीं, मी, गव्हर्नर जनरलसाहेब सांगतील त्याप्रमाणें वागण्यास कबूल आहें. तेव्हां त्या साहेबानें त्याशीं तह ठरविला. तो असा कीं, बाजीरावानें पेशवेपणाचे सर्व हक्क सोडून देऊन, दरसाल आठ लक्ष रुपये नेमणूक घ्यावी, आणि ब्रह्मावर्त येथें स्वस्थ राहावें. हा ठराव तारीख ११ माहे नोवेंबर सन १८१८ रोजीं झाला. आणि तो इंग्लिशांनीं तात्काळ अमलांत आणिला. ह्या प्रकारें करून पेशव्यांचें राज्य अविच्छिन्न इंग्लिशांचे हातीं आलें. आतां येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, बाजीराव इ० स० १८५१ च्या जानेवारीच्या २८ व्या तारखेस ब्रह्मावर्तीं मरण पावला, तेव्हां तो ७७ वर्षांचा होता. त्याला औरस पुत्र मुळींच नव्हता, म्हणून त्यानें तीन पुत्र दत्तक घेतले होते. त्यांपैकीं धोंडोपंत म्हणून जो होता, तो इ० स० १८५७ च्या शिपायांच्या बंडांत मिळाला, व क्रूर कर्मे करून बरीच प्रसिद्धि पावला. त्याचें संक्षिप्त वर्णन सदरहूच्या बंडाच्या भागांत करूं.

पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें खरें. पण त्यांत त्यांनीं एक गोष्ट फार चांगली केली. ती ही कीं, मराठी राज्याचा मूळ स्थापक शिवाजी राजा, ह्याच्या वंशजास पेशव्यांनीं, तो राजा होता का नव्हता असें करून टाकून त्यास कैदेंत ठेविलें होतें, त्यास बंधमुक्त करून, गादीवर बसविलें, आणि त्याजकडे कांहीं मुलूखही दिला.

नागपूरचा रघुजी भोंसला, हा इ० स० १८१६ त मृत्यु पावला. त्याचे गादीवर त्याचा वेडगळ मुलगा पर्सोजी हा बसला. त्याच्या राज्याचा कारभार, त्याचा कोणी आप्त आपासाहेब म्हणून होता तो पाहत असे. पर्सोजी गादीवर असतां त्याच्या मुलखाच्या रक्षणार्थ इंग्लिशांचीं सहा सात पलटणें होतीं. व त्यांच्या खर्चाबद्दल तो त्यांस दरसाल साडेसात लक्ष रुपये देत असे. हा पर्सोजी इ० स० १८१७ त निवर्तला. नंतर त्याचा पुत्र आपासाहेब, हा गादीचा मालक झाला. तो इंग्लिशांचा फार द्वेष करी. व त्यानें बाजीराव पेशव्याशीं पत्रव्यवहार ठेविला होता; तो इंग्लिशांस समजला. तेव्हां त्यांनीं त्याशीं लढण्याची तयारी केली. तोही सिद्ध झाला उभय सैन्यांचें युद्ध, तारीख २६–२७ माहे नोवेंबर सन १८१७ रोजीं सीताबळदीच्या घाटांत झालें. तेव्हां भोंसल्यांकडचे आरब जिवावर उदार होऊन लढले. व त्यांनीं प्रथमारंभीं इंग्लिशांच्या फौजेस अगदीं गांगर-

वून टाकिलें. तरी शेवटीं कप्तान फित्सजरल्द साहेबानें त्यांचा मोड केला, व त्यांच्या तोफा घेतल्या.

नंतर कांहीं वेळानें, निरुपायास्तव, आपासाहेब, तारीख १६ दिसेंबर रोजीं, आपल्या दोन दिवाणांसहवर्तमान इंग्लिशांचे स्वाधीन झाला. तरी नागपूर शहरांत आरब लोक होते, ते इंग्लिशांचा प्रवेश आंत होऊं देईनात. तेव्हां तेथेंही एक लढाई झाली. तींत आरब हटले आणि त्यांनीं तें शहर सोडिलें. तें इंग्लिशांनीं आपले ताब्यांत घेतलें. आपासाहेब हा त्याच्या दोन दिवाणांसुद्धां इंग्लिशांच्या कैदेंत होता, त्यास गव्हरनर जनरलाचे आज्ञेवरून प्रयागाकडे रवाना केलें. तो तेथें पोहोंचण्यापूर्वींच, मार्गांत रायचूर मुक्कामीं, पाहारेकरी शिपायांच्या सामलतीनें शिपायाचा पोषाख धारण करून फरारी झाला. त्याजबरोबर कितीएक लोक होते, व तो कोठें सांपडेल हेंही पुष्कळांस ठाऊक होतें. आणि त्यास धरून देईल त्याला २,००,००० रुपये रोख बक्षीस व १०,००० ची जाहागीर तहाहयात पावेतों देऊं, असा जाहिरनामा इंग्लिश सरकारानें लाविला होता, तरी एकानें देखील द्रव्यलोभास्तव विश्वासघाताचें पाप पतकरलें नाहीं. हिचें नांव स्वामिभक्ति व स्वराजनिष्ठा.

आपासाहेबाची वाट अशी झाल्यावर त्याचें सगळें राज्य इंग्लिशांस मिळालें. तरी त्याचा वारस बाजीराव

ह्मणून कोणी एक पुरुष होता, त्यास त्यांनीं गादीवर बसविलें, आणि त्याचे नांवानें त्यांनीं तें राज्य चालविलें. ह्या वेळीं नागपूरचें राज्य केवळ खालसा झालें नाहीं. व्यवहार करीत इंग्लिश लोक, तरी दरएक कामीं राजाचें नांव असे. हा मुलूख खरोखर इंग्लिशांचे ताब्यांत आल्याचा वेळ पुढेंच आहे. त्याचें वर्णन यथाकालीं करूं.

---

## भाग तेरावा.

**होळकराशीं तह –ब्रह्मदेशाशीं युद्ध –भरतपूरचा वेढा, इ० स० १८१८ पासून इ० स० १८२६ पर्यंत.**

तिकडे होळकराच्या दरबारांत मोठी बंडाळी माजली होती. बाळरोजा मल्हारराव ह्याची पालन करणारी पोषक आई तुळजाबाई हिनें क्रूरपणानें आपले कित्येक मुत्सद्दी ठार मारिले, आणि फार दुराचरण आरंभिलें. तिची फौज बेकाम होती, ती बाजीराव पळत असतां त्यास जाऊन मिळूं पाहात होती. हें इंग्लिशांस कळलें. तेव्हां सर थामस हिस्लाप साहेबास त्यांनीं तिजवर पाठविलें. व मागाहून माल्कम साहेबासही कांहीं फौज बरोबर देऊन त्याच्या मदतीस रवाना केलें. हीं सैन्यें, होळकराची छावणी शिपानदीवर होती, तेथून सुमारें पांच कोसांवर येऊन उतरलीं. त्याच

रात्रीं, म्हणजे ता. २० दिसेंबर सन १८१७ चे रात्रीं, होळकराच्या सरदारांनीं एकोपा करून तुळजाबाईचा गळा कापून तिचें प्रेत नदींत ढकलून दिलें. तिचा असा वाईट परिणाम होण्यास तिचें दुष्ट आचरण कारणीभूत होय. तिच्या पश्चात् ज्या मुत्सद्यांचे हातीं त्या दरबाराचा अधिकार आला, ते इंग्लिशांस अगदीं पाण्यांत पहात असत. उभय पक्षांच्या सैन्यांची लढाई तुळजा मेली त्याच्या दुसरेच दिवशीं त्या नदीमध्यें लागली. ही लढाई महिदपूरची लढाई ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. हिजमध्यें होळकराचे ३००० व इंग्लिशांचे ७७८ लोक जायबंदी झाले. होळकर पराभव पावला. नंतर तारीख ६ जानेवारि सन १८१९ इसवी रोजीं, मंडळेश्वरीं होळकरानें, इंग्लिशांशीं तह ठरविला. त्यांत मुख्य कलमें अशीं होतीं.–होळकरानें पेंढाऱ्यांस मदत करूं नये; त्यानें रजपूतांच्या मुलखावरचे सगळे हक्क सोडावे; सातपुड्याच्या दक्षिणेकडील मुलूख इंग्लिशांस द्यावा; आणि इंग्लिशांच्या सल्ल्याखेरीज इतर कोणत्याही संस्थानिकाशीं संबंध ठेवूं नये.

कच्छ येथें बहारमलजी ह्या नांवाचा एक राजा राज्य करीत असतां लाधुबा हा राजपुत्र त्याशीं स्पर्धा करूं लागला. त्याला बहारमलजीनें क्रूरपणेंकरून जिवें मारून टाकिलें. त्या बिचाऱ्याची बायको तेव्हां

गरोदर होती, तिची दशा तिच्या नवऱ्याप्रमाणेंच फार वाईट व्हावयाची; परंतु, इंग्लिश सरकारानें तिला आश्रय दिला, ह्मणून ती बचावली. ती प्रसूत होऊन तिला पुढें मुलगाही झाला. बहारमलजीसारखा दुष्ट पुरुष केव्हां काय करील कोण जाणे, ह्या भीतीनें, इंग्लिशांनीं आपल्या अंजर येथील ठाण्यांत बंदोबस्ताकरितां आणखी कांहीं फौज पाठविली. ह्या प्रबल लोकांपुढें आपलें कांहीं चालायाचें नाहीं, असें जाणून, बहारमलजीनें, लाधूबाचा सासरा कल्याणशिंग ह्याजवर शस्त्र धरिलें. त्याला इंग्लिशांचा आश्रय होता तेव्हां अर्थातच बहारमलजींचें व इंग्लिशांचें वैमनस्य आलें. इंग्लिश सैन्य तयार होऊन एकदम भूज शहरावर पडलें; आणि तें त्या लोकांनीं तारीख २४ मार्च सन १८१९ रोजीं छापा घालून हस्तगत केलें. तेव्हां बहारमलजीचे उपाय हरले. त्यास इंग्लिश सरकारानें पदच्युत करून त्याच्या राज्याचा सगळा कारभार त्याच्या नांवानें एका हुशार दिवाणाचे हातून चालविला.

त्याच वर्षीं कच्छदेशामध्यें एक मोठा धरणीकंप झाला. त्याच्या योगानें भूज शहरांत ७००० घरें अगदीं जमीनदोस्त झालीं, व ११४० मनुष्यें त्या झपाट्यांत सांपडून प्राणांस मुकलीं. अंजर येथेंही त्यामुळें ३००० घरें अगदीं बसलीं. आणि तेथें किल्ला

होता तो नाहींसा होऊन त्याचे जागीं भला मोठा एक धुळीचा पर्वत पडला.

पुढें इ० स० १८२३ पावेतों सांगण्यासारखें विशेष वर्तमान इकडे घडलें नाहीं. त्या वर्षी इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील मुलखाचें उत्पन्न सुमारें २०,१३,२२,१४४ रुपये होतें.

ब्रह्मदेशाशीं लढाई त्याच वर्षी सुरू झाली. तिचें थोडेंसें वर्णन करितों. ब्रह्मी लोकांनीं आसाम प्रांत जिंकून घेतल्यामुळें, त्यांच्या व इंग्लिशांच्या राज्यांची सरहद्द एक झाली. त्यांच्या मुलखांत न्याय व बंदोबस्त इत्यादि लोकहिताच्या गोष्टी मुळींच नसल्या कारणानें त्यांच्या राज्यांतील प्रजा इंग्लिशांच्या चितगांव वगैरे प्रांतीं येऊन राहिली. ती ब्रह्मी लोक इंग्लिशांपाशीं परत मागूं लागले. तें त्यांनीं अमान्य केलें. तेव्हां अर्थातच उभय पक्षांमध्यें वैमनस्य आलें. चितगांव आणि आराकान ह्यांच्या मध्यें शाहापुरी नामक बेटावर आपलें जाहाजांच्या रक्षणाकरितां इंग्लिशांनीं थोड्याशा लोकांचा पाहरा ठेविला होता; त्यावर, इ० स० १८२३ च्या सप्तंबर महिन्यांत ब्रह्मी लोकांनीं हल्ला केला; आणि तेथील लोकांपैकीं कित्येकांस ठार मारून बाकीच्यांस हाकून लाविलें. तरी इंग्लिश सैन्यानें तें पुनः परत आपले ताब्यांत घेतलें. नंतर ब्रह्मी लोक इंग्लिशांच्या काचार नामक प्रांतांत शिरले. त्यांत त्यांचा दोन ठिकाणीं

पराभव झाला. म्हणून ते मणिपुरास परत निघून गेले.

ह्यापुढें उभयपक्षांच्या अनेक लढाया झाल्या. त्यांत ब्रह्मी लोकांकडचे थाकिया डुंगी, सुभा वुंगी, नार्वेनबारेन बंधुला, इत्यादि अनेक सरदार होते. आणि कर्नेल रिचार्डस्, लेफ्तनेंत पेंबर्तन, जनरल मारिसन, इत्यादि इंग्लिशांकडचे होते. इंग्लिशांनीं पराक्रमेंकरून आसाम व आराकान हे प्रांत, व रंगून इत्यादि शहरें घेतलीं. आणि आपल्या शत्रूंस दोन तीन वेळां इतकें जर्जर केलें कीं, त्यांनीं लागलेंच तहाचें बोलणें लाविलें. तथापि तो कठीण प्रसंग निघून गेल्यावर, इंग्लिशांशीं तह करणें हें आपणास मोठें लांछन आहे, असें त्यांचे मनांत येऊन, त्यांनीं तहाचे ठराव एकीकडे ठेवून, पुनः युद्ध आरंभिलें. परंतु, शेवटीं ते थकले. इंग्लिशांपुढें त्यांचा कांहीं उपाय चालेना. तेव्हां त्यांच्या राजानें, तारीख २४ माहे फेब्रुआरी सन १८२६ रोजीं, इंग्लिशांशीं तह ठरविला. त्याचा सारांश असा. ब्रह्मी राजानें आसाम, आराकान, व तेनासेरीम हे प्रांत इंग्लिशांस द्यावे; आराकानचे डोंगर उभयतांच्या राज्यांची सरहद्द असावी; एक कोट रुपये चार हप्त्यांनीं ब्रह्मी राजानें इंग्लिशांस द्यावे; आणि इंग्लिशांच्या व्यापारी जाहाजांस ब्रह्मदेशांत चांगल्या रीतीनें वागवून घ्यावें; इत्यादि कलमें त्यांत ठरलीं. व तीं यथास्थित

अमलांतही आलीं. ह्याप्रमाणें ब्रह्मदेशाशीं जी लढाई चालली होती, तिचा शेवट झाला. त्या वेळीं लार्ड आम्हर्स्ट हा गव्हरनर जनरलाचे जागेवर होता.

इ० स० १८२४ त भरतपूरच्या राजाजवळ इंग्लिशांचा असा तह ठरला होता कीं, त्यांनीं त्याच्या राज्यांत दखलगिरी न करितां त्याचें शत्रूपासून रक्षण करावें; व प्रसंग पडेल तेव्हां त्यानें त्यांस यथाशक्ति मदत द्यावी. पुढें इ० स० १८२४ त, तेथचा राजा बळदेवसिंग हा मरायास टेंकलेला होऊन त्यानें इंग्लिश सरकारास आपले मागें आपल्या मुलास गादीवर बसविण्याविषयीं विनंतीपत्र पाठविलें. तें, सर देविद आक्तर लोनीसाहेब ह्यांनीं मान्य करून अमलांतही आणिलें. त्याच्या पुढच्या वर्षी त्या बाळराजाचा चुलतभाऊ दुर्जनसाल हा बलिष्ठ होऊन गादी बळकावून बसला. तेव्हां आक्तर लोनी साहेब त्याजवर चालून जाण्याच्या तयारीस लागला. इतक्यांत कलकत्ता सरकाराकडून त्यास अशी आज्ञा आली कीं, भरतपूर प्रकरणांत आपणास हात घालण्याचें कारण नाहीं. तेणेंकरून त्या साहेबाला इतका राग आला कीं, त्यावरून त्यानें आपले नौकरीचा तात्काळ राजीनामा दिला.

पुढें थोडक्याच दिवसांनंतर, आक्तरलोनी साहेबास जी आपण आज्ञा दिली, ती योग्य नव्हे, असें गव्हरनर जनरलास वाटून, दुर्जनसाल ह्यास गादीवरून काढण्या-

चा व खऱ्या वारसास गादीवर बसविण्याचा निश्चय त्यानें केला. २००० सैन्य तिकडे योजिण्याचें ठरलें. त्यावर मुख्य लार्द कोंबर्मीर साहेब नेमला. त्यानें आपलें लष्कर किल्ल्याजवळ आणून तारीख २५ दिसेंबर सन १८२५ रोजीं त्यावर तोफांचा भडिमार चालविला. किल्ल्यांत दुर्जनसाल, आणि त्यास चोहींकडून बाहेर इंग्लिश सैन्याचा गराडा, अशी स्थिति प्राप्त झाली. शत्रूंनीं आंतून बाहेर पडण्याविषयीं अनेक वेळां प्रयत्न केले. परंतु, ते सगळे व्यर्थ गेले. कांहीं एक उपाय चालेना. तेव्हां इंग्लिशांनीं हल्ला करून किल्ला हस्तगत केल्यावर दुर्जनसाल मुलांमाणसांसुद्धां इंग्लिशांच्या हातीं लागला. भरतपूर किल्ला त्यांनीं आपले ताब्यांत घेतला. हें वर्तमान तारीख १८ माहे जानेवारी १८२६ इ० रोजीं घडलें.

दुर्जनसाल ह्यास कैद करून अलाहाबादेस पाठविलें. किल्ला हातीं आल्याचे दुसरे दिवशीं, ह्मणजे जानेवारीच्या १९ व्या तारखेस, लार्द कोंबर्मीर व सर चार्लस मेतकाफ, ह्या इंग्लिश सरदारांनीं आंत जाऊन खऱ्या वारीस राजास मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें. आणि राज्याचा सगळा कारभार दरबारच्या दिवाणांनीं इंग्लिश रेसिदेंताच्या विद्यमानें चालवावा, असें ठरविलें.

# भाग चवदावा.

## लॉर्ड विलियम बेंतिक ह्याची कारकीर्द.—अफगानिस्थानाशीं लढाई- सिंधचे अमीराशीं लढाई- इत्यादि.

इ० स० १७२६ पासून इ० स० १८४३ पर्यंत.

**लार्ड आम्हर्स्ट** ह्याचे मागून **लार्ड विलियम बेंतिक** हा गव्हरनर जनरल झाला. त्या वेळीं **हिंदुस्थानांतील** इंग्लिश राज्याच्या उत्पन्नापेक्षां खर्च पुष्कळ होत असे. ही अव्यवस्था त्यानें बरेच अंशीं मोडिली. एतद्देशीय वर्तमानपत्रांस स्वातंत्र्य त्यानेंच दिलें; कोणत्याही बायकोनें सती जातां कामास नये, असा कायदा ठरविला; जागोजाग शाळा घालून प्रजेचें ज्ञान वाढविण्याविषयीं पुष्कळ यत्न केले; अशीं अनेक उपयुक्त कार्यें ह्याचे हातून घडलीं. विलायतेहून जाऊन येण्यास पूर्वी सहा सात महिने लागत असत; परंतु ह्याचे कारकीर्दीपासून हिंदुस्थान व इंग्लंद ह्यांच्यामध्यें आगबोटी जाऊं येऊं लागल्यामुळें तें काम एक दोन महिन्यांत होऊं लागलें.

आणखी **म्हैसूरचा** राजा **कृष्णराय यदुवीर** ह्याचा कारभारी पुरणया हा मरण पावल्यामुळें त्याचे राज्यांत फार अव्यवस्था झाली, व राजाच्या डोक्यावर कर्जाचें टोपलें सांचलें. ह्मणून त्याच्या मुलखाचा कारभार

इ० स० १८३२ त, इंग्लिशांनीं आपणांकडे घेतला. त्याप्रमाणेंच कुर्ग प्रांताचा राजा वेजराज, हा आपल्या प्रजेशीं फार क्रूरपणानें वागूं लागला. तो इतका कीं खुद त्याची बहीण व मेहुणा हीं जीवांच्या भयानें इंग्लिशांच्या आश्रयास येऊन राहिलीं. असें न करण्याविषयीं इंग्लिशांनीं सामोपचाराचें पत्र त्याला पाठविलें. पण तें त्यानें मुळींच मानिलें नाहीं, आणि पत्र घेऊन गेलेले वकिलासही कैद करून ठेविलें. तेव्हां त्याजवर इंग्लिश फौज रवाना झाली. तिनें कुर्ग प्रांताची राजधानी मादिकेरी ( मर्कारा ) हस्तगत करून घेतली. तेव्हां वेजराज, आपल्या मुलांमाणसांसुद्धां इंग्लिशांस शरण आला. त्यास धरून त्यांनीं बेंगलोरच्या किल्ल्यांत ठेविलें, आणि त्याचा मुलूख आपल्या राज्यांत सामील केला. ही गोष्ट इ० स० १८३४ त घडली. नंतर इ० स० १८३५ च्या मार्च महिन्याच्या २० व्या तारखेस लार्ड बेंतिक साहेबानें गव्हरनर जनरलाचें काम सोडिलें. ह्याचे मागून लार्ड आक्लंद साहेब गव्हरनर जनरल झाले.

काबूलचा राजा शाहासुजा, ह्यास, त्याचा भाऊ सुलतान महंमद ह्यानें फत्तेखान नामक वजीराच्या साह्यानें पदच्युत करून आपण गादी बळकाविली होती. पुढें फत्तेखानाचा खून महंमदानें करविला. तेव्हां त्याच्या वीस भावांनीं त्याबद्दल सूड उगविण्याचा निश्चय

केला. आणि सैन्य जमवून त्याशीं युद्ध आरंभिलें. सुलतान महंमद पराभव पावला. त्याच्या राज्याचे वेगवेगळे प्रांत त्या भावांनीं बळकाविले, त्यांत दोस्त-महंमद हा काबूलचा राजा फार बलिष्ठ होता.

ह्या काळाच्या सुमारास, रुशिआदेशचा बादशाहा हिंदुस्थानाचें राज्य घेण्याची तयारी करीत आहे, अशी खबर इंग्लिशांस समजली. तेव्हां ते जरासे घाबरले. परंतु, रुशियन लोकांस हिंदुस्थानांत येण्यास वाट इराण व काबूल ह्यांमधून आहे; ह्यास्तव त्या राष्ट्रांशीं आपला सल्ला असला ह्मणजे आपल्या राज्यास सहसा धोका नाहीं; असा विचार गव्हरनर जनरल साहेबानें मनांत आणून दोस्त महंमदाकडे कप्तान अलेक्झांदर बर्नस नांवाचा साहेब वकील पाठविला. दोस्तमहंमदाच्या दरबारांत तो गेला. परंतु, तेथें रुशियन सरकारच्या वकिलाचें वजन फार पडलेलें पाहून, कांहीं एक बोलणें न लावितां तो परत हिंदुस्थानांत आला.

पुढें इ० स० १८३७ त लाहोरचा प्रबल शीख राजा रणजितशिंग, ह्यानें स्वारी करून दोस्तमहंमदाच्या भावापासून पेशावर प्रांत घेतला. तो बलेंकरून परत घेण्यास आपण समर्थ नाहीं, असें पाहून, दोस्त-महंमदानें, त्या कामांत मध्यस्थी करण्याविषयीं गव्हरनर जनरलास विनंतीपत्र लिहलें. तरी त्यांचें अंतर्याम शुद्ध होतें असें नाहीं. ह्मणून इंग्लिशांनीं शाहासुजा,

जो लुधियाना येथें नेमणूक खाऊन त्यांच्या आश्रयास राहिला होता, त्याशीं व रणजितशिंगाशीं तह केला आणि ते दोस्तमहंमद व त्याचे बंधु, ह्यांशीं युद्ध करण्याच्या तयारीस लागले. हें वर्तमान इ० स० १८३८ त घडलें.

पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें, त्या वेळीं शिवाजीच्या वंशांतील केवळ नामधारी राजा प्रतापसिंह, हा त्यांच्या कैदेंत होता, त्यास इंग्लिशांनीं मुक्त करून सातारा येथें गादीवर स्थापून त्याजकडे थोडासा मुलूख दिला, असें पूर्वीं लिहिलें. त्या प्रतापसिंहानें उपकार विसरून, इंग्लिशांशीं विरोध मांडिला. त्यानें गुप्तपणें कांहीं फौज ठेविली व लढाईच्या सामानाची तयारी चालविली. ती, इंग्लिशांस समजली. तेव्हा त्यांनीं त्याला, इ० स० १८३९ ह्या वर्षीं पदच्युत करून काशी येथें नेऊन ठेविलें. आणि त्याचे गादीवर, त्याचा भाऊ शाहाजी, ह्मणजे ज्यास आपासाहेब असें ह्मणतात, त्यास बसविलें.

इंग्लिशांच्या सैन्याचा कांहीं भाग मुंबईहून निघून सिंधप्रांतांतून चालला होता. त्यास सिंधच्या अमीरांनीं हरकत केली. ह्मणून सर जान कीन साहेबानें कराची हस्तगत करून घेऊन हैदराबादेवर चाल केली. तेव्हां अमीर भयाभीत होऊन इंग्लिशांशीं तह ठरविते झाले. तो असा. अमीरांनीं इंग्लिश सरकारास तीस लक्ष रुपये

द्यावें; इंग्लिश सरकारास आपले धनी कबूल करून त्यास आपले उत्पन्नाचे अर्धापेक्षां अधिक खंडणी द्यावी; आणि ४००० इंग्लिश लष्कर कुमकेस ठेवावें. हा तह ठरल्यावर तें सैन्य पुढें चाललें झालें. इतक्यांत बंगाल्याकडूनही कांहीं सैन्य आलें. ह्या दोन्ही लष्करांची गांठ शिकारपूर येथें पडली. ही फौज, वर सांगितलेल्या लढाईवर काबुलाकडे चालली होती. हें वाचणारांचे लक्षांत असावें.

ह्यावेळीं मार्गांत इंग्लिश सैन्याची फार खराबी झाली. ती मुख्यत्वें करून, शत्रूकडील सरदार मेहेराबखान ह्यानें केली. इंग्लिशांच्या फौजेनें कंधार घेऊन, तेथें शाहासुजा ह्यास गादीवर बसवून त्याचे नांवाची द्वाही फिरविली. नंतर, दोस्तमहंमदाचा शूर पुत्र हैदरखान, ह्याजपासून इ० स० १८४० च्या मार्च महिन्यांत, इंग्लिश सैन्यानें गिझनी घेतली. तेथें हैदरखान त्यांचे हस्तगत झाला. थोडक्या दिवसांनीं काबूल शहरही इंग्लिशांनीं घेतलें. तेव्हां त्यांस अफगाणिस्थानांतून हांकून देण्यासाठीं दोस्तमहंमदानें मोठी फौज जमविली. हें इंग्लिशांस समजतांच त्यांनींही लढाईची सिद्धता केली. उभय पक्षांची लढाई तारीख २ माहे सप्तंबर सन १८४० रोजीं पर्वान येथें झाली. तींत दोस्तमहंमद पराभव पावून रानांत पळून गेला. परंतु, भटक्या मारून तरी काय उपयोग असें मनांत आणून, व कांहीं उपाय चालत नाहीं

असें पाहून, तो दोस्तमहंमद माक्नातन साहेबास शरण गेला. त्यास त्याच्या मुलांमाणसांसहवर्तमान इंग्लिशांनीं पेशावर येथें नेऊन ठेविलें. त्यास खर्चाची नेमणूक दोन लक्ष रुपये ठरविली होती.

ह्याप्रकारें करून शाहासुजा व इंग्लिश ह्यांच्या इच्छेप्रमाणें काबुलाची व्यवस्था झाली ; तरी ती टिकली नाहीं. झालेली अवस्था अफगाण दरबारच्या कित्येक सरदारांस व आणखीही कित्येक लोकांस आवडली नाहीं ; ह्मणून त्यांनीं बडें केलीं. पुढें इ० स० १८४१ सांचे अखेरीस काबूल येथें मोठा दंगा झाला. तो मोडण्याविषयीं इंग्लिशांचें चाललें नाहीं; ह्मणून अफगाणिस्थान सोडून परत हिंदुस्थानास जाण्याचें तेथील इंग्लिशसरदारांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें निघून येतांना अफगाणी लोकांनीं वारंवार हल्ला केल्यामुळें व थंडी फार पडल्यामुळें सर्व इंग्लिश फौजेचा नाश झाला.

इ० स० १८४२ ह्या वर्षी लार्ड एलनबरो गव्हरनर जनरलाचे कामावर आला. पुढें जनरल पालक व जनरल नात ह्या साहेबांनीं काबुलाकडे दोन फौजा नेऊन तें शहर घेतलें, आणि इंग्लिशांच्या नांवास जो बट्टा पूर्वी लागला होता तो उडाविला. हें केल्यानंतर ते आपल्या फौजा घेऊन हिंदुस्थानास परत आले. मग गव्हरनर जनरल साहेबानें अफगाण देशाचा संबंध सोडून दोस्तमहंमदास सोडून दिलें. तो परत जाऊन आपल्या

पहिल्या गादीवर बसला. पंचवीस कोटि रुपये खरचले, व अगदीं नाहीं झटलें तरी सुमारें १५००० लोक मरण पावले. पण, ह्यापासून फायदा म्हटला तर कांहीं एक झाला नाहीं.

रणजितशिंग इ० स० १८३९ त मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा **करक**शिंग हा त्याचे गादीवर बसला. तो निवर्तल्यावर, **र**णजितशिंगाचा दासीपुत्र **शेर**शिंग हा कांहीं दिवस राजपद भोगिता झाला. तो इ० स० १८४३ ह्या वर्षी अपघातानें मृत्यु पावला. नंतर त्याचा पुत्र **दि**लीपशिंग हा लाहोरचा राजा झाला.

**सिं**धच्या अमीरांशीं तह झाला, म्हणून जो मागें सांगितला, त्याप्रमाणें त्यांजकडून वर्तन होईना, व ते इंग्लिशांच्या व्यापाराचे मालवर जास्त जकात बसवूं लागले, तेणेंकरून त्यांजवर शस्त्र धरणें इंग्लिशांस प्राप्त आलें. तिकडे सैन्यें रवाना झालीं. त्यांत **सर चा**र्लस **ने**पियर वगैरे योद्धे नेमिले. इ० स० १८४३ च्या फेब्रुवारि महिन्यांत इमामगड येथें एक लढाई झाली. तींत इंग्लिश जय पावले. दुसरी लढाई **मि**आनी येथें झाली. तींत इंग्लिशांकडचे २५६ लोक पडले; व अमीरांकडचे पांच हजारांपेक्षां अधिक लोक प्राणांस मुकले. **सिंध** मुलूख इंग्लिशांनीं आपले कबज्यांत घेतला. त्यांतला थोडासा प्रांत **खैर**पुरच्या नबाबाकडे राखून, बाकीचा

त्यांनीं आपले राज्यांत सामील केला. त्याचा वसूल सुमारें ४०००००० रुपये येतो.

इकडे ग्वाल्हेरचा जनकोजीराव शिंदा इ० स० १८४३ च्या फेब्रुआरी महिन्यांत मरण पावला. त्याच्या बायकोनें एक आप्त मुलगा दत्तक घेतला. तो इंग्लिश सरकारानेंही कबूल केला; आणि तो लहान सबब राज्याचा कारभार पाहण्यास मामासाहेब म्हणून एक सरदार नेमिला. मामासाहेबाचें व राणीसाहेबांचें कांहीं कारणावरून वैमनस्य आलें. तिनें त्याला कारभारांतून काढून टाकिलें; आणि दादासाहेब खासगीवाला ह्यास तें काम सांगतलें. हें इंग्लिशांस बिलकुल आवडलें नाहीं. त्यांनीं दादासाहेबास आपले स्वाधीन करण्याविषयीं राणीस पत्र लिहिलें. तें तिनें जुमानिलें नाहीं. परंतु त्यांनीं फारच नेट लाविला, तेव्हां खासगीवाल्यास त्यांचे स्वाधीन करणें तिला भाग पडलें. पुढें दिसेंबर महिन्यांत पन्यार व महाराजपूर येथें शिंदे व इंग्लिश ह्यांच्या सैन्यांच्या लढाया होऊन, शिंद्याचें लष्कर पराभव पावलें. नंतर शिंद्यापासून इंग्लिशांनीं तह ठरवून घेतला. त्यांतला आशय असा. ७००० पायदळ व २००० स्वार इतकें इंग्लिशांचें कुमकेचें लष्कर शिंद्याकडे असावें, व त्याबद्दल त्यानें त्यांस कांहीं मुलूख तोडून द्यावा; शिंद्यानें ९००० लष्कर, १२ लढाईच्या तोफा, २० इतर तोफा, आणि २०० गोलंदाज, ह्यापेक्षां जास्त

फौज ठेवूं नये; ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर इंग्लिशांच्या ताब्यांतले लोक व त्यांवर एक गोरा अंमलदार, असे राहावे; राजा मोठा होई तोंपावेतों राज्याचा कारभार नियमित मंत्री मंडळीनें रासिडेंत साहेबाच्या अनुमताप्रमाणें चालवावा; आणि राणीसाहेबांचे हातीं कांहीं एक अधिकार ठेवूं नये. अशा प्रकारेंकरून ग्वाल्हेरचा दंगा मोडला.

---

## भाग पंधरावा.

### पंजाबची लढाई—लार्ड दलहौसीची कारकीर्द—निजाम व अयोध्येचा नबाब ह्यांचें वर्तमान.—इ० इ०स० १८४३ पासून इ० स० १८५६ पर्यंत.

रणजितशिंगाचा व इंग्लिशांचा तह ठरला होता, तो त्याचे मागें फार दिवस चालला नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें, दिलीपशिंग हा अल्पवयस्क असल्या कारणानें, राज्याचा कारभार त्याची आई पाहत असे. तिनें आपला भाऊ वजीर नेमिला होता. पुढें कांहीं गडबड होऊन तो मारला गेला. नंतर ती जागा गुलाबशिंग नामक पुरुषास मिळाली. ह्या राज्यांत कवाईत शिकविलेलें सैन्य फार असे, व त्यावर कोणाचा धाक नसे. म्हणून त्यास स्वस्थ बसून चैन पडेना. त्या सैन्यानें इंग्लिशांच्या मुलखावर विनाकारण चाल करून, त्यांत अतिशयित धामधूम मांडिली.

हें समजतांच सर ह्यू गाफ ह्याचे हाताखालीं सैन्य होतें, तें त्याजवर रवाना झालें. त्याची व शिखांच्या १५००० सैन्याची गांठ मुडकी येथें पडली. तेथें इ० स० १८४५ च्या दिसेंबरच्या २५ व्या तारखेस मोठी लढाई झाली. तींत इंग्लिशांकडचे सेल वगैरे कितीएक सरदार पडले, व त्यांच्या सैन्यास पुष्कळ हाल भोगावे लागले. तरी शेवटीं तेच जय पावले. दुसरी लढाई २३ व्या तारखेस फिरोजपूर येथें जुपली. तेथेंही इंग्लिशांस यश आलें, आणि शीख सतलज नदीच्या पलीकडे पळून गेले. पुनः तयारी करून ते आणखी एकवार आलीकडे आले. नंतर, तारीख २८ जानेवारी रोजीं आलिवाल येथें एक, व तारीख १० फेब्रुवारी रोजीं सोब्रन येथें एक, अशा दोन मोठ्या लढाया झाल्या. त्याही इंग्लिशांनींच जिंकिल्या. नंतर, त्यांनीं एकामागून एक किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. शीख लोक अगदीं मट्टयास आले. त्यांच्यानें इंग्लिशांपुढें टिकाव धरवेना. त्यांचें राजधानीचें शहरही इंग्लिशांनीं घेतलें. तेव्हां त्यांचे उपाय हरले. मग त्या राणीचा व इंग्लिशांचा तह ठरला. त्यावरून, इंग्लिशांस पुष्कळ पैसा व बियास आणि सतलज ह्या नद्यांच्या मधला मुलूख पंजाबच्या राजाकडून मिळाला.

इतकें झालें तरी मुलतानचा सुभेदार मूळराज हा इंग्लिशांशीं कपटानें वागत असे. आणि तो लाहोर-

च्या दरबाराशींही उद्धटपणाचें आचरण करूं लागला ह्यास्तव त्यास पदच्युत करून सरदार खानशिंग ह्यास त्याचे जागीं स्थापण्यासाठीं गव्हरनर जनरलानें व्हान्स आग्न्यु साहेब व अंदरसन साहेब ह्यांस मुलतानास पाठविलें. ते तेथें तारीख १९ एप्रिल सन १८४८ इसवी रोजीं पोहोंचले. सरकारच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं आपलें काम बजाविलें. तेव्हां मूळराजाचे लोकांनीं दंगा करून सदरहू दोन इंग्लिश सरदारांचे प्राण घेतले नंतर मूळराजानें उघड बंड केलें. त्यावर इंग्लिश सरकारानें सैन्य पाठविलें. त्या सैन्यानें तेथें जाऊन मुलतानास वेढा घातला. त्या लोकांनीं बाहेरून गोळ्यांचा वर्षाव करून, किल्ल्यांत मूळराजाचें जें दारूगोळा वगैरे सामान होतें तें दग्ध करून टाकिलें. हें वर्तमान तारीख ३० दिसेंबर रोजीं घडलें. च्चिलियनवाला येथें शत्रूंचें पुष्कळ सैन्य होतें, त्यावर गफ साहेबाच्या फौजेनें हल्ला केला. तेव्हां इंग्लिशांकडील पुष्कळ नाश झाला; पण शिखांकडचा त्याहूनही अधिक झाला. पुढें लवकरच मुलतान इंग्लिशांच्या हातीं आलें. ह्या प्रकरणीं शेवटचें युद्ध गुजराथेमध्यें तारीख १ फेब्रुवारी रोजीं झालें. तेव्हां शीख लोकांची सेना ६०,००० होती. व इंग्लिशांकडे २५,००० होती तरी इंग्लिशांच्याच पक्षास जय मिळाला. ह्याप्रकारें करून, पंजाबचें राज्य स्वतंत्रपणें चांगलें चालूं शकत

नाहीं, असें पाहून, तें गव्हरनर जनरलानें आपले राज्यांत सामील केलें; व दिलीपासिंगास चार पांच लक्ष रुपये वेतन ठरवून दिलें. ही गोष्ट इ० स० १८४९ च्या मार्च महिन्यांत घडली.

इ० स० १८४८ ह्या वर्षी लार्ड दालहौसी साहेब गव्हरनर जनरलाचे कामावर आला. त्याची कारकीर्द राज्यें खालसात करण्याविषयीं इतिहासांत प्रसिद्ध आहे. तो काम पाहूं लागला, त्याच वर्षी साताराचा राजा शाहाजी उर्फ आपासाहेब हा मरण पावला. त्याचे पोटीं पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्याचें राज्य बिनवारशी सबब तें इंग्लिशांनीं घेऊन आपले राज्यास जोडिलें आणि त्याच्या तीन बायकांस वेतनें ठरवून दिलीं. त्यांपैकीं दोघी तर मरून गेल्या; आतां एक मात्र जीवंत आहे.

ब्रह्मदेशानें पूर्वी इंग्लिशांशीं तह ठरविला असतां रंगूनच्या सुभेदारानें दोन इंग्लिश लोकांस धरून नेऊन त्यांचे फार हाल केले. हें वर्तमान, गव्हरनर जनरल दालहौसी ह्यास कळतांच, त्यानें कमांदर बर्त ह्याजकडून तो मजकूर आवा येथें ब्रम्ही राजास कळविला. त्यानें त्या सुभेदारास तात्काळ बरतर्फ करून त्याचे जागेवर दुसरा नेमिला. तोही इंग्लिशांशीं मगरुरीनें वर्तूं लागला. तेणेंकरून उभय पक्षांचें वैमनस्य येऊन युद्ध सुरू झालें. हा प्रकार इ० स० १८५२ त

आरंभला. इंग्लिश सरदार गाद्दिन ह्यानें मार्तोबान, रंगून, बामासिन इत्यादि शहरें शत्रूपासून घेतलीं. मो- ठ्या प्रयत्नानें पेगू शहरही इंग्लिशांच्या हातीं आलें. नंतर तो सगळा प्रांत गवरनर जनरलानें आपले राज्यांत सामील केला. तिकडे आवा येथील राजास त्याच्या भावानें पदच्युत करून गादी मिळविली. तो इंग्लिश सरकारचें सामर्थ्य जाणून होता. म्हणून त्यानें त्यांशीं तात्काळ त्यांच्या म्हणण्याप्रमाणें तह ठरविला. तेव्हां अर्थात् तिकडील लढाई बंद झाली. हें वर्तमान इ० स० १८५३ त घडलें.

निजामाकडे इंग्लिशांचें सैन्य होतें. त्याच्या पगारा- बद्दलची वगैरे खर्चाची मोठी रक्कम त्यांजकडे येणें राहिली. ती वसुलांत आणण्याविषयीं अनेकवेळां अनेक तजविजी काढिल्या. पण कोणतीच साधेना. तेव्हां निजामानें वऱ्हाडचे चार प्रांत, इ० स० १८५४ ह्या वर्षी इंग्लिशांचे स्वाधीन केले. त्या वेळेपासून वऱ्हाड ह्यांच्या ताब्यांत आहे.

नागपूरचा राजा रघोजी भोंसला इ० स० १८५३ त निवर्तला. त्याला पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्याचें राज्य लार्द दालहौसी साहेबानें आपल्या राज्यांत घेतलें. तो प्रांत इ० स० १८५४ त पूर्णपणें त्यांच्या अमलांत आला.

भगलपूर व राजमहाल ह्या प्रांतांतील डोंगरावर

राहणारे **संथल** लोक ह्यांस त्यांच्या सावकारांनीं फार त्रासविल्यामुळें त्यांनीं इ० स० १८५५ च्या जुलै महिन्यांत खालीं उतरून मुलखांत दंगा मांडिला. गांव जाळून आंतल्या लोकांची कत्तल उडविली. तेव्हां त्यांजवर इंग्लिश सरकारची फौज रवाना झाली. तिनें तात्काळ यांस त्यांच्या पहाडामध्यें हांकून दिलें.

इ० स० १८०१ त **अयोध्येच्या नबाबाशीं** तह ठरला होता, त्याप्रमाणें त्या राज्याची व्यवस्था सरासरी बरीच चांगली होती. परंतु इ० स० १८५५ ह्या वर्षी त्यामध्यें इतकी अव्यवस्था झाली कीं, लूट, मारामार, खून ह्यांची देखील दाद कोणी घेईना. 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायानें लोक वर्तू लागले. इतकें होण्यास कारण राजाचें दुराचरण व छांदिष्टपणा होय. अशी झोटिंग बादशाही आपल्या ताब्यांतल्या व शेजारच्या राज्यांत असणें हें आपणास मोठें लांछन आहे, असें **लार्ड डालहौसी** साहेबास वाटून, त्यानें तें राज्य, इ० स० १८५६ त आपल्या राज्यांत सामील केलें. नंतर त्याच वर्षाच्या **मार्च** महिन्यांत तो साहेब आपलें काम सोडून स्वदेशीं गेला. त्यांचे जागेवर **लार्ड कयानिंग** साहेब हा गव्हरनर जनरल होऊन **हिंदुस्थानांत** आला.

मराठी ग्रंथ
नं
ठाणें



# भाग सोळावा.

## बंगाल्यांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें व आरंभ.

इ० स० १८५६–५७.

लार्ड क्यानिंग साहेब गव्हरनर जनरलाचें काम पाहूं लागला, तेव्हां हिंदुस्थानांत कोठें कांहीं गडबड नव्हती इंग्लिशांपुढें वर डोकें करील असा एकही शत्रु देशामध्यें किंवा त्याच्या सरहद्दीवर राहिला नव्हता; तेणें करून पुष्कळ लोकांस असें खचीत वाटत होतें कीं, निदान कांहीं वर्षें तरी दंगा धोपा न होतां, राजा व प्रजा ह्यांस यथेच्छ सुखोपभोग करावयास सांपडेल. परंतु ही भ्रांति होती. इ० स० १८५७ सालीं बंगालच्या काळ्या पलटणी लोकांनीं एवढें मोठें बंड केलें कीं, त्याच्या योगानें पुष्कळ लोकांचे हाल होऊन, जिकडे तिकडे अनर्थ झाला. त्या बंडाचीं कारणें प्रथमतः ह्या भागांत सांगून त्याचें संक्षिप्त वर्णन पुढच्या भागीं करूं.

ह्या बंडाचें बीज एकाएकीं उत्पन्न झालें नाहीं त्याचा माग पुष्कळ दिवसांमागचा 'अढळतो. ' ब्रह्मदेशाशीं प्रथम लढाई आरंभली, त्या वेळीं बंगालच्या शिपायांनीं तिकडे जाण्याविषयीं फार कुरकुर केली. व

कितीएकांनीं आपल्या नोकऱ्या सोडिल्या सुद्धां. व तेव्हांच त्यांचा बंडावा करण्याचा रंग दिसला. परंतु त्याचा बंदोबस्त मोठ्या तजविजीनें झाला. पुढें पंजाबची लढाई मांडिली. त्या समयींही, पगार वाढविल्यावांचून आह्मीं तिकडे जात नाहीं, असें, बंगाली शिपायांनीं आपले अंमलदारांस स्पष्ट सांगितलें. आणि तें सरकार मान्य करीना ह्मणून ते अगदीं नाखुष होऊन बिथरावयाच्या बेतास आले. त्या प्रसंगींही त्यांचा आवेश सर चार्लस नेपियर साहेबानें मोठ्या प्रयासानें शमविला. ह्या कामीं सामोपचार फार योजिल्यामुळें, बंगालच्या पलटणींत मोठा भरणा ब्राह्मणांचा व रजपूतांचा, ते आधींचच गर्विष्ठ, त्यांस असें पक्कें वाटलें कीं, इंग्लिशांचें ह्या देशांतलें राज्य काय तें आमच्या बळावर चाललें आहे, आमच्या साह्यावांचून ह्यांस हें घटिकाभर सुद्धां चालवितां येणार नाहीं. ही त्यांची धमक लार्ड डालहौसी ह्याच्या लक्षांत येऊन चुकली, व ती त्यानें कलकत्त्यांतून निघून जातांना स्पष्ट बोलून सुद्धां दाखविली, आणि तिचा परिणाम भयंकर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं, असें उघड सांगितलें. परंतु, त्या गोष्टीकडे कोणींच लक्ष पुरविलें नाहीं,

हिंदुस्थानांत गोऱ्या फौजेचें कारण राहिलें नाहीं, असें सरकारास वाटून, क्रिमिया व इराण येथें लढाईवर जीं सैन्यें तूर्त ह्मणून रवाना झालीं होतीं, तीं ताबडतोब

परत आणवून जिकडील तिकडे ठेवावयाचीं तीं ठेविलीं नाहींत. पंजाबाविषयीं मात्र विश्वास येईना. ह्मणून त्याच्या सरहद्दीवर कांहीं लोक होते. दिल्ली ह्मणजे मुसलमानांच्या गूढ कटाचें अगदीं घर, तेथला दारू-गोळा वगैरे लढाऊ सामान एतद्देशीय फौजेच्या ताब्यांत असे. इतकें सरकार बेसावध होतें.

फौजेमध्यें व लोकांमध्यें मुख्य प्रबल जाती दोन एक हिंदु, आणि दुसरी मुसलमान. त्यांचें एकमेकांशीं पूर्वापार हाडवैर; त्या कधीं एक व्हावयाच्या नाहींत; आणि त्या एक होतपर्यंत आपल्या राज्यास कांहीं धका नाहीं; असा सरकारचा समज होता. व तो कांहीं अंशीं बरोबर ह्मटला पाहिजे. परंतु, दुर्दैवकरून ह्या संधीस सर्वच गोष्टी विपरीत घडून आल्या त्या अशा. कांहीं आधार नसतां काळ्या लोकांच्या लष्करांत अशी एक विलक्षण गप्प उठली कीं, सरकार, हरतऱ्हेनें, एतद्देशीय लोकांस ख्रिस्ती करूं पाहत आहे. ही गप्प, थोडक्या वेळांत चोहोंकडे पसरली. आणि तिजविषयीं जिकडे तिकडे मोठा गवगवा झाला. आणखी असें घडलें कीं, नवीन प्रकारच्या बंदुका निघाल्या होत्या, त्या बंगालच्या शिपायांस देण्याविषयीं इ० स० १८५७ च्या आरंभीं, सरकारानें निश्चय केला. व त्यांच्या उपयोगाकरितां नवीन काडतुसेंही पाहिजेत, ह्मणून तीं तयार करण्याचा कारखाना डमडम येथें घातला. हा गांव

कलकत्त्यापासून सुमारें चार कोसांवर आहे. तेथें, एके दिवशीं. कोणी एक ब्राह्मण शिपाई, पाण्याचा गडवा भरून घेऊन चालला असतां, सदरहू कारखान्यांतील, खलाशांपैकीं कोणी मनुष्य, त्याजपाशीं पाणी प्यावयास मागूं लागला. त्यास ब्राह्मण शिपायानें सांगितलें कीं तुझ्या स्पर्शानें माझा गडवा विटाळेल, ह्मणून मी तुला पाणी देत नाहीं. खलाशानें त्यास उत्तर दिलें कीं, "ठीक आहे, जरा दमाखालीं घ्या; तुम्हीं जात जात म्हणून फार उड्या मारित आहां; पण साहेब लोक आतां जीं काडतुसें तयार करवीत आहेत, त्यांस लावीत असतात गाईची चर्बी आणि डुकराची चर्बी; तीं काडतुसें तुह्मालए दांतांनीं तोडावीं लागतील; मग पाहूं तुमची ज़ात कोठेंशी आहे ती.„ हा वाद सगळ्या लोकांच्या कानीं गेला. आणि त्यानें वर सांगितलेल्या गप्पेस अधिक पुष्टीकरणं आणिलें. हिंदु लोकांस गोमांसाचा तिरस्कार, आणि मुसलमानांस डुकराचा अतिशयित तिटकारा, तो इतका कीं ते त्याचें नांव देखील उच्चारीत नाहींत. ह्या दोन्हीही प्राण्यांचीं मांसें कपटेंकरून सरकार आपल्या तोंडांत घालून आपणांस बाटविणार, असें त्या दोन्ही जातींच्या लोकांस खचीत वाटलें. तेव्हां ते एकत्र होऊन इंग्लिशांच्या नाशाविषयीं मसलती करूं लागले; ह्यांत काय नवल आहे?

सरकार कोणालाही जबरदस्तीनें खिस्ती करूं

इच्छीत नाहीं, अशाविषयीं इंग्लिश अंमलदारांनीं शिपाई लोकांस पुष्कळ समजून सांगितलें, व काडतुसांस तुह्मीच आपल्या हातानें तेल, मेण, चिकत आणून एकत्र करून लावा, अशी मोकळीक दिली. तरी त्यांच्या मनांत आलेलें पाप जाईना. त्यांनीं असा संशय घेतला कीं, कागदांतच कांहीं कपट नाहीं ह्मणून कशावरून? एतावता त्यांच्या शंकेचें निवारण अशक्य झालें. जिकडे जावें तिकडे शिपाई लोकांत ह्या गोष्टी ऐकू येत. आणि ज्याला त्याला धर्माभिमानाचें स्फुरण आलें आहे असें दिसे. त्यांच्या डोक्यांतलें वेड काढण्याविषयीं गोरे अंमलदारांनीं आपली पराकाष्ठा करून सोडिली. परंतु सर्व व्यर्थ. इतक्या खटपटीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

शेवटीं, १९ व्या काळ्या पायदळ पलटणीची एक टोळी, तारीख २५ फेब्रुवारी सन १८५७ रोजीं, बर्हामपूर ह्मणून एक गांव कलकत्त्यापासून सुमारें ५८ कोस आहे, तेथें बिथरली. या ठिकाणीं गोरी फौज नव्हती. कर्नल मिचलसाहेब हा तेथें मुख्य अधिकारी होता. हा दंगा रात्रीं आरंभला. ते समयीं, बिघडलेल्या लोकांवर एक टोळी बरोबर घेऊन चाल करावी असें मिचलसाहेबाच्या मनांत आलें. परंतु रात्र पडली अंधारी; आणि बरोबर न्यावयाचे ते तरी काळे शिपाई; ते प्रसंगीं काय करतील कोण जाणे; अशा विचारावरून त्यानें हल्ल्याचा विचार तसाच

रहित केला. तथापि, कोणत्याही प्रकारें दंगा मोडिला पाहिजे, असें जाणून, त्यानें बंडावलेल्या लोकांशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें. त्यांत इतकेंच ठरलें कीं, मिचलसाहेबानें पुढें आणिलेले स्वार परत न्यावे, आणि ते परत चालते झाले, ह्मणजे शिपाई लोकांनीं आपापल्या बिऱ्हाडीं जाऊन स्वस्थ व्हावें. त्याप्रमाणें उभयपक्षांनीं केलें.

थोडेसे लोक बिघडले त्यांशीं देखील सरकारच्या अंमलदारांनीं सल्ला केला, ही बर्हामपूरची खबर ऐकून जागोजागच्या शिपायांस अधिकच चेव आला. तारीख २९ मार्च सन १८५७ रोजीं बराकपूर येथें ३४ व्या काळ्या पायदळपलटणीच्या लोकांनीं दंगा केला. मोंगलपांदी नामक एका शिपायानें लेफ्तनेंत बाग ह्यास तरवारीनें वार करून घायाळ केलें. त्या ठिकाणापासून सुमारें वीस हातांच्या अंतरावर एक जमादार व त्याच्या हाताखालचे १५।२० शिपाई, ती मौज पहात होते. पण साहेबाला सोडविण्यास किंवा दंगा मोडण्यास एक असामी देखील जाग्यावरून हालला नाहीं. कारण, तेही त्यांतलेच होते.

१९ व्या पलटणींतील बिथरलेले लोक बराकपुरास येण्याकरितां बारसेंत येथें दाखल झाले. त्यांच्या अपराधाबद्दल त्यांजपासून त्यांचीं हत्यारें घ्यावीं व त्यांस नौकरींतून काढावें असें क्यानिंग साहेबानें ठरविलें, व लागलेंच अमलांत आणिलें. ह्या एवढ्या

अपराधास ही शिक्षा अगदींच कांहीं नाहीं ह्मटली पाहि-जे." त्या वेळच्या सुमारास बंडसंबंधी कांहीं गूढार्थ सूचक चपात्या, ह्या पलटणींतून दुसऱ्या पलटणींत, दुसऱ्या पलटणींतून तिसऱ्या पलटणींत, अशा फिरत· त्यांचा हेतु इंग्लिश पक्षाच्या लोकांस कळेना.

अयोध्या प्रांतांत, लखनौपासून तीन चार कोसांवर ७ वी पलटण होती, तिजमधील लोक तारीख २ माहे मे रोजीं बदलले, आणि ४८ वी पलटण लखनौ येथें होती, तिजमधील लोकांस त्यांनीं लिहून पाठविलें कीं, 'काडतुसांच्या प्रकरणीं तुह्मी सांगाल तें करण्यास आह्मी सिद्ध आहों.' हें वर्तमान तेथील कमिशनर सर हेनरी लारेन्ससाहेब ह्यास समजतांच जी गोरी फौज ठिकठि-काणीं ठेविलेली होती, ती ताबडतोब लखनौस आणवि-ली. आणि बिथरलेल्या लोकांस नौकरींतून बरतर्फी देऊन तात्काळ होणाऱ्या दंग्याचें तूर्त निवारण केलें.

दिल्लीपासून सत्रा अठरा कोसांवर मीरत ह्मणून शहर आहे तेथें मे महिन्याच्या १० व्या तारखेस, तिसऱ्या घोडेस्वार पलटणीनें रात्रीं दंगा केला. तो असा कीं, प्रथम तुरुंगावर चाल करून आंतले सर्व कैदी सोडून दिले. साहेब लोकांचे बंगले जाळिले; आणि गोरे लोक व त्यांचीं माणसें जीं त्यांच्या सपाट्यांत सांपडलीं, त्यांस, बायका मुलांसुद्धां, बकऱ्यांप्रमाणें चरचरां कापून काढिलें.

# भाग सतरावा.

## बंडाचा पसार, शेवट, आणि परिणाम.

### इ० स० १८५७.

नंतर बंडवाले दूमदूम करीत मिरतेहून निघाले ते, तारीख ११ माहे मे रोजीं दिल्लीस पोहोंचले. शहरांत त्यांचे दुष्ट मिलाफी त्यांची वाटच पहात होते. ते व हे एकत्र होतांच इंग्लिशांच्या कत्तलीस आरंभ झाला. तेव्हां पन्नास साठ इंग्लिश मनुष्यें राजवाड्यांत जाऊन विश्वासानें बादशाहाच्या आश्रयानें राहिलीं. ब्रिगेदियर ग्रेव्ह्स ह्मणून एक सरदार होता, तो ३०० शिपाई व २ तोफा ह्यांसहवर्तमान किल्ल्याचे गढींत जाऊन बसला. पण त्या शिपायांचें इमान फार वेळ टिकलें नाहीं. ते तेव्हांच फितले, आणि गोरे लोक प्राणसंरक्षणार्थ सैरावैरा धावूं लागले. इकडे बंडवाल्यांनीं बादशाहास त्याचे तक्तावर बसवून त्याचे नांवाची द्वाही फिरविली.

राजवाड्याजवळच इंग्लिशांचा पुष्कळ दारूगोळा भरलेला होता, त्यावर बंडवाले पडले. त्या इमारतींत ९ गोरे लोक होते. त्यांनीं लढाऊ सामान शत्रूंच्या हातीं न लागावें, ह्मणून त्याचें बहुत प्रकारें रक्षण केलें; परंतु उपाय हरले असें पाहून शेवटीं त्यांनीं त्यास बत्ती लाविली. तेणें करून त्यांच्या पैकींही कितीएक असामी मरण

पावले. बादशाहा मामूल चालीप्रमाणें दरबार भरूं लागला; सर्व दिल्लीशहरांत बंडवाल्यांचा अंमल बसला. आणि जे गोरे लोक विश्वासानें राजवाड्यांत येऊन दडून राहिले होते, त्यांची कत्तल तारीख १६ मे रोजीं फार क्रूरपणानें बंडखोरांनीं उडविली. त्यांत बिचाऱ्या अबला व कांहीं मुलेंही प्राणांस मुकलीं. पुरुष योध्यांची गोष्ट एक वेळ असो; पण निर्बल बायकामुलांचे प्राण घेण्यांत त्या दुष्टांना काय पुरुषार्थ वाटला असेल तो कोण जाणे.

दिल्लीचें वर्त्तमान पंजाबांत समजलें, तेव्हां तेथल्याही शिपायांचीं मनें बिघडलीं. त्यांचा बंडावा करण्याचा रंग उघड दिसूं लागला. तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं बिघडलेल्या पलटणींचीं हत्यारें घेऊन तो आवेश कांहीं वेळ शमविला. पेशावर प्रांतांत बंडाच्या संकेताचीं पत्रें सरकारच्या हातीं लागलीं. ५५ व्या पलटणीची एक टोळी अटक तरीवर पाहाऱ्यास होती, ती तारीख २१ मे रोजीं आपली जागा सोडून एकदम नवा शहराकडे चालली. तीस २१ व्या पलटणीची एक टोळी वाटेंत मिळाली. नवा शहराचा अधिकारी मेजर व्हर्नर हा कांहीं लोक घेऊन त्यांस आडवा झाला, आणि त्यानें त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांस कैद करून आणिलें. त्याच शहरांत ५५ वी पैकीं कांहीं लोक होते, ते त्यांचेच मिलाफी. तेव्हां त्यांनीं धांवून येऊन आपल्या बंधूंस

मुक्त केलें, आणि हा सगळा घोळका मर्दन शहराकडे चालता झाला; कारण, ५५ वीचे बहुतेक लोक तेथें होते. ह्याप्रमाणें ५५ वी पलटण सगळी बिघडली.

ह्यानंतर पेशावरच्या पुष्कळ पलटणींचीं हत्यारें सरकारानें घेतलीं; व निकलसन साहेबास, बरोबर बरीच गोरी फौज देऊन ५५ व्या पलटणीच्या पारिपत्यास मर्दनाकडे रवाना केलें. त्यानें त्या लोकांचा पाठलाग करून १२० मारिले व १५० कैद करून आणिले.

ह्याच सुमारास दुवाबामध्यें शिपायांनीं बंड माजविलें. शिंद्याच्या राज्यांत नोमच येथें कांहीं इंग्लिश लोक, बाहेरून निघून, भीतीनें, किल्ल्यांत जाऊन राहिले, परंतु, आंतल्या शिपायांनीं बाहेरच्या बंडवाल्यांस दार उघडून यांचा विश्वासघात केला. तारीख ५ जून रोजीं झांशी येथें बंड झालें. तेथें इंग्लिश पुरुष, बायका, मुलें मिळून ५५ होतीं, त्यांनीं किल्ल्यांत जाऊन बसून बचावाची तजवीज केली. परंतु, बंडखोरांस झांशीची राणी साह्य झाली. त्या सगळ्यांनीं किल्ल्याला वेढा घातला. तेव्हां आंतले गोरे लोक निर्बल होऊन, त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांस, आम्हीं तुमच्या केसास धक्का लावणार नाहीं, असें बंडखोरांनीं वचन देऊनही क्रूरपणानें ठार मारिलें.

पुढं आग्रा, अलाहाबाद, काशी, इत्यादि अनेक जागीं धामधूम चालली. ती ऐकून लखनौ येथें बंद-

फैली लोकांनीं दंगा माजविला. पण तो सरकारच्या फौजेनें लागलाच मोडिला. परंतु, बंडखोरांचा जय इतर पुष्कळ ठिकाणीं होत चालला, व ते सरकारचें कांहीं चालूं देत नाहींत, असें लखनौच्या पलटणींस समजलें, तेव्हां त्या एकदम बिथरून शहर बळकावून बसल्या.

तारीख ५ जून रोजीं कानपुरास बंड उठलें. त्या लोकांस, शेवटच्या बाजीरावाचा पुत्र नानासाहेब हा मिळाला. आणि तो आपणास पेशवा ह्मणवूं लागला. कानपुरांत जे गोरे लोक होते, ते एके जागेभोंवतीं मोठा खंदक खणून, आंत अन्नसामग्री दारूगोळा वगैरे घेऊन सावधगिरीनें राहिले. त्या स्थळास बंडवाल्यांनीं वेढा घातला. दुर्दैवें करून आंतल्या तंबूस वगैरे आग लागून पुष्कळ इंग्लिश माणसें मेलीं, व मालही जळाला. शेवटीं जीवरक्षणाच्या आणा शपता नानासाहेबापासून घेऊन, तीं सगळीं त्याच्या स्वाधीन झालीं. पण त्या पाषाणहृदयानें त्यांतलें एकोन एक माणूस अत्यंत क्रूरपणानें मारून टाकिलें. हें वर्तमान ता० १ जुलैपर्यंत झालें.

तिकडे दिल्ली परत घेण्याची तयारी सरकारानें चालविली. जी गोरी फौज दूरदूरच्या ठिकाणीं होती ती सगळी एकत्र जमविली. शिवाय पंजाबांतून सैन्याची चांगली मदत आली. आणि कपुरथळ्याच्या

वगैरे कितीएक संस्थानिकांनींही इंग्लिशांस यथाशक्ति साह्य केलें. दिल्लीवर हल्ला करण्यासाठीं इंग्लिशसैन्य आलें, त्याच्या व. बंडखोरांच्या, शहराच्या आसपास कितीएक झटापटी झाल्या. दिल्लीस इंग्लिश सैन्याचा वेढा पडलाच होता. इकडे नजफगड येथें ६००० बंडखोरांशीं इंग्लिश सैन्याची एक मोठीच लढाई झाली. तींत ८०० शत्रु पडले. वेढा घालणारांस भक्कम मदत मिळाल्यावर, त्यांनीं शहरची काश्मीरवेस व लाहोर वेस हे मोठे दरवाजे फोडून आंतील शत्रूंवर एकदम हल्ला केला. बंडवाले पळत सुटले. आणि तारीख २० सप्तंबर रोजीं शहरांत इंग्लिशांचा अंमल पुनः स्थापित झाला

कानपूर बंडवाल्यांपासून घेण्याचें कामावर जनरल हावलाक ह्याची नेमणूक सरकारानें केली. त्यानें फत्तेपुरास बंडवाल्यांच्या एका मोठ्या टोळीचा पराभव करून, त्यांस पळायास लाविलें, व मोठ्या पराक्रमानें महाराजपुरांतून त्यांस, हाकून देऊन, तें हस्तगत करून घेतलें. त्याप्रमाणेंच कानपुरावर गोळ्यांचा वर्षाव करून, बंडखोरांस दे माय धरणी ठाय करून टाकिलें, आणि तें तारीख १७ जुलै रोजीं सर केलें. त्यापूर्वीं दोन दिवस नानासाहेबानें २१० अनाथ इंग्लिश बायकामुलांस त्या शहरांत बकऱ्यांप्रमाणें कापून ठार मारिलें होतें ह्याखेरीज ओनाव, बसरतगंज, बितूर इत्यादि

ठिकाणीं इंग्लिशसैन्यास बंडवाल्यांवर जय मिळाले ते वेगळेच.

लखनौ शहर बंडवाल्यांपासून घेण्यास सरकाराला फार प्रयास पडले. कारण, तेथें बंडवाल्यांचा जमाव मोठा असून त्यांस आश्रयास स्थल चांगलें सोईचें होतें. हावलाक, सर जेम्स औटराम अशा मोठमोठ्या योध्यांची योजना त्या कामावर झाली, तेव्हां तें हातीं लागलें. तारीख ५ फेब्रुआरी १८५८ रोजीं तेथें इंग्लिशांचा पूर्ण अंमल बसला. हें शहर पुनः स्वाधीन करून घेण्याचे प्रसंगांत इंग्लिशांकडचेही पुष्कळ लोक पडले.

झांशी बंडवाल्यांच्या ताब्यांत होती. ती तारीख ३ माहे एप्रिल सन १८५८ रोजीं सर ह्यू रोज नामक महापराक्रमी इंग्लिश सरदारानें घेतली. तेव्हां तेथील राणी व इतर बंडखोर दशदिशा पळून गेले. त्यांच्या पूर्वीं दोन दिवस रोजसाहेबानें तेथें जवळच बंडवाल्यांशीं एक मोठी लढाई मारिली. त्या वेळीं प्रतिपक्षाचा मुख्य तात्या टोपी हा होता. त्या समरांत १००० बंडवाले पडले; व त्यांच्या पुष्कळ तोफा सरकारच्या लोकांच्या हातीं लागल्या.

नंतर रोजसाहेब काल्पी घ्यावयास निघाले. त्यांस वाटेंत कुंच येथें २०००० बंडवाले भेटले. त्यांचा अधिपति तात्या टोपी होता. झांशीची राणीही तेथेंच

होती. उभयपक्षांची चांगलीच चकमक झडली. तेव्हां शत्रु पळून गेले. ता० २२ मे सन १८५८ रोजीं ही इंग्लिश फौजेची स्वारी काल्पीवर आली. आंत बंडवाले होते, त्यांनीं स्वसंरक्षणाची पुष्कळ खटपट केली. पण कांहीं चालेना. शेवटीं त्यांतले कांहीं लोक शरण आले, व बाकीच्यांनीं पळ काढिला. काल्पी रोज साहेबाचे हस्तगत झाली.

बंडवाले काल्पीहून पळाले ते ग्वाल्हेरीवर आले, आणि तें शहर त्यांनीं घेतलें, शिंदा आग्रा येथें पळून जाऊन राहिला. त्याचे गादीवर, नानासाहेबांचा पुतण्या बाळासाहेब ह्यास बंडवाल्यांनीं बसविलें. हें सर ह्यू० रोज साहेबास कळतांच तो सैन्यासहवर्तमान ग्वाल्हेरीजवळ प्राप्त झाला. आणि त्यानें हल्ला करून तारीख १९ जून रोजीं तें शहर बंडवाल्यांचे हातून माघारें घेतलें. तारीख २० रोजीं शिंदा ह्यास त्याची गादी पुनः मिळाली, हें त्याच्या प्रामाणिकपणाचें फळ होय. हें शहर घेतलें तेव्हां मोठी कत्तल उडाली. सगळे रस्ते मेतांनीं भरून गेले. त्यांत झांशीची राणी पडली.

ह्याप्रकारेंकरून अयोध्या, रोहिलखंड, आणि मध्य हिंदुस्थान, ह्यांतील बंडवाल्यांची सरकारानें दाणादाण करून सोडिली. नानासाहेब इत्यादि बंडाचे पुढारी कोणीकडे परागंदा झाले ह्याचा पत्ता नाहीं. ह्या बंडानें

ह्या देशाचा फायदा तर कांहीं केला नाहींच. पण विनाकारण हजारों लोक प्राणांस मुकले; शेंकडों गांव ओस पडले; व पांचपन्नास एतद्देशीय संस्थानांस असे धक्के बसले कीं, त्यांनीं त्यांचे पायेच निखळिले. परंतु, आपलें इंग्लिश सरकार अत्यंत समर्थ; त्यानें आपली सेना त्या दुष्टांवर पाठवून त्यांचा संहार केला.

ह्या ज्या वर थोड्याशा गोष्टी बंडांतल्या लिहिल्या आहेत, त्यांवरून बंडाचीं कारणें, व त्याच्या विस्ताराविषयीं सामान्य कल्पना, हीं, वाचणारांच्या लक्षांत येतील. त्याची इत्थंभूत हकीकत म्हटली तर फार आहे. तिचा समावेश एवढ्याशा पुस्तकांत व्हावयाचा नाहीं.

इ० स० १८५८ पावेतों, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखाचा राज्यकारभार, वेळोवेळीं घेतलेल्या सनदांच्या आधारानें, आनरेबल ईस्त इंदिया कंपनी ह्या नांवाची एक मंडळी पाहात असे. तो, वर सांगितलेल्या वर्षीं महाराणीसाहेब विक्तोरिया ह्यांनीं खुद्द आपले हातीं घेतला. त्या वेळीं लार्द क्यानिंगच गव्हरनर जनरल होता.

# भाग अठरावा.

## हिंदुस्थानांत इंग्लिशांचा उदय होण्याचीं कारणें; व त्यांच्या राज्याची सांप्रतची स्थिति.

हिंदुस्थान हा देश कधीं एका राजाच्या सत्तेंत संपूर्ण होता, असें नाहीं. मुसलमानांनीं त्याचा बहुतेक भाग आपले अमलाखालीं आणिला होता खरा. परंतु, त्यांस राज्य चालविण्याची व जिंकलेले देश आपले कबज्यांत ठेवण्याची शैली माहित नसल्यामुळें त्यांचें राज्य फार दिवस टिकलें नाहीं. पुढें मराठ्यांनीं दोन दिवस थोडीशी टुरफुर केली. पण तीही लवकरच लयास गेली. नंतर इंग्लिश लोकांना ह्या देशाचा धनीपणा प्राप्त झाला. ते इतक्या लांबीच्या पल्ल्यावरून केवळ व्यापाराकरितां इकडे आले असून त्यांनीं येथें राज्य कसें स्थापिलें, ह्याचें मोठें नवल वाटतें. त्यांस ज्या राजांपाशीं येथें लढावें लागलें, त्यांजपाशीं ह्यांचेपेक्षा पुष्कळ सैन्य होतें, तरी ते इंग्लिशांपुढें पराभव पावले हाही मोठा चमत्कार आहे. आतां, अशी गोष्ट कशानें झाली ह्याचा विचार करूं लागलें असतां दोन कारणें मनांत उभीं राहतात: तीं हीं. आपले राजांचीं आपसांत व घरचे घरांत वैमनस्यें होतीं, हें एक; आणि राज्यांत व्यवस्था नसून शिपाई लोकांस कवाईत येत नव्हती, हें

दुसरें. त्यांत पहिलें कारण विशेष बलवत्तर होय. हें मागें लिहिलेल्या इतिहासावरून सहज लक्षांत येईल.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखांचा मुख्य अधिकारी राणीनें विलायतेस नेमिला आहे. त्यास सेक्रेतरी आफ् स्तेत इन्कौन्सिल असा किताब आहे. गव्हरनर जनरल इन्कौन्सिल म्हणून एक मोठा कामगार कलकत्त्यास असून, तो सर्व हिंदुस्थानाचा कारभार पाहतो. तो त्या सेक्रेतरीच्या हुकुमाप्रमाणें चालतो. त्याला दोन कौन्सिलें म्हणजे प्रधान मंडळ्या आहेत. एक राज्य चालविण्याचे कामीं मदत करणारी, व दुसरी कायदे कानू ठरविण्याविषयीं मदत करणारी. राज्यकारभाराचे कौन्सिलांत ६ असामी आहेत; व कायदे करणाऱ्या मंडळींत १२ असामी आहेत. ह्या कौन्सिलानें केलेला कायदा सर्व हिंदुस्थानांत चालतो. मुंबई आणि मद्रास ह्या इलाख्यांवर एक एक गव्हरनर आहे, व त्या प्रत्येकास वेगवेगळें कौन्सिल आहे. बंगाला, वायव्येकडील प्रांत आणि पंजाब ह्यांवर एक एक लेफ्तनंत गव्हरनर आहे. व लेफ्तनंत गव्हरनर हे आपापले ताब्यांतील मुलखाचा राज्यकारभार चालवितात. तरी नवा कायदा, नवा हुद्दा नौकरांच्या पगारांची बढती, अथवा कोणत्याही एखाद्या कामास दहा हजार रुपयांहून अधिक खर्च करणें, ह्या गोष्टी त्यांस स्तेत सेक्रेटरीच्या अथवा गव्हरनर जनरलाच्या मंजुरीवांचून करण्यास अधिकार नाहीं.

देशाच्या व्यवस्थेसाठीं मुख्य दोन खातीं आहेत; १ मुलकी, आणि २ रें दिवाणी. मुलकी खात्यांत रेव्हिन्यु कमिशनर, कलेक्तर, असिस्तंत कलेक्तर, डेपुटि कलेक्तर, मामलेदार, हे अंमलदार आहेत. ते देशाच्या वसुलाचें काम पाहतात; व कलेक्तर, त्यांचे असिस्तंत, आणि मामलेदार, हे माजिस्त्रेतही आहेत; ह्मणजे, ते, चोरी मारामारी, शिवीगाळ, इत्यादिकांचे खटले फैसल करून अपराध्यांस शिक्षा देतात. दिवाणीकडचे कामदार म्हटले म्हणजे जड्ज, प्रिन्सिपल सदर अमीन, मुनसीफ हे आहेत. ते पैशाच्या देवघेवाच्या जमिनीच्या, व इतर हक्कांच्या वगैरे फिर्यादी घेऊन त्यांचे फैसले करितात. इलाख्याचे जागीं न्यायाचें मोठें कोर्त, हैकोर्त म्हणून स्थापिलें आहे. त्यांत अनेक जड्ज असतात. ते, जिल्हाजड्जांनीं केलेल्या फैसल्यांवरचीं आपिलें पाहतात.

रयत लोकांस विद्या यावी, असा सरकारचा फार हेतु आहे. ह्मणून गांवोगांव शाळा स्थापित होऊन त्यांवर हुशार शिक्षक नेमले जातात. विद्याभ्यास चांगला आहे. ही सोय इतक्या चांगल्या प्रकारेंकरून प्राचीन राजांपैकीं कोणाकडूनही झाली नाहीं.

मोठमोठ्या शहरांतून छापखाने सुरू झाले; नाना प्रकारचीं पुस्तकें छापलीं; वर्तमानपत्रें निघालीं; तारायंत्रें उभारलीं; आगीच्या गाड्या प्रांतोप्रांतीं चालूं लागल्या—

ल्या; पाण्यांतून जाण्यायेण्यास आगबोटी फार उपयोगी पडूं लागल्या; ज्ञानमार्गीत लोकांचें पाऊल बरेंच पुढें पडलें; न्याय आणि कायदा हीं लोकांस बरींच समजूं लागलीं; ह्या व अशा दुसऱ्या कितीएक सुखावह गोष्टी, ह्या दयाळू सरकारच्या अमलाखालीं आमचे लोकांस प्राप्त झाल्या. ह्यांबद्दल आपल्या प्रभूचे आभार मानणें आपणा प्रजेस फार उचित होय.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याच्या उत्पन्नाचें सरासरी अनुमान तरी शिकणारांच्या लक्षांत यावें, म्हणून इ०स०१८४९—५० सालच्या उत्पन्नाचें थोडेंसें टिपण येथें देतों.

१. खर्च वेंच जाऊन जमिनीच्या साऱ्यापैकीं शिलक, ... ......१२,६०,०२,६२९ रु०
२. खर्च वेंच वजा जाऊन मिठाचें उत्पन्न ..............२,७०,३७,५१६ रु०
३. खर्च वेंच जातां जकातीचें उत्पन्न ................८१,६०,७३७ रु०
४. खर्च वेंच वजा जातां अफूचें उत्पन्न .. ..........३,३५,८६,८४४ रु०
५. दारूपासून ..उत्पन्न. ....१,००,०१,४८९ रु०

शिवाय आलीकडे स्तांप कागदाचें उत्पन्न, पुष्कळ वाढलें आहे.

समाप्त.